

अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक


# मेहता मराठी ग्रंथजगत

सप्टेंबर २०१२ | किंमत १५ रुपये








# पुस्तक प्रकाशन




डॉ. आशिष बोरकर व डॉ. गौरी बोरकर लिखित “ **स्थूलतेला करा टाटा** ” या पुस्तक व डी.व्ही.डी. अशा मराठीमधील पहिल्या कॉम्बीपॅक चे प्रकाशन **सेलिब्रेटी मॉडेल सोनाली कुलकर्णी** हीच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. आशिष बोरकर, डॉ. गौरी बोरकर आणि श्री. सुनील मेहता उपस्थित होते.




डॉ. अश्विनी घैसास यांनी अनुवादित केलेल्या “ **हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ईईसीपी तंत्र** ” या पुस्तकाचे प्रकाशन नाशिक येथे माजी न्यायाधीश प्रभाकर उमरीकर यांचे हस्ते झाले. यावेळी डॉ. अश्विनी घैसास, डॉ. नितीन घैसास, मेहता पब्लिशिंग हाऊसच्या राजश्री देशमुख व सानिका करंदीकर उपस्थित होते.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ सप्टेंबर २०१२ ◆ वर्ष बारावे ◆ अंक नववा

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **साहित्यवार्ता** | **१२** |
| **शंकर सारडा अमृत महोत्सव** | **४०** |
| **पुरस्कार** | **६०** |
| **पुस्तक परिचय** | **६६** |
| **इंग्रजी पुस्तक परिचय** | **८९** |
| **अभिप्राय** | **९४** |
| **ओळख लेखकांची** | **९८** |
| **बालनगरी** | **१०९** |

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

अंकाची किंमत १५रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी

*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension **(ग्रंथजगत विभाग) - २२७/२४३**

E-mail : info@mehtapublishinghouse.com
Website : www.mehtapublishinghouse.com

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**

**३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

***या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.***

## संपादकीय

# पेंग्विनची नवी रणनीती

अमेरिकेतील ऑथर्स सर्व्हिसेस इंक (ए एस आय) ही ॲमेझॉन सारखी ऑनलाइन मार्केटिंग करणारी संस्था गेल्या दोन तीन वर्षात स्वयंप्रकाशन करणाऱ्या लेखकांना व्यावसायिक मार्गदर्शन आणि वितरण सेवा पुरवण्याचे कार्य करीत आपला व्याप झपाट्याने वाढवत आहे. व्यावसायिक, प्रतिष्ठित प्रकाशन संस्था नवोदित लेखकांची पुस्तके काढण्याबाबत तेवढ्याशा उत्सुक नसतात. प्रकाशनासाठी आलेल्या हस्तलिखिताचा स्वीकार करताना बऱ्याच चाळण्या लावतात. आधी लिटररी एजंट गाठावा लागतो. मग त्यांच्या मार्फत प्रकाशकाकडे जावे लागते. प्रकाशक आपल्या सल्लागाराकडे, किंवा लिटररी एडिटरकडे ते पाठवतो. त्यानुसार होकार नकार कळवतो. होकार दिला तर एडिटरच्या सूचनांप्रमाणे लेखकाकडून पुनर्लेखन करून घेतो. नंतर चित्रे, छायाचित्रे, मुखपृष्ठ, ब्लर्ब, शिवाय प्रकाशनपूर्व नमुना प्रती अभिप्रायार्थ पाठवणे; प्रकाशनाची तारीख ठरवून त्या तारखेच्या आगेमागे वृत्तपत्रात परीक्षणे यावीत अशी आखणी करणे, जाहिरात करणे, लेखकाचे दौरे आणि कार्यक्रम आखणे, पुस्तकाच्या दालनांमध्ये त्या पुस्तकांचा लक्षवेधक डिस्प्ले व्हावा म्हणून प्रयत्न करणे वगैरे खर्चिक कामे प्रकाशन संस्था करीत असते. त्यामुळे नवे हस्तलिखित स्वीकारताना त्याचा उठाव किती होईल याबद्दल सावधगिरी आणि दक्षता घेणे क्रमप्राप्त असते. तेव्हा अशा चाळण्या लावणे यात काही गैर नाही. बऱ्याच लेखकांना या

दीर्घसूत्री प्रक्रियेचा तिटकारा असतो. ते स्वत:च आपले पुस्तक स्वखर्चाने काढतात. असे सेल्फ पब्लिशिंग कवितासंग्रहांच्या बाबतीत जास्त दिसायचे. परंतु आता ई-बुकच्या तंत्रज्ञानामुळे इतर हौशी लेखकही स्वखर्चाने आपली पुस्तके तयार करून कागदावर छापण्याऐवजी डिजिटल स्वरूपातच इंटरनेटवर विक्रीसाठी देणे पसंत करतात. त्यांना वाचकांचा प्रतिसादही मिळतो. ॲमेझॉनसारख्या संस्था अशा ई-बुक्सच्या वितरणाची व्यवस्था करतात. त्यामुळे ई-बुक्सची उलाढाल वाढत आहे. पारंपरिक मुद्रित पुस्तकांच्या खपाशी ई-बुक्स आता तुल्यबळ स्पर्धा करीत आहेत. पेंग्विनने इंग्लंडमध्ये १९ जुलै रोजी सिल्व्हिया डे या नव्या लेखिकेचे बेअर्ड टू यू (Bared To You) हे पुस्तक पेपरबॅक स्वरूपात बाजारात आणले. पहिल्या आठवड्यात त्याच्या ५० हजार प्रती विकल्या गेल्या. एवढेच नव्हे तर ५० हजार प्रती ई-बुक्सच्या स्वरूपातही विकल्या गेल्या. आधीचे पहिल्या आठवड्यातील पुस्तक विक्रीचे सर्व उच्चांक या पुस्तकाने मागे टाकले. फास्टेट सेलिंग पेपरबॅक म्हणून हे पुस्तक ग्रंथव्यवहाराशी संबंधित सर्वच जाणकारांना चकित करणारे ठरले. या पुस्तकाची जाहिरात लंडनच्या अंडरग्राऊंड-मेट्रो रेल्वेत मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे. या पुस्तकाने १९९८ पासूनच्या नील्सन बुकस्कॅन रेटिंगमध्ये टॉप सेलिंग पुस्तकांच्या यादीत आजवरचे उच्चांक मोडणाऱ्या फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे या ई.एल.जेम्सच्या कादंबरीलाही मागे टाकले आहे. **'बेअर्ड टू यू' हे पुस्तक सिल्व्हियाने प्रथम सेल्फ पब्लिश केले होते. ई-बुकच्या स्वरूपात.** त्याला वाचकांनी लगेच भरघोस प्रतिसाद दिला. तो लक्षात घेऊन पेंग्विनने त्याचे पेपर बॅक हक्क विकत घेतले. त्याचे उत्तम मार्केटिंग केले. विक्रमी खप मिळवला.

सेल्फ पब्लिश्ड पुस्तकांच्या प्रचंड क्षमतेची कल्पना पेंग्विनला आली आणि पेंग्विनने अमेरिकेतील ऑथर्स सर्व्हिसेस इंक ही सेल्फ पब्लिशिंग लेखकांची संस्थाच ११.६ कोटी डॉलर्सना विकत घेतली. ऑथर्स सर्व्हिसेस (ए एस आय) मार्फत १लाख ५०हजार लेखकांच्या १लाख ९०हजार ई-बुक पुस्तकांचे वितरण होते. २०११ मध्ये तिची उलाढाल १०कोटी डॉलर्सची होती. ऑनलाईन मार्केटिंग, वाचक-ग्राहकांचा अवाढव्य डाटाबेस आणि त्याचे वर्गीकरण, ई-बुक्स

स्वरूपातील प्रकाशनाच्या बाबतीत व्यावसायिक मार्गदर्शन आणि सेवा, वाचक-लेखकांनी निर्माण केलेल्या विविध क्षेत्रातील आशयसंहीतांची दखल घेण्याची तत्परता ही ए एस आय ची शक्तिस्थाने आहेत. ई-बुक्स आणि सेल्फ पब्लिशिंग हे प्रकाशन विश्वातील फास्टेट ग्रोईंग क्षेत्र आहे. त्यावर प्रभुत्व मिळवण्यासाठी पेंग्विनने ए एस आयच्या खरेदीचा घाट घातला; आणि पेंग्विनने ए एस आयचे स्वतंत्र अस्तित्व ठेवून सेल्फ पब्लिशिंगच्या भावी बाजारात दणकेबाज एन्ट्री घेतली. काळाबरोबर बदलण्याची लवचिकता आणि दूरदृष्टी पेंग्विनने दाखवली आहे यात शंकाच नाही.

पेंग्विन ब्रँडची मुख्य शक्तिस्थाने काय आहेत?

जगभरातील नव्या प्रतिभाशाली लेखकांचा शोध घेऊन त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण लेखन उत्तम प्रकारे संपादन करून प्रसिद्ध करणे, आंतरराष्ट्रीय वितरण-विक्री व्यवस्था, पुस्तकांची आकर्षक निर्मिती; विविध ग्रंथमालिका, आशयाची विश्वासार्हता आणि कसदारपणा यांची वाचकांना वाटणारी खात्री, संपादकीय निवडीबाबतची चोखंदळ, अभिजात वाङ्मयीन आणि अॅकॅडमिक दृष्टी. त्यामुळे जगाच्या कानाकोपऱ्यात पेंग्विनला एक मान्यवर विश्वसनीय ब्रँड म्हणून मान्यता आहे. पारंपरिक प्रकाशन आणि स्वयंप्रकाशन या दोन्ही क्षेत्रात मूलभूत फरक आहे. स्वयंप्रकाशन करताना आशयातील आणि मांडणीतील एकजिनसीपणा, संपादकीय संस्कारांनी संहितेला येणारी परिपूर्णता, डिझाइन-मांडणीबाबतची पथ्ये, संदर्भाची अचूक नोंद वगैरे बाबतीत काटेकोर असेलच असे नाही. त्यामुळे पेंग्विनच्या दृष्टीने स्वयंप्रकाशन हे काही खरे अस्सल दर्जेदार, खात्रीशीर आशय निर्मितीचे माध्यम नव्हे. एकापरीने ती तडजोड आहे. पण ग्रंथ व्यवसायात जे वादळ ई-बुक्स, ऑनलाईन मार्केटिंग, स्वयंप्रकाशन अॅमेझानचे नेटवर्क याद्वारे येत आहे, त्याला तोंड देऊन या क्षेत्रात कायम राहणे, आपले स्थान टिकवणे, नवा वाचक ग्राहकवर्ग आकृष्ट करणे या दृष्टीने पेंग्विनने योग्य तेच धोरण स्वीकारले आहे असे मानायला हवे.



# मेहता मराठी ग्रंथजगत

## वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत

एक वर्षाला २० %　　तीन वर्षांना २५ %　　पाच वर्षांना ३०%

| | | |
|---|---|---|
| **एक वर्षाची वर्गणी १५०रु** | **तीन वर्षाची वर्गणी ३५०रु** | **पाच वर्षाची वर्गणी ५००रु** |

**तीन किंवा पाच वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'लोखंड खाणारे उंदीर'**
आणि **'नशीबवान शेखर'**
लेखिका - वृषाली पटवर्धन
प्रत्येकी ३०रु.ची
पुस्तके भेट
पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'चला जाणून घेऊ या मंत्रसामर्थ्य'**
आणि **'चला जाणून घेऊ या शाकाहार'**
प्रत्येकी ४०रु.ची
पुस्तके भेट
पोस्टेज २०रु.





भेट पुस्तके प्रती शिल्लक असेपर्यंतच

**मेहता मराठी ग्रंथजगत**, द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०.
फोन - (०२०) २४४७६९२४

वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील

आगामी




# कृष्णदेवराय

एका सम्राटाच्या दक्षतेची यशोगाथा

**डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली**


विजयनगर साम्राज्य म्हणजे भारतीय हिंदुसंस्कृतीचा, हिंदवी स्वराज्य स्थापनेचा 'महोन्नत महामेरू'. धर्म, संस्कृती, नृत्य, नाट्य, साहित्य, संगीत या संदर्भात या साम्राज्याचे फार मोठे योगदान आहे. या साम्राज्याच्या इतिहासातील 'कृष्णदेवराय' हा अतुलनीय सम्राट होता. त्याच्या कारकीर्दीत विजयनगरची सेना दिग्विजयी गणली गेली. श्री चैतन्य महाप्रभू, वल्लभाचार्य, संत कनकदास, संत पुरंदरदास आदी सत्पुरुषांना त्याने सन्मानित केले. प्रख्यात मध्वाचार्य श्री व्यासतीर्थ हे त्याचे गुरू होते.

कृष्णदेवराय हा केवळ झुंजार सम्राट नव्हता, तो लोकहितदक्ष राजाही होता. त्याने आपल्या प्रजेच्या सुखासाठी, लोकहितासाठी अनेक कामे केली. त्याच्या सामाजिक-सांस्कृतिक कार्याविषयी तत्कालीन पोर्तुगीज प्रवाशांच्या वृत्तांतातून विश्वसनीय तपशील उपलब्ध झाले आहेत. तसेच कृष्णदेवरायाच्या शिलालेखांतूनही त्याच्या कार्याची माहिती मिळते.

विजयनगरपासून बेळगाव, गोवा, कटक ते श्रीलंकेपर्यंत त्याने राज्य केले. कन्नड, तेलुगु, तमिळ, संस्कृत या विविध भाषांतून त्याने ग्रंथलेखन केले. आंध्रचा 'भोजराजा' म्हणून त्याची ख्याती सर्वदूर दरवळली.

त्याच्या दरबारात अष्टदिग्गज कवी होते. 'तेलुगु कालिदास' म्हणून सर्वश्रुत असलेल्या 'श्रीनाथ' कवीची त्याने सुवर्णतुला केली. अवघ्या एकोणीस वर्षांच्या कारकिर्दीत त्याने तिसाहून अधिक लढाया केल्या आणि सर्व जिंकल्या. त्याने लिहिलेल्या 'अमुक्तमाल्यदा' या काव्यग्रंथाची गणना तेलुगूतल्या सर्वश्रेष्ठ अशा पंचकाव्यात होते. शस्त्र आणि शास्त्र यांच्यावर अभूतपूर्व हुकमत गाजवणारा असा दुसरा सम्राट झाला नाही.

**आगामी**




# द चेम्बर

**जॉन ग्रिशॅम**

अनुवाद
**विश्वनाथ केळकर**


शिकागोच्या कायदाक्षेत्रातल्या एका बड्या कंपनीत अडॅम हॉल नावाचा, सव्वीस वर्षांचा एक तरुण वकील काम करीत असतो, उज्ज्वल भवितव्याच्या व्यवसायाच्या उंबरठ्यावर तो उभा असतो. मृत्यूशिक्षा झालेल्या कैद्याची शिक्षा कमी करण्याच्या कामी, त्याने त्याचे भवितव्य पणाला लावलेले होते.

अतिसुरक्षा व्यवस्था असलेल्या मिसिसिपी राज्यातल्या मृत्यूशिक्षा झालेल्यांसाठीच्या तुरुंगात सॅम के हॉल नावाचा एक वृद्ध कैदी असतो, हा त्याच्या तरुणपणात क्लान्स नावाच्या जहाल विचारांच्या टोळीचा सदस्य होता. त्याकाळात त्याने केलेल्या वंशविद्वेषाबद्दल त्याला किंचितसुद्धा पश्चात्ताप वाटत नव्हता. १९६७ मधे घडवून आणलेल्या बॉम्बस्फोटात काही मनुष्यहानी झालेली होती, त्यामुळे त्याला मृत्यूदंडाची शिक्षा झालेली होती, ती शिक्षा अंमलात आणण्याची वेळ आता आलेली होती. मृत्यूशिक्षा माफ होण्याच्या सर्व शक्यता आता मावळलेल्या असतात. अडॅम हॉल हा उदारमतवादी तरुण या के हॉल कैद्याचा नातू असतो, अडॅम त्याला वाचवू शकत होता.

मृत्यूशिक्षा अंमलात आणण्याची व्यवस्था, तुरुंगामधे सुरू होते, मृत्यूशिक्षेला हरकत घेणारे, त्यावेळी तुरुंगाच्या दाराबाहेर निदर्शने करीत असतात, मृत्यूशिक्षेच्या बातम्या मिळविण्यासाठी टी.व्ही.वार्ताहर हजर असतात. अडॅमकडे त्याच्या अशीलाला वाचविण्यासाठी फक्त काही दिवस, काही तास, काही मिनिटेच उरलेली असतात. पण अडॅम व सॅम या दोघांच्यात काही गुप्त गोष्टींची, कौटुंबिक तणावांची दरी होती, त्यातल्या गुप्त गोष्टींच्यातले एक गुपित, सॅम याचा जीव वाचवू शकत होते, पण त्याचवेळी अडॅमचा जीव पणाला लागण्याची शक्यता होती.

आगामी

# एकादश कथा




**डॉ. छाया महाजन**

आणि तो भास्कर...

माझा नवरा?

कोण लागतोय ग तुझा?

तो कुजट छातीचा पिंजरा... तो किडका माणूस...

कोण तुझा? तुझ्या नावाला लागणारा कलंक झाकला त्याने म्हणून केवढी किंमत दिलीस? तुम्ही काय किंमत चुकवणार?

किंमत चुकवतेय मी...!

माझ्या शरीराची किंमत!

मन मेलं माझं. मला ना घर आहे ना आईबाप.

तो मला नांदवणार नाही या भीतीने आलात तुम्ही.

माझी काळजी आहे म्हणून नाही. कशी आई आहेस तू?

पोटचा गोळा असा लोकांसाठी खाईत टाकलास?

कशाला शिकवलं मला?


कशाला सारखं स्वत:च्या पायावर उभं रहा म्हणत होतीस? अंधारे बोचरे धरून डोळे पुसायचीस तू -

तुला मी तशी व्हायला नको होते ना?

**आगामी**

## डॉ. छाया महाजन

# यशोदा




एका क्षणात बाईसानं त्याला कवेत घेतलं. त्यांच्या कुशीत राधो शिरला, आणि बाईसांचं मन मायेच्या पहिल्या आवेगानं भरून गेलं. त्या स्पर्शासरशी कितीतरी वास त्यांच्या मनात जागे झाले होते. त्यांच्या अनाथपणाच्या साधर्म्यानं त्यांच्या व्यथित आयुष्याचा वास... अंधाऱ्या माजघरातल्या पेटीतल्या कपड्यांचा वास... कोवळ्या जिवाची कातडी कधीही न भोगलेल्या बाईसांनी माजघरातून मन ओढून काढलं. निष्पाप नवजात बालकाकडे कुतूहलानं पाहावं, तसं त्या राधोकडे पाहू लागल्या.

# मुलखावेगळा




ती गेली. तिच्याबरोबर माझी उमेदच गेली. हजार वेळा तिच्या माहेरच्या गावी गेलो अन् फकिरासारखा गावभर भटकून एसटी स्टँडवर परत आलो. ती नाहीच आली... आशा वाटत होती.

पुढे तीही विझली.

ज्या क्षणी हे जाणवलं की, रमा माझी नाही, तो क्लेशाचा क्षण मात्र मी विसरले नाही. त्या आठवणीनं अजून अस्वस्थ व्हायला होतं. हे सांगतानाही तसंच होतं, नंतर मात्र रूळच बदलले. मी तोच आहे. तसाच आहे. काय? पण ‘इट इज ऑल लाईफ.’




*** नॉर्वेतील चर्चासत्राचे सुनील मेहता यांना निमंत्रण**



'मेहता पब्लिशिंग हाऊस' ही मराठी प्रकाशनक्षेत्रातील एक अग्रगण्य संस्था आहे. मराठी प्रकाशनक्षेत्रात आजवर अनेक नवीन प्रवाह आणण्यात मेहता पब्लिशिंग हाऊसचा मोलाचा सहभाग आहे. मराठीबरोबरच आता इंग्रजी प्रकाशन क्षेत्रातही मेहता पब्लिशिंग हाऊसने जम बसविण्यास सुरुवात केली आहे. मराठी वाचकांना जगभरातील उत्तमोत्तम साहित्य देण्यात मेहता पब्लिशिंग हाऊस नेहमीच अग्रेसर राहिले आहे. जागतिक प्रकाशन क्षेत्राने याची दखल घेतली असून सप्टेंबर २०१२ मध्ये ऑस्लो येथे होणाऱ्या भारत आणि नॉर्वे सांस्कृतिक देवाण-घेवाण चर्चासत्रासाठी मेहता पब्लिशिंग हाऊसचे श्री. सुनील मेहता यांना निमंत्रण दिले आहे.

हे सांस्कृतिक देवाण-घेवाण चर्चासत्र नॉर्वेतील 'NORLA' (Norwegion Literature Abroad) या संघटनेने आयोजित केलेले आहे. ही संघटना १९७८पासून नॉर्वेजियन लेखक आणि प्रकाशक यांना नॉर्वेबाहेर व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम सातत्याने करत आहे. विविध प्रकारची चर्चासत्रे, परिषदा, संमेलने याद्वारे हे काम केले जाते. याचाच एक भाग म्हणून हे चर्चासत्र दि. १२ ते १४ सप्टेंबर,

२०१२ या दरम्यान ऑस्लो येथे होणार आहे.

यामध्ये मराठी प्रकाशकांचे प्रतिनिधी म्हणून श्री. सुनील मेहता आपले विचार मांडतील. मराठी प्रकाशकांच्या दृष्टीने ही एक मोठी सुवर्णसंधीच मानावी लागेल. आजच्या काळात सातत्याने मराठी हळूहळू लोप पावणार का? मराठी पुस्तकांचा वाचकवर्ग कमी होत आहे का? असे प्रश्न विचारले जात आहेत, तेव्हा हे निमंत्रण म्हणजे आशेचा एक किरणच म्हणावा लागेल. मराठी भाषा, वाचक, प्रकाशक यांची दखल जागतिक पातळीवर घेतली जात आहे याचीच ही साक्ष आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. 'साहित्य' हे आपल्या संस्कृतीचे वाहक असते आणि जगभर पोहोचणारे हे साहित्यच दोन संस्कृतींचा सुंदर मिलाफ घडवून आणते.

मराठीतील दर्जेदार साहित्य आणि लेखक यांना मिळालेल्या या संधीचे श्री. सुनील मेहता एक प्रकाशक म्हणून नक्कीच सोने करतील आणि कुणी सांगावे, कदाचित येणाऱ्या काळात साहित्यक्षेत्रातील नोबेल पारितोषिकावर एखादे मराठी नाव कोरले जाईल.

## * 'स्वामी' सुवर्णमहोत्सवी वर्षात

पानिपतच्या पराभवानंतर गलितगात्र झालेल्या मराठा सरदारांमध्ये स्वाभिमान जागवून हिंदुस्थानावर मराठी सत्तेचा अंमल पुन:प्रस्थापित करणारे माधवराव पेशवे आणि त्यांच्या पत्नी रमाबाई यांच्या जीवनावर आधारलेली रणजित देसाई यांची 'स्वामी' कादंबरी यंदा सुवर्णमहोत्सव साजरा करत आहे. हे औचित्य साधून लवकरच मेहता पब्लिशिंग हाऊस ३२वी आवृत्ती प्रकाशित करत आहे अशी माहिती श्री. अनिल मेहता यांनी दिली.

## * प्रा.पुष्पा भावे यांच्या हस्ते आगरकर पुरस्कार वितरण

धर्मचिकित्सा केली तरच परिवर्तनाचा मार्ग मोकळा होतो; परंतु आजचे राजकारणी आळशी आणि लबाड असून, ते धर्मचिकित्सा न करता राजकारणासाठी धर्माचा वापर करतात, अशी टीका सामाजिक कार्यकर्त्या प्रा. पुष्पा भावे यांनी केली.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने देण्यात येणारा 'सुधारककार गोपाळ गणेश आगरकर पुरस्कार' मुस्लिम समाजातील सामाजिक कार्यकर्ते सय्यदभाई यांना अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते देण्यात आला. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर, अविनाश पाटील या वेळी उपस्थित होते.

मानपत्र आणि दहा हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. सय्यदभाई यांनी कार्यक्रमातच पुरस्काराची रक्कम 'मुस्लिम सत्यशोधक समाजा'साठी समितीचे

कार्यकर्ते रशीदभाई यांच्याकडे सुपूर्द केली. प्रा. भावे म्हणाल्या, ''धर्माच्या नावाने स्त्रियांवर अन्याय होत आहे. त्यामुळे इतर समाजांप्रमाणे मुस्लिम समाजातही महात्मा फुले यांच्या विचारांप्रमाणे धर्मचिकित्सेची गरज आहे. सामाजिक कार्य ही प्रस्थापितांच्या विरोधातील लढाई असते आणि प्रत्येक सामाजिक कार्यकर्त्याला ती लढावी लागते. सय्यदभाई हेदेखील प्रबोधनाची मशाल तेवत ठेवून ही लढाई लढत आहेत.''

सय्यदभाई म्हणाले, ''मुस्लिम समाजाच्या विकासासाठी एकतर्फी 'तलाक'ची प्रथा बंद होण्याबरोबरच मूल दत्तक घेणे आणि कुटुंबनियोजन सक्तीचे करणे ही काळाची गरज आहे. लग्न करताना ते कबूल असल्याची विचारणा स्त्रीकडे केली जाते, परंतु तलाक देताना मात्र स्त्रीच्या मताला किंमत दिली जात नाही. त्यामुळे एकतर्फी तलाक थांबला पाहिजे. या प्रथेविरुद्धचा लढा हा आंतरराष्ट्रीय लढा असून, त्यासाठी समाजातील पुरुषांची मानसिकता बदलणे आवश्यक आहे.''

केवळ ज्ञान वाढवणे उपयोगाचे नसून, समाजहितासाठी बोलण्याचाही संघर्ष करणे आवश्यक असल्याचे डॉ. दाभोलकर यांनी सांगितले. आज समाजात चुकीचा विचार जाणीवपूर्वक पसरवला जात असून, समाजपरिवर्तनासाठी विचार, उच्चार, प्रचार, संघटन, आचार आणि संघर्ष या सहा घटकांची गरज असते अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

### * अतिलोभामुळे जगात समस्या - डॉ. अभय बंग

हिंसा, आर्थिक मंदी, तापमानवाढ या तीन समस्या जगाला भेडसावत असल्या, तरी त्यांचे मूळ हे आपल्या मनात आहे. अपरिमित भोगवाद आणि लोभामुळे या समस्या निर्माण होत आहेत, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांनी केले. विचारवंत आणि स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. ह. ना. फडणीस यांच्या प्रवचनांवर आधारित मुकुंद काणेलिखित 'अंतर्मुखी सदासुखी' या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी डॉ. धनंजय गुंडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

डॉ. बंग म्हणाले, ''हिंसेला धर्माबरोबर जोडले गेल्यामुळे धर्मद्वेषातून आलेल्या हिंसेची क्रूरता वाढली आहे. 'निव्वळ पैशासाठी सर्व काही' या भांडवलशाहीच्या तत्त्वामुळे जगात सातत्याने कुठे ना कुठे आर्थिक मंदी दिसत आहे. मानवाच्या अपरिमित उपभोगामुळे मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन होऊन ग्लोबल वॉर्मिंगची समस्या निर्माण झाली आहे. यातून मार्ग काढायचा असेल, तर आपल्याला गौतम बुद्धांच्या मार्गाने जावे लागेल. आपल्या गरजा आणि इच्छा कमी कराव्या लागतील.''

डॉ. गुंडे म्हणाले, ''आज वैद्यकीय व्यावसायिक हा औषधी कंपन्यांचा एजंट झाला आहे. रोग हा औषधांनी बरा होत नाही, हे त्यांनाही चांगलेच ठाऊक आहे;

तरीदेखील ते तुम्हाला साइड इफेक्ट्स होणारी औषधे घ्यावयास भाग पाडतात. ही विकतची दुखणी मागे लागू नयेत, म्हणून डॉ. फडणीस यांनी दाखविलेला मार्ग उपयुक्त ठरणार आहे.'' मंजिरी धामणकर यांनी सूत्रसंचालन केले. राधा फडणीस यांनी आभार मानले.

*** 'बिनधास्त बुढ्ढ्या' पुस्तकाचे प्रकाशन**

''बायका आपले जीवन अनामिक भीतीखाली घालवतात. त्यापासून मुक्त होणे म्हणजे बिनधास्त जगणे होय. निवृत्तीच्या आयुष्यात मनमोकळेपणे बोलावे अशा मैत्रिणींची गरज असते. या वयात 'स्व'चा स्वातंत्र्योत्सव करता येतो; पण त्यासाठी 'स्व' कळला पाहिजे. त्याचे परखड परीक्षण करता आले पाहिजे,'' असे मत


३री आवृत्ती




# धन्वंतरी घरोघरी

संपादन व संकलन

**डॉ. ह. वि. सरदेसाई**

**डॉ. अनिल गांधी**

१५०रु. पोस्टेज २५रु

'फॅमिली डॉक्टर', ही संकल्पना काळानुरूप बदलली असली,

तरी स्त्री-पुरुष, आबाल-वृद्ध अशा आपल्या सर्वांनाच आरोग्य विषयक समस्यांसाठी डॉक्टरांची आवश्यकता असते.

बालकाच्या विकास-वाढीचा प्रश्न असो, नाक-कान-घसा यांचे विकार असोत. दात, डोळ्यांचे आजार असोत, अथवा आधुनिक सौंदर्यशास्त्र असो,

भीतीसारखे मानसिक आजार असोत, अस्थिरोगासारखी जटील समस्या असो. स्त्रियांच्या आरोग्यविषयक समस्या असोत, अथवा वैवाहिक समस्या असोत...

अर्थात गंभीर समस्या असोत वा किरकोळ आजार,

त्याचे वेळीच निराकरण करण्यासाठी मान्यवर डॉक्टरांनी केलेले बहुमोल मार्गदर्शन; थोडक्यात 'फॅमिली डॉक्टर' ही संकल्पना

अधोरेखित करण्याचा केलेला प्रयत्न म्हणजेच...

धन्वंतरी घरोघरी!

लेखिका अश्विनी धोंगडे यांनी व्यक्त केले.

सुनीता केळकर यांनी 'डिसग्रेसफुली युवर्स' या पुस्तकाचा भावानुवाद 'बिनधास्त बुढ्ढ्या' या नावाने केला. त्याचे प्रकाशन निवेदक सुधीर गाडगीळ यांच्या हस्ते झाले. दिलीपराज प्रकाशनच्या मधुमिता बर्वे या प्रसंगी उपस्थित होत्या.

संसाराच्या जबाबदाऱ्या कमी झाल्यावर तरी स्वत:साठी जगायला लागा, असे मत व्यक्त करून धोंगडे म्हणाल्या, ''आयुष्यभर भीतीच्या भावनेत आपण खळाळून हसायला विसरलो की काय, असे वाटते. सध्या तर घरातील संवादही कमी होत चालले आहेत. त्यामुळे कोणाशी तरी बोलण्याची निकड जाणवते. 'डिसग्रेसफुली युवर्स'मध्ये लंडनमधील बायकांनी मैत्रीच्या रूपात या प्रश्नाचे उत्तर शोधल्याचे दाखवले आहे. त्यामध्ये त्यांचा 'स्व' ओळखीचा प्रवास सुरू झाला. या वयात आपण एकटे असलो तरी एकाकी नाही, ही भावना हवी.''

गाडगीळ म्हणाले, ''पिढ्यांमधील अंतर व ओढवून घेतलेला एकाकीपणा यामुळे समाजात सध्या एकाकीपणा वाढलेला दिसतो. पुस्तकातून भेटणाऱ्या लंडनमधील महिलांनी आपल्यातील सक्षमता व दोषांची जाणीव करून घेतली आहे. त्यानंतर त्या स्वत:कडे नव्याने पाहू लागल्या. एकमेकींना त्या आधार, दिलासा देऊ लागल्या.''

वय वाढल्यावर आपल्याला गृहीत धरू लागले जाते. त्यामुळे उदासीनता येते; पण स्वत:त बदल घडवता येतात. सपोर्टग्रुपद्वारे मैत्री वाढवता येते. एकमेंकीना आधार देता येतो. आयुष्याची 'सेकंड इनिंग' कशी जगायची, हे पुस्तकात दाखवले आहे, असे केळकर यांनी नमूद केले.

*** वाढदिनी चॉकलेट नव्हे आता पुस्तकांची 'गिफ्ट'**

वाढदिवस म्हणजे बच्चेकंपनींसाठी धम्माल दिवस. वाढदिवसाला मित्रांना चॉकलेट, गोळ्या, पेन्सिल देऊन आनंद वाटत असतात; मात्र गेल्या काही दिवसांत अशा वस्तूंचे वाटप करण्यापेक्षा पुस्तके भेट देण्याचा नवा प्रवाह शाळांमध्ये रुजू लागला आहे. पुस्तकांमुळे ज्ञानात भर पडते. वाचनसंस्कृती रुजण्यास आणि वाढण्यास मदत होते. अशा पुस्तकांची बँक तयार होत असून मुले त्याचा आनंद घेत आहेत.

*** पोस्टाचा 'स्पीड' वाढला**

स्पीड पोस्टाचे वितरण कमीत कमी वेळात व्हावे, यासाठी 'मेल नेटवर्क ऑप्टिमायझेशन प्रोजेक्ट' राबविण्यात येत आहे. यामुळे पुण्याजवळील आठ जिल्ह्यांमध्ये दीड दिवसात तर, देशभरात तीन दिवसांमध्ये वितरण होत आहे, अशी माहिती पुणे विभागाचे पोस्ट मास्तर जनरल कर्नल के. सी. मिश्रा यांनी दिली.

'पोस्ट खात्यातर्फे मेल नेटवर्क ऑप्टिमायझेशन प्रोजेक्टसाठी प्रसिद्ध जर्मन कंपनी मॅकेन्झीचा सल्ला घेण्यात आला आहे. या प्रोजेक्टनुसार देशभरात ८९ स्पीड पोस्ट हब तयार करण्यात आले आहेत. यापैकी पाच हब महाराष्ट्रात आहेत. या नुसार प्रत्येक स्पीड पोस्टचे ट्रॅकिंग केले जात असून, ग्राहकांना वेबसाइटवरून त्याची माहिती मिळू शकेल,' असे मिश्रा म्हणाले. पुणे हब मध्ये पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर, सोलापूर, लातूर आणि उस्मानाबाद या आठ जिल्ह्यांचा समावेश आहे. या एकूण ४३५ किलोमीटरच्या क्षेत्रात ७३८ बुकिंग

**९वी आवृत्ती**




# महाश्वेता

**सुधा मूर्ती**

अनुवाद

**उमा कुलकर्णी**

१४०रु. पोस्टेज २५रु

ती अनुपम लावण्यवती, गरीब शाळामास्तरांची मुलगी.
तो एक देखणा डॉक्टर – घरंदाज, लक्ष्मीपुत्र.
सर्वांच्या मर्जीविरुद्ध त्यानं तिच्याशी लग्न केलं. परंतु दुर्दैवानं काही महिन्यांतच तिच्या अंगावर कोडाचा पांढरा डाग उमटला आणि साऱ्या घरादारानं त्या अभद्राला घाबरून, किळसून तिला माहेरी हाकलून लावलं — कचराकुंडीत घाण फेकावी, तसं !....
.... पुढे तिनंही आपलं स्वतंत्र अवकाश उभारलं.
मात्र काही काळानं तो आतल्या आत तडफडू लागला –'तिच्याऐवजी आपल्याला कोड फुटलं असतं, तर तिनं आपल्याला असंच टाकून दिलं असतं का?....'
काय असते या वास्तवातली तडफड?... काय असू शकतो अशा गोष्टींचा शेवट?....
कन्नड साहित्यातील श्रेष्ठ लेखिका सुधा मूर्ती यांनी या कादंबरीत पारंपरिक वातावरणातून आलेल्या व आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या संकटांनी घेरलेल्या तरुणीला वास्तवाचं यथोचित भान देऊन, स्वत:च्या आयुष्याला समर्थपणे आकार देण्याइतकं सक्षम केलं आहे. लेखिकेचे प्रगल्भ विचार व आधुनिक जीवनाशी समन्वय साधणारी दृष्टी, यामुळे या कादंबरीला गहनता प्राप्त झाली आहे.
अनेक भारतीय भाषांत अनुवादित झालेल्या या कादंबरीचा
हा उत्कृष्ट मराठी अनुवाद वाचकांना चटका लावेल व विचारास प्रवृत्त करेल.

सेंटर्स व ५६७ डिलिव्हरी सेंटर्स आहेत. या भागात दीड दिवसांमध्ये वितरण करण्यात यश आले आहे.

*** गडचिरोली जिल्ह्यात मुलींचा जन्मदर राज्यात सर्वाधिक**

अशिक्षितपणाचा ठपका ठेवत ज्यांना आपण मागासलेले समजतो तीच माणसं खऱ्या अर्थानं मोठी आहेत, याचा प्रत्यय २०११ च्या जनगणनेच्या आकड्यांवर नजर टाकल्यास येतो. गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त आणि अविकसित जिल्ह्यात १००० मुलांमागे मुलींची संख्या ९५६ आहे. विशेष म्हणजे राज्यात सर्वाधिक जन्मदर असलेला जिल्हा म्हणून त्याची शासन दरबारी नोंद झाली आहे.

मुलांच्या तुलनेत मुलींच्या सख्येत होत असलेली घट जागतिक चिंतेचा विषय ठरला असला तरी राज्याच्या टोकावर असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींना मुलींचं महत्त्व ठाऊक आहे. आदिवासी समाजात स्त्रियांचा आदर केला जातो. जिल्ह्यात गेल्या पाच वर्षांपासून 'मुली जगवा, समाज घडवा' अभियान राबविणारे 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' या संस्थेचे संयोजक डॉ. सतीश गोगुलवार सांगतात की आदिवासींमध्ये लिंगभेद मुळीच नाही. त्यामुळे तेथे गर्भपाताला वाव नाही.

गर्भपात काय असतो, मुळात हेच इथल्या लोकांना ठाऊक नाही. ते जाणून घेण्याचा प्रयत्नही कुणी करत नाही. मुलाच्या लग्नात वधुपक्षाकडून इथे हुंडा मागितला जात नाही. उलट जन्मापासून मुलीचा सांभाळ करणाऱ्या तिच्या आई-वडिलांना किती त्रास सोसावा लागला असेल, याचे सामाजिक भान ठेवत वरपक्ष वधूपक्षाला हुंडास्वरूपात आर्थिक मदत करीत असतो. शिवाय लिंगभेद नसल्याने मुलीच्या जन्माचाही आनंदोत्सव साजरा केला जातो, असे डॉ. मंदा आमटे म्हणाल्या.

*** ब्रॉडबँडमध्ये पारदर्शकता येणार**

ब्रॉडबँडबाबत ग्राहक आणि ग्राहक संघटनांकडून वारंवार येणाऱ्या तक्रारींची दखल दूरसंचार नियामक प्राधिकरणाने (ट्राय) घेतली आहे. ब्रॉडबँड सेवेत पारदर्शकता आणून ग्राहकांना अद्ययावत माहिती द्यावी, असे आदेश दूरसंचार कंपन्यांना देण्यात आले. दूरसंचार कंपन्याकडून ब्रॉडबँड सेवेत अनेक छुप्या शुल्कांचा अंतर्भाव केला जातो. या शुल्कआकारणीत पारदर्शकता नसते. 'प्लॅन'मधील बदलांची ग्राहकांना माहिती दिली जात नाही, अशा तक्रारी ट्रायकडे आल्या होत्या. ट्रायने या तक्रारींची दखल घेत ब्रॉडबँड प्लॅनची मर्यादा ८० ते १०० टक्के पूर्ण झाल्यावर मोबाईल सेवा पुरवठादार कंपन्यांनी ग्राहकांना एसएमएस किंवा ई-मेल पाठवून अलर्ट देणे सक्तीचे केले आहे.

*** केबीसीचे नवीन पर्व**

छोट्या पडद्यावरील लोकप्रिय आणि बुद्धिमत्तेला चालना देणाऱ्या कौन बनेगा करोडपती या कार्यक्रमाचे आगमन सप्टेंबरमध्ये होत आहे. या वेळेला या कार्यक्रमाची जाहिरात अगदी वेगळ्या ढंगाने करण्यात आली असून सिर्फ ज्ञान ही आपको आपका हक्क दिलाता है अशी मोहीम राबवण्यात येणार आहे. सोनी टीव्हीवरील या कार्यक्रमाच्या नवीन पर्वाला सप्टेंबरमध्ये सुरवात होत आहे. सूत्रसंचालकाच्या भूमिकेत अमिताभ बच्चनच आहेत.




**१३वी आवृत्ती**

# दोस्त

**व. पु. काळे**

१४०रु. पोस्टेज २५रु

दोस्त यामध्ये विविध प्रकारच्या माणसांच्या कथा आहेत.

स्वत:चा, स्वत:च्या कुटुंबीयांचा स्वाभिमान जपणारी, कोत्या स्वभावाची, हट्टी, बेडकासारखे विशिष्ट आखलेले जग असणारी, परिस्थितीवर मात करणारी, तिला शरण जाणारी, चाकोरीबद्ध जीवनाविरुद्ध कंटाळून बंड करणारी... अशी ही माणसे आहेत.

या माणसांचे स्वभाव, त्यांची सुखदु:खे, त्यांच्या समस्या, त्यांची स्वप्ने ही आपल्या आजूबाजूलाच आढळणारी आहेत. त्यांच्या आयुष्यात घडणारे प्रसंग आपल्या आयुष्यात कधीतरी घडलेले असतात किंवा इतरांच्या आयुष्यात त्याचे प्रतिबिंब बघितलेले असते आणि म्हणून ती माणसे आपली वाटतात.

छोट्याशा कथाबीजाचे फुलवत फुलवत भावस्पर्शी कथेत रूपांतर करण्याचे वपुंचे कसब व सामर्थ्य, साध्या सोप्या संवादातून जीवनाचे एखादे तत्त्वज्ञान सांगण्याची त्यांची हातोटी, जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन आपल्याला वेगळेच बळ देतो.

कथासंग्रहाला ज्या कथेचे नाव दिले आहे; त्या कथेत या सर्वांचा परमोच्च बिंदू गाठला गेला आहे.

*** फसव्या 'एसएमएस'चा फंडा बदलला**

'काँग्रॅच्युलेशन, यू हॅव अर्काईव्हड, फाइव्ह लॅक पाउंड्स इन द मायक्रोसॉफ्ट मेगा प्रोमो. टू क्लेम कॉन्टॅक्ट मि. वॉल्टर मर्फी. ई-मेल; मि. वॉल्टर मर्फी २०१० ॲट हॉटमेल डॉट कॉम' अशा आशयाचे एसएमएस पाठवून लोकांना फसविण्याच्या कित्येक घटना घडल्या. परंतु लोकांना फसविणाऱ्या भामट्यांनी एसएमएसचा नवा 'फंडा' शोधला आहे. हृदयाच्या शस्त्रक्रियेसाठी मदतीचे आवाहन करणारे एसएमएस पाठवून मोबाईलधारकांना लुटले जात आहे.

सध्या बहुतेकांच्या मोबाईलवर मदतीचे आव्हान करणारे 'एसएमएस' येतात. 'माझे नाव रीना आहे, मी विवेकानंद स्कूलमध्ये बारावीत शिकते. माझ्या हृदयाला एक छिद्र आहे. ज्यामुळे मी फक्त सहा महिनेच जिवंत राहू शकते. हृदय शस्त्रक्रियेसाठी डॉक्टरांनी २० लाख रुपये खर्च सांगितला आहे. मी तुम्हाला ओळखत नाही; पण हा एसएमएस जर तुम्ही तुमच्या मित्रांना पाठविला तर मला प्रत्येक एसएमएस मागे दहा पैसे मिळतील. जर तुम्हाला एसएमएस फ्री असतील तर किमान दहा लोकांना हा एसएमएस पाठवा. कृपया, या एसएमएसला जोक समजू नका, तुम्हाला जर हा एसएमएस जोक वाटत असेल तर (९८२७५४०६८६, ९९८१९५९४९७) या मोबाईल क्रमांकावर माझ्या पालकांशी बोला. प्लीज या 'एसएमएस'कडे दुर्लक्ष करू नका, प्लीज हेल्प मी... गॉड विल हेल्प यू...' अशा आशयाचा एसएमएस सध्या बहुतेकांच्या मोबाईलवर झळकत आहे. एसएमएस वाचून लोकही भावनेच्या भरात एसएमएस पाठवीत आहेत. एका एसएमएस मागे दहा रुपये बॅलन्स खर्च होत आहे. वर दिलेले दोन्ही क्रमांक चुकीचे असल्याचे सांगण्यात येते. पोस्टपेडधारकांना या 'एसएमएस'चा फटका बसत आहे.

सध्या फसव्या 'एसएमएस'चा सुळसुळाट असल्याने मोबाईल कंपन्यांनी ग्राहकांना आवाहन केले आहे. कुठल्याही एसटीडी कॉलवरून मिसकॉल अथवा एसएमएस आल्यास त्याला उत्तर देऊ नये. कारण, यामुळे मोठ्या प्रमाणात बिल आकारले जाऊ शकते. तसेच ८८८८८८८८८८ या क्रमांकावर कॉल अथवा एसएमएस करू नये.

*** १७ लाख रुपयांच्या बनावट सीडी जप्त**

डेक्कन जिमखाना परिसरातील गरवारे पुलाजवळ बनावट सीडी विक्रेत्यांवर गुन्हे शाखेने कारवाई करत १७ लाख रुपयांच्या सीडी जप्त केल्या आहेत. या प्रकरणी डेक्कन पोलिस स्टेशनमध्ये कॉपीराईट कायद्याखाली गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी फ्लेअर एंटरप्रायझेस कंपनीचे फिल्ड ऑफिसर उमेशकुमार सिंग यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी एजंट कॉर्नर आणि उत्कर्ष बुक

डेपोसमोरील तिघा पथारीवाल्यांवर कारवाई केली.

सुधीर मुकुंद सावंत (वय २४ , गुलटेकडी) , राकेश अप्पा साबळे (वय २५) आणि प्रमोद बाळकृष्ण जोशी (वय ३० , रा. सहकारनगर) यांच्यावर कारवाई करत ६हजार सीडी , ५ हजार ४०० एमपी थ्री आणि ११० अश्लील सीडी जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिस निरीक्षक सुनील देशमुख यांनी दिली.

या प्रकरणी लखन दहिभाते आणि सागर मुकुंद सावंत असे दोघे फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. पोलिसांनी तिघाही दुकानदारांना अटक करून डेक्कन पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

### * अनधिकृत मराठी शाळांवर फौजदारी कारवाई नाही

शासनाची मान्यता न घेता सुरू असलेल्या मराठी शाळांवर यापुढे फौजदारी कारवाई करण्यात येणार नाही. तसेच, सुरू असलेल्या शाळांपैकी शासकीय पात्रता पूर्ण करणाऱ्या व योग्य प्रकारे सुरू असलेल्या सुमारे शंभर शाळांना विनाअनुदान तत्त्वावर मान्यता देण्याचे आश्वासन शालेय शिक्षणमंत्री राजेंद्र दर्डा यांनी दिल्याने या विषयावरून सुरू असलेले मराठी शाळांचे आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. यासंदर्भात शिक्षण हक्क समन्वय समितीचे प्रमुख रमेश पानसे ते म्हणाले, ''शाळांवर फौजदारी कारवाई करण्यास परवानगी देणाऱ्या १९ जून २०१० च्या परिपत्रकात सुधारणा करण्याचे आश्वासन दर्डा यांनी दिले आहे. याशिवाय, आंदोलनकर्त्या शाळांमधील चांगल्या प्रकारे चालविण्यात येणाऱ्या सुमारे शंभर शाळांना स्वयंअर्थसाह्यित विधेयकानुसार विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता देण्याचे आश्वासन दर्डा यांनी दिले आहे.

### * उत्तम कांबळे 'सकाळ'च्या संपादक-संचालकपदी

उत्तम कांबळे आता सकाळचे संपादक-संचालक म्हणून काम करतील. 'सकाळ' समूहात त्यांनी उपसंपादक, ज्येष्ठ उपसंपादक, नाशिक आवृत्तीचे वृत्तसंपादक, संपादक तसेच सकाळ न्यूज नेटवर्कचे संपादक अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. ९ मे २००९ रोजी त्यांची मुख्य संपादकपदी नियुक्ती झाली.

सामान्यांच्या जगण्याच्या लढाईला बळ देण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी केले. अलीकडच्या काळात सर्व शिक्षा अभियान आणि पोषण आहारातील गैरव्यवहार चव्हाट्यावर आणले. बोगस पटसंख्या, बोगस ग्रंथालयांची शहानिशा, सिंचनातील त्रुटी, वसतिगृहांतील अनागोंदी, दुष्काळाची भीषणता आदी विषयही आक्रमकपणे मांडले त्यांची सरकारपातळीवर दखल घेतली गेली.

श्री. कांबळे यांनी पत्रकारितेच्या बरोबरीनेच कथा, कादंबऱ्या, संशोधन ग्रंथ,

काव्यसंग्रह, आत्मचरित्र, ललित लेख, संपादने असे विविध लेखनप्रकार हाताळले ४० हून अधिक पुस्तके लिहून देवदासी प्रथा, भटक्या जाती-जमातींचे वेगळेपण, कर्जाच्या विळख्यात सापडलेला शेतकरी आणि त्यांच्या आत्महत्या इथपासून ते जागतिकीकरण आणि त्याचे परिणाम असे विविध विषय आणि प्रश्न हाताळले सांगलीतील साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष व नंतर ठाण्यातील साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद ही मानाची पदे त्यांनी भूषविली. साहित्य क्षेत्रातील ५० तर पत्रकारितेच्या क्षेत्रातील ४० पुरस्कारांचे ते मानकरी आहेत.

*** शशी थरूर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन**

''भारतामध्ये येणाऱ्या घुसखोरांची संख्या मोठी आहे. भारत हा आतिथ्यशील देश असला तरीही घुसखोरांवर नियंत्रण आणण्याची गरज आहे. त्यासाठी इतर देशांप्रमाणेच भारतातही रेफ्युजी ॲक्ट बनविण्याची आवश्यकता आहे'' असे मत माजी परराष्ट्र मंत्री शशी थरूर यांनी व्यक्त केले.

थरूर यांच्या 'पॅक्स इंडिया : इडिया अँड द वर्ल्ड ऑफ ट्वेंटी फर्स्ट सेंच्युरी' या पुस्तकाचे प्रकाशन सिंबायोसिसचे संस्थापक डॉ. शां.ब.मुजुमदार यांच्या हस्ते झाले. भारताचे माजी राजदूत तात्मिझ अहमद, लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल ए.के.सिंग, ज्येष्ठ पत्रकार दिलीप पाडगावकर, सिंबायोसिसच्या प्रधान संचालक डॉ. विद्या येरवडेकर, कुलगुरू डॉ. भूषण पटवर्धन उपस्थित होते. प्रकाशनानंतर पाडगावकर यांनी डॉ. थरूर आणि अहमद यांच्याशी संवाद साधला

''भारतामध्ये नेपाळ, श्रीलंका, बांगलादेशातून मोठ्या प्रमाणावर घुसखोर येतात. मात्र, या घुसखोरांची कायदेशीर नोंदणी करून त्यांच्या देशामधील परिस्थिती सुधारली की त्यांना परत पाठविले पाहिजे.''

आपले सर्व देशांशी चांगले संबंध आहेत. आपण जागतिक राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. आपल्याकडील अंतर्गत घडामोडींचा परिणाम आपल्या परराष्ट्र धोरणावर दिसून येतो, असेही डॉ.थरूर यांनी सांगितले.

'परराष्ट्र नीती कशी ठरविण्यात येते, त्यातून नेमके काय साध्य होते. याविषयीची सर्व माहिती डॉ. थरूर यांच्या पुस्तकामधून मिळेल,' असे अहमद यांनी सांगितले. तसेच, अमेरिकेने सुरुवातीपासूनच पाकिस्तानला मदत करत भारताच्या राष्ट्रहिताविरोधात काम केले आहे' असेही त्यांनी स्पष्ट केले.

'पारंपरिक नीतिमूल्यांच्या जोरावर भारत सुरक्षित आहेच. परंतु आता या पुढे जाऊन 'हार्ड पॉवर'मध्ये वाढ करणे आवश्यक आहे' असे सिंग यांनी सांगितले.

'दहशतवादी हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानावर हल्ला करणे हा पर्याय होऊ शकत नाही. भविष्यात असा हल्ला झाल्यास भारताने हा प्रश्न संयुक्त

राष्ट्रसंघाकडे मांडावा आणि दहशतवादी कारवाया थांबविण्यासाठी पाकिस्तानवर आंतरराष्ट्रीय दबाव आणावा असे डॉ.थरूर यांनी सांगितले.

### * मधू कांबीकरांचा जीवनप्रवास

''मधू कांबीकरांनी आयुष्यात अनेक कटू अनुभव घेतले. पण त्याबद्दलचा राग त्यांच्या मनात नाही. ते सगळे मागे टाकून त्या पुढे जात राहिल्या, हा त्यांचा मोठेपणा आहे. स्वतः दाह सोसून त्या आपल्या प्रेक्षकांना चांदण्याची शीतलता देत राहिल्या,'' असे गौरवोद्गार माजी माहिती आयुक्त विजय कुवळेकर यांनी ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांच्या 'मधुरंग' या आत्मकथनपर पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी काढले. संस्कृती प्रकाशनाने हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. त्याचे शब्दांकन प्रभाकर ओव्हाळ, भास्करराव जाधव आणि लक्ष्मीकांत धोंड यांनी केले आहे.

कुवळेकर म्हणाले, ''शिकायची वृत्ती मधूबाईंकडे आहे. त्यामुळे त्या कलाकार


**३री आवृत्ती**




# स्वत:चा शोध

**ओशो**

अनुवाद
**प्रज्ञा ओक**

१७०रु. पोस्टेज २५रु

एकोणीसशे सत्याऐंशी सालातले ओशोंचे विचार... आणि आता दोन हजार एक मधल्या घटना... खरोखर अनेक क्षेत्रांमध्ये त्यांचे विचार आज तंतोतंत प्रत्ययाला येत आहेत. या तिसऱ्या भागात विश्वाची कोडी उकलताना त्यांनी सृष्टीला भरभरून धन्यवाद दिले आहेत. इतर प्राणिमात्रांपेक्षा मनुष्यप्राण्याचं जीवन हे जास्त रोमांचकारी आहे हे स्पष्ट करताना वारंवार त्यांनी ठामपणे सांगितलंय की हे 'प्रकृतीचं देणं आहे...' ते सांभाळून ठेवा! स्वत:च्या जीवनाची स्वत:च्या हातानं हेळसांड करू नका. आणि त्यासाठी स्वत:चा शोध पहिल्यांदा घ्या. मनुष्याच्या उन्नतीमधला अत्यंत महत्त्वाचा आणि आवश्यक टप्पा म्हणजे **स्वत:चा शोध!**

म्हणून मोठ्या आहेत. प्रत्येक अनुभवाला शब्द मिळतातच असे नाही. त्यांनी रेखाटलेली व्यक्तिचित्रे प्रभावी आहेत.''

''मला मधूबाई गुरू मानतात. पण मी फक्त एक निमित्त आहे. त्यांनी खूप काही भोगले असले, तरी त्याची सल कधीच दिसत नाही, दिसतात ते मन:पूर्वक प्रयत्न,'' असे ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त यांनी सांगितले. ही एक कलाकाराच्या जिद्दीची कहाणी आहे. त्यामुळे त्याचे इतर भाषांत रूपांतर व्हावे. मधू कांबीकरांच्या अभिनयाची रेंज खूप मोठी आहे असे महेश कोठारे म्हणाले.

मनोगत व्यक्त करताना मधू कांबीकर म्हणाल्या, ''गेली तीस वर्षे मी या व्यवसायात उभी आहे याचे श्रेय गुरूंना आणि दिग्दर्शकांना आहे.'' या कार्यक्रमासाठी डॉ.श्रीराम लागू आणि दीपा श्रीराम उपस्थित होते. संस्कृती प्रकाशनच्या सुनीताराजे पवार आणि प्रदीप निफाडकर यांनी मनोगत व्यक्त केले. मधू कांबीकरांचे गुरू पांडुरंग घोटकर उपस्थित होते.

## * मार्क झुकेरबर्गचा नंबर खाली

'फेसबुक'चा सहसंस्थापक मार्क झुकेरबर्गने जगातील पहिल्या दहा अब्जाधीशांच्या यादीतील स्थान गमविले आहे. न्यूयॉर्कमध्ये 'फेसबुक'चा शेअर वीस डॉलरने घसरल्यामुळे झुकेरबर्गला या यादीतून बाहेर पडावे लागले. शेअर कोसळल्यामुळे मार्कच्या संपत्तीत ४२ कोटी डॉलरची घट झाली आहे. सध्या त्याच्याकडील संपत्ती दहा अब्ज वीस लाख डॉलरची असल्याने 'ब्लूमबर्ग' सूचीने नमूद केले आहे. 'एसएएस इन्स्टिटट्यूट' या सॉफ्टवेअर कंपनीचा सहसंस्थापक जेम्स गुडनाईट याने मार्कची जागा घेतली आहे. त्याचा क्रमांक श्रीमंत तंत्रज्ञांच्या यादीत दहावा आहे. 'फेसबुक' या कमालीच्या लोकप्रिय सोशल नेटवर्किंग साईटचा सह संस्थापक असलेल्या मार्क झुकेरबर्ग तरुणपणीच जगातील पहिल्या शंभर श्रीमंतांच्या यादीत दाखल झाल आहे. मार्क इलियट झुकेरबर्ग याचा जन्म १४ मे १९८४ चा. न्यूयॉर्कमधील व्हाइट प्लेन्स या भागात तो वाढला. शाळेत असल्यापासूनच त्याला कॉम्प्युटर क्षेत्रात रस होता आणि शालेय वयात तो 'प्रोग्राम' लिहू लागला. 'कम्युनिकेशन टूल्स' आणि 'गेम' ही त्याची अवडती क्षेत्रे. महाविद्यालयीन शिक्षणासाठी हार्वर्ड विद्यापीठात दाखल झाल्यावर त्याला फेसबुकची कल्पना सुचली. ही साईट तयार करण्यासाठी त्याचे काही मित्रही त्याच्या मदतीला आले. एदुआर्दो सॅव्हरिन, अँड्यू मॅककॉलम, डस्टिन मोस्कोविट्झ आणि ख्रिस ह्युजेस ही त्याच्या मित्रांची नावे. या सगळ्यांनी मिळून काम केले आणि चार फेब्रुवारी २००४ रोजी 'फेसबुक'चा जन्म झाला.

## * ‘सत्यमेव जयते’चा गाजावाजा

आमीर खानचा बहुचर्चित शो ‘सत्यमेव जयते’ १२ सप्टेंबरला संपला. पहिल्या एपिसोडपासून झालेली चर्चा, अँकरच्या रूपात आमीर खानचं दिसलेलं वेगळेपण, प्रेक्षकाला क्षणोक्षणी भावनात्मक करून जाणारे विषय आणि समस्या अशी अनेक वैशिष्ट्ये असलेल्या या शोच्या वाट्याला भरपूर कौतुक आले असले तरी टीआरपी मात्र यथातथाच आला आहे.

मि.पर्फेक्शनिस्ट या आपल्या वकुबाला सार्थ ठरवत आमीर खानने आपल्या पहिल्या टीव्ही शोचे जबरदस्त मार्केटिंग केले. विविध सामाजिक समस्यांवर चर्चा केली. त्याला अनुसरून कधी पंतप्रधान तर कधी संबंधित मंत्र्यांची भेटही त्याने घेतली. समस्येशी निगडीत सूचना त्याने थेट संसदीय समितीपर्यंतही पोहोचवल्या. हे सर्व करताना आमीरची, शोची प्रचंड प्रसिद्धी झाली, तगडे मार्केटिंग, जाहिराती असूनही शोला जेमतेम टीआरपी मिळाला.

सहा मे रोजी शो सुरू झाला तेव्हा तो टीआरपीचे सर्व विक्रम तोडेल असे वातावरण होते. आमीरने स्वत:च्या ‘तलाश’ या सिनेमाचे प्रदर्शनही सहा महिने पुढे ढकलून शोवरच लक्ष केंद्रित केले. पहिल्या एपिसोडच्या आधी देशभर भ्रमंतीही केली. परिणामी पहिल्या एपिसोडचा टीआरपी २.८ वर गेला. तसं प्रत्येक एपिसोडमध्ये फक्त समस्या पाहून प्रेक्षकांना त्यात तोचतोचपणा वाटू लागला. समस्या किती प्रभावीपणे मांडल्या जात असल्या, तरी त्यावर उपाय काय? शो संपल्यानंतर समस्यांचाही विसर पडणार हे लक्षात आल्यावर लोकांनी या शोला अश्रू ढाळण्याचे व्यासपीठ म्हणायला सुरुवात केली.

टीआरपी कमी मिळाला, तरी त्याचा परिणाम निर्मात्यांवर आणि आमीरवर झालेला नाही. ब्रँड आमीरमुळे निर्मात्यांनी भरघोस कमाई केली. त्यामुळे दर एपिसोडमागे आमीरला कोटी रुपये द्यायला त्यांना काही वाटले नाही. टीआरपीची उणीव आमीरच्या मार्केटिंगने भरून काढली. म्हणूनच आमीर शोचा दुसरा सीझन लाँच करण्याच्या विचारात आहे.

## * प्रगल्भ करणारं कथावाचन

‘नवंकोर’ या उपक्रमाअंतर्गत मिलिंद जोशी लिखित ‘पानगळ’ या कथासंग्रहातील काही कथांचं वाचन करण्यात आलं. यावेळी माधवी वैद्य, भानू काळे, संस्कृती प्रकाशनच्या सुनीताराजे पवार आणि लेखक मिलिंद जोशी उपस्थित होते.

या वेळी भानू काळे यांनी म्हटले, प्रत्येक लेखक हा स्वत:च समीक्षक असतो. त्यानं समीक्षकाचे विचार एकून घेऊन आपली लेखनशैली बदलू नये. वाचनीयता आणि रसाळपणा हा वक्तृत्वशैलीचा आविष्कार आहे मिलिंद यांच्या कथांत सामान्य

माणसाचं चित्रण आलं आहे. जगण्यातील सर्वसामान्य विषय घेऊन ते विषयाला वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवतात.

त्यानंतर 'समाधी' आणि 'साठी' या कथांचं वाचन गजानन परांजपे आणि नंदा सुर्वे यांनी केलं. कार्यक्रमाचं निवेदन कवी उद्धव कानडे यांनी केलं.

*** भारतीय संस्कृतीचे मूळ संस्कृत भाषाच**

'संस्कृत भाषा हीच भारतीय संस्कृतीचे मूळ आहे,' असे मत माजी नगरसेविका ज्योत्स्ना देशपांडे यांनी व्यक्त केले. मित्रमंडळ सोसायटीतर्फे आयोजित ह.रा.दिवेकर स्मृती व्याख्यानमालेत 'संस्कृत दिना'निमित्त त्या म्हणाल्या, ''संस्कृत ही अनेक भाषांची जननी असून संस्कृतमुळे भाषाशुद्धी होते.''

या प्रसंगी माधुरी जोशी यांचा स्वरमाधुरी हा भक्तिगीत आणि भजनाचा कार्यक्रम सादर झाला. माधुरी जोशी, संपदा थिटे, शुभदा आठवले, अमिता घुगरी (गायन), अजय पराड (हार्मोनिअम) व पराग हिरवे (तबला) यांनी साथ केली. प्रस्तावना जयंत देशपांडे यांनी केले.

*** दादा जे.पी.वासवानीच्या पुस्तकांचे प्रकाशन**

''सध्याच्या धावपळीच्या युगात अतिलालसेपोटी माणूस खूप धावपळ करतो. ज्याचा आपल्यासाठी उपयोग होणार नाही, त्यासाठीही तो प्रयत्न करतो,'' असे प्रतिपादन दादा जे.पी.वासवानी यांनी केले.

वासवानी यांच्या वाढदिवसानिमित्त क्षमासप्ताह उपक्रमांतर्गत 'थोडी धावपळ कमी करा' या विषयावर आयोजित प्रवचनात ते म्हणाले. ''ऐहिक सुख आणि पैशाच्या लालसेपोटी आपण खूप धावपळ करीत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात ताण-तणाव निर्माण होतात. परिणामी, मुनष्य आपले सुख गमावून बसला आहे. ताणतणावाबरोबरच चिडचिड होणे हाही मोठा आजार आहे. या सर्व धोक्यांपासून बचाव करायचा असेल, तर सकारात्मक विचार करा, भविष्यात होणाऱ्या त्रासाचा वर्तमानकाळात विचार करून मानसिक शांती गमावू नका, लहान मुलासारखे निरागस हाऊन जीवनाचा आनंद मिळवण्याचा प्रयत्न करा आणि जास्तीत जास्त हसतमुख राहण्याचा प्रयत्न करा,'' असा सल्लाही त्यांनी दिला.

प्रवचनानंतर श्रोत्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उत्तरे वासवानी यांनी दिली. याच कार्यक्रमात त्यांनी लिहिलेल्या 'व्हाय बी सॅड' आणि 'हार्ट टू हार्ट टॉक्स' या पुस्तकाचे प्रकाशन उद्योगपती राहुल बजाज यांच्या हस्ते झाले. प्रभा संपत यांनी सूत्रसंचालन केले.

**⁕ डॉ. गोडबोले यांच्या पुस्तकाला पुरस्कार प्रदान**

'समाजजीवन एकसंध होण्यासाठी प्रत्येकाने स्वत्व शोधण्याची गरज आहे. तसे झाल्यास जगासमोरील अनेक गहन समस्या सुटतील,' असे मत डॉ.प्र.चिं. शेजवलकर यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे डॉ.अच्युत गोडबोले यांच्या 'मनात' या पुस्तकाला 'प्राचार्य सोनोपंत दांडेकर पुरस्कार' शेजवलकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. दहा हजार रुपये व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

'मनाचा शोध घेण्याची प्रेरणा अनेकांना असते. मात्र, ही गोष्ट सोपी नाही. साने गुरुजी, डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्यासारख्या विभूतीही स्वतःचा शोध घेण्याचा संदेश देतात त्यामागे निश्चितच काही विचार असतो. आपण स्वतःला ओळखले तर




**११वी आवृत्ती**

# खुळ्याची चावडी

## शंकर पाटील

१४०रु. पोस्टेज २५रु

पाटलांचं सारं साहित्यविश्व शब्दकळेच्या लावण्यानं रसरशीत, चैतन्यमय आणि सालंकृत झालेलं आहे. म्हणूनच त्यांच्या साहित्याला अस्सल मराठी मातीचा सुवास लाभला आहे आणि रसरंगगंधानं ते
चुरचुरीत खमंग झालं आहे.
त्यांची मराठमोळी भाषा, गतिमान निवेदन
आणि चटपटीत संवाद यांच्या लयकारीत
एक खास शैली आहे.
त्यामुळं ते मराठी ग्रामीण कथेचे एक शैलीदार,
कसदार शिल्पकार म्हणून मान्यता पावले असून
त्यांनी मराठी कथाविश्व समर्थ, समृद्ध आणि श्रीमंत
केलं आहे. या साऱ्या गुणधर्मामुळं त्यांच्या साहित्याला लोकमान्यता आणि राजमान्यता मिळाली आहे.

अनेक समस्या सुटू शकतील. त्यासाठी गैरसमज, द्वेष, तिरस्कार यातून मनाला मुक्त करण्याची गरज आहे. गोडबोले यांचा ग्रंथ मराठी भाषेच्या समृद्धीत भर घालणारा आहे,' असे शेजवलकर यांनी सांगितले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेकडून प्राचार्य दांडेकर यांच्या नावाचा पुरस्कार मिळणे ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे, अशी भावना गोडबोले यांनी व्यक्त केली.

*** ॲनिमेशन**

ॲनिमेशन चित्रपटांच्या निर्मितीचे ज्ञान विद्यार्थ्यांना व्हावे, यासाठी 'कृष्ण और कंस' ॲनिमेशन पटाचा काही भाग पुण्यात तयार करण्यात आला. या पटाचे दिग्दर्शक विक्रम वेतुरी, 'दिल्ली सफारी'चे अर्पण गगलानी, 'गुल ए बकावली'चे भाविक ठाकोरे, व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर, ॲनिमेशन तंत्रज्ञ आनंद भानुशाली, राहुल बक्षी, 'आशय फिल्म क्लब'चे सतीश जकातदार उपस्थित होते.

ॲनिमेशन पटासाठी वापरले जाणारे तंत्र सेट तयार करण्याचे तंत्र चित्रकलेचा वापर, 'टू डी' पटाचे 'थ्री डी' मधील रूपांतर या विषयी माहिती देण्यात आली. ''एक ॲनिमेशन पट तयार करण्यासाठी शेकडो हात काम करीत असतात. निर्मितीसाठी काही वर्षे लागतात. ॲनिमेशन ही कला कष्टसाध्य असल्याने ॲनिमेशन पटांसाठी करमणूक करातून सूट मिळणे आवश्यक आहे.

तेंडुलकर म्हणाले, ''ॲनिमेशन पटांना प्रेक्षक मिळत नाही, अशी तक्रार करण्यापेक्षा प्रतिसाद मिळेल एवढी चांगली कलाकृती देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आता या क्षेत्राच्या मदतीला संगणक आहे; पूर्वी वॉल्ट डिस्ने याला एका सेकंदासाठी जिलेटिनच्या पेपरवर अनेक चित्र हाताने काढावी लागत होती. त्यामुळे बरीच सोय झाली आहे.

*** 'सुंदर ते झाड'**

देव आणि झाड यांचे अस्तित्व सारखेच आहे. झाडांमुळेच माणसाचे जीवन समृद्ध झाले आहे. परंतु आपण स्वार्थासाठी झाडांचा जीव घेतो. मानवजात टिकवायची असेल, तर झाडांवर देवासारखे प्रेम करा, असा संदेश शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी पंडित राजू सवार लिखित 'सुंदर ते झाड' चे प्रकाशन करताना दिला. यावेळी ज्येष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर, वसुंधरा उत्सवाचे संस्थापक सुभाषचंद्र डांगे, स्वदेशी मार्केटिंगचे रमाकांत गायकवाड उपस्थित होते.

पुस्तकाच्या माध्यमातून पर्यावरणाचे धडे देण्याचा प्रयत्न केला आहे. वारीक यांच्या मुखातून हे अभंग महाराष्ट्रात आणि देशभरात पोहोचले तर क्रांती घडेल असे लेखक पं. राजू सवार म्हणाले. तेंडुलकर म्हणाले, माध्यमांसमोर झळकण्याकरिता

अनेकजण वृक्षारोपणाचे कार्यक्रम राबवितात. लाखो झाडे लावण्याचा घाटही घालतात; परंतु कार्यक्रमानंतर झाडांकडे कोणीही पाहत नाही. स्वार्थीपणाची भावना वाढत असल्याने झाडे कापण्याच्या घटना वाढत आहेत. त्याचा प्रतिकूल परिणाम पावसावर झाला आहे.

### * कॉग्निझंटने इन्फोसिसला मागे टाकले

देशातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील दुसरी मोठी कंपनी कॉग्निझंट झाली असून, इन्फोसिस टेक्नॉलॉजीला या कंपनीने मागे टाकले आहे. अर्थात, उत्पन्नाच्या आधारावर कंपनीस हे स्थान मिळाले आहे. कॉग्निझंट कंपनीस एप्रिल ते जून या कालावधीत १.७९ अब्ज डॉलर (९९३८ कोटी रुपये) उत्पन्न मिळाले आहे. या कालावधीत इन्फोसिस कंपनीने विप्रो या कंपनीस मागे टाकत तिसरे स्थान पटकावले होते. तीन जून रोजी संपलेल्या तिमाहीत कॉग्निझंट कंपनीचा नफा २१ टक्क्यांनी वधारून २५.१९ कोटी डॉलरवर पोचला आहे. २०११ च्या तुलनेत २० टक्के वाढीसह या वर्षी उत्पन्न किमान ७.३४ अब्ज डॉलर राहील, असा अंदाज आहे.

### * ज्ञानोत्सव प्रदर्शनाचे उद्‌घाटन

केवळ यमक जुळवून भाष्य कविता, वात्रटिका करता येत नाही. भाष्य कविताकारास तत्कालीन समाज, अर्थव्यवस्था यांचा अभ्यास असावा लागतो, असे मत कवी रामदास फुटाणे यांनी आचार्य अत्रे सभागृहात ज्ञानगंगा संस्थेच्या वतीने आयोजित ज्ञानोत्सव २०१२ पुस्तक प्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी व्यक्त केले. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी यांनी फुटाणे यांची मुलाखत घेतली. चित्रकलेचे शिक्षक, चित्रपट निर्माता, कवी, वात्रटिकाकार असा जीवनप्रवास फुटाणे यांनी उलगडला. सकाळचे वृत्तसंपादक माधव गोखले प्रमुख पाहुणे म्हणून या वेळी उपस्थित होते.

फुटाणे म्हणाले, वात्रटिकेला आपण भाष्य कविता म्हणतो. यात केवळ टीका अपेक्षित नाही. भाष्य कवीला वैचारिक बैठक असावी लागते. प्रचंड अभ्यास असेल तरच तुम्ही एखाद्याविषयी अचूक भाष्य करू शकता. भाष्य कवीला तत्कालीन समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था, विचारप्रणाली यांचे ज्ञान, योग्य आकलन हवे. व्यवस्थेविषयीचे निश्चित विचार हवेत. शरद पवार, बाळासाहेब ठाकरे यांच्यापासून अनेक राजकारण्यांबद्दल, सामाजिक बदलांवर त्यामुळेच आपल्याला योग्य पद्धतीने भाष्य करता आले.

आचार्य अत्रे आणि दत्तू बांदेकर यांच्या लेखनापासून आपल्याला प्रेरणा मिळाली. सुरवातीला चित्रकलेचा शिक्षक व त्यानंतर दादा कोंडके यांच्या मैत्रीतून चित्रपट

निर्माता असा प्रवास घडला. खिशात पैसे नसताना 'सामना' चित्रपट करण्याचे धाडस केले. कटपीस ही कविता गाजली. त्यानंतर भाष्य कवितांच्या कार्यक्रमांनी कवितांचा प्रवास सुरू झाल्याचे फुटाणे यांनी सांगितले. साहित्यिकांनी राजकारण्यांचा द्वेष करून स्वत:ला धन्य मानू नये, असेही ते म्हणाले. ज्ञानगंगाचे संचालक उमेश पाटील यांनी स्वागत केले, अंजली कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.


*** संशोधक सोळा कोटींचा धनी**

भारतामध्ये मूलभूत संशोधनाला फारसे महत्त्व दिले जात नाही, अशी समजूत आहे. परंतु प्रसिद्धीच्या मागे न लागता मूलभूत संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांचीही संख्याही कमी आहे. पदार्थविज्ञान शास्त्रज्ञ अशोक सेन यांना अलीकडेच मिळालेल्या प्रतिष्ठेच्या पुरस्कारामुळे ही बाब अधोरेखित झाली आहे.

सेन हे अहमदाबादच्या हरिश्चंद्र संशोधन संस्थेत सैद्धान्तिक भौतिकशास्त्रज्ञ म्हणून काम करतात. त्यांना संशोधन क्षेत्रातील महत्त्वाचा युरी मिलनर पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार मिळविणारे ते पहिलेच भारतीय आहेत. त्यांच्यासह नऊ जण या पुरस्काराचे मानकरी आहेत. तब्बल तीस लाख अमेरिकी डॉलर्सचा (१६.६ कोटी रुपये) हा पुरस्कार आहे. ही रक्कम नोबेल पुरस्काराच्या रकमेच्या तिप्पट आहे. 'स्ट्रिंग थिअरी' (सूत्र सिद्धांत) हा प्रा. सेन यांच्या संशोधनाचा विषय. गेल्या दोन दशकाहून अधिक काळ ते या सिद्धान्तावर काम करत आहेत. पूंज अभियांत्रिकी (क्वांटम मेकॅनिक्स) आणि गुरुत्वाकर्षण या दोन सिद्धान्ताचे एकत्रित स्वरूप मांडण्याचा प्रयत्न ते करत आहेत. आतापर्यंत मांडण्यात आलेले विविध सूत्र सिद्धान्त हे प्रत्यक्षात वेगवेगळे नसून एकाच सिद्धान्ताचा भाग आहेत, असे सेन यांच्या संशोधनातून दाखवून दिले आहे. निसर्गातील सर्व बलांच्या आकलनासाठी हा सूत्र सिद्धान्त वापरला जातो. 'स्ट्राँग-विक कपलिंग ड्युअॅलिटी किंवा एस-ड्युअॅलिटी' या बाबत मूलभूत संशोधन त्यांनी केले आहे. त्यांनी पार्टिकल फिजिक्स या विषयात पीएचडी मिळविली. सुमती राव यांच्याशी ते १९८३ मध्ये विवाहबद्ध झाले. सुमती याही भौतिकशास्त्रज्ञ आहेत. त्यांनी १९८० च्या मध्यात सूत्र सिद्धान्तावर अभ्यास करण्यास सुरवात केली. १९९५ पासून ते हरीश्चंद्र संशोधन संस्थेत काम करत आहेत. सूत्र सिद्धान्ताची प्रयोगशाळेत पडताळणी करायची झाल्यास हिग्ज बोसॉन कणांच्या अस्तित्वाच्या शोधासाठी जीनिव्हातील युरोपियन ऑर्गनायझेशन फॉर न्युक्लिअर रिसर्चमध्ये (सर्न) सध्या निर्माण करण्यात येत असलेल्य उर्जेपेक्षा अब्जावधी पट अधिक ऊर्जा लागेल, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. सेन यांनी आतापर्यंत २०० संशोधन निबंध सादर केले आहेत. नव्या सन्मानाने त्यांच्या कार्याची दखल जागतिक पातळीवर पुन्हा घेतली गेली आहे.

*** गोव्यात भरणार पहिला भारतीय टीव्ही महोत्सव**

दूरचित्रवाणीच्या क्षेत्रात अमेरिका व चीनपाठोपाठ तिसऱ्या क्रमांकाचा उद्योग, ६०० पेक्षा जास्त वाहिन्या, गेल्या पाच वर्षात १२ टक्क्यांहून अधिक वाढ, ५० कोटीहून अधिक प्रेक्षकवर्ग आणि २०११ मध्ये ३३,००० कोटी रुपयांची घसघशीत उलाढाल हे आकडे भारतीय दूरचित्रवाणी इंडस्ट्रीचे सामर्थ्य दर्शवण्यासाठी पुरेसे आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय टीव्ही उद्योगाला पहिल्या क्रमांकावर घेऊन जाण्यासाठी 'इंडियन ब्रॉडकास्टिंग फाउण्डेशन'ने 'इंडियन टीव्ही फेस्टिवल'चे आयोजन केले आहे. हा महोत्सव २ व ३ नोव्हेंबर रोजी गोव्यात होणार असून त्यात देशविदेशातील तज्ज्ञ सहभागी होणार आहेत.




**५वी आवृत्ती**

# अदम्य जिद्द

**डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम**

अनुवाद

**सुप्रिया वकील**

२००रु. पोस्टेज २५रु

'अदम्य जिद्द' हे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी
विविध प्रसंगी, विविध ठिकाणी केलेली भाषणे, संवाद, चर्चा यांचे संकलन आहे.

रामेश्वरच्या सागरतीरापासून ते राष्ट्रपती भवनापर्यंतच्या त्यांच्या विलक्षण जीवनप्रवासाचे लख्ख प्रतिबिंब यात उमटले आहे. 'अदम्य जिद्द' हे आहे त्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोनाचे व चिंतनाचे सार.

विकसित भारताचे स्वप्न पाहणाऱ्या एका थोर, द्रष्ट्या नेत्याचा कणखर आदर्श या पुस्तकात पाहायला मिळतो.

हा आहे एका मूल्यप्रेमी, देशभक्त, सच्च्या ज्ञानोपासकाच्या नितळ काळजाचा उत्कट उद्गार! अनेक घटना, प्रसंग, कथा, सुविचार यांची ओघवती माला गुंफत

डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम आपल्याला एका चिंतनशील विचारवंत, वैज्ञानिक, शिक्षक व राष्ट्रपती अशा विविध भूमिकांमध्ये भेटतात, त्यांतून त्यांच्या व्यक्तित्वाचे मार्गदर्शक व प्रेरणादायी असे विविध पैलू झळाळून उठले आहेत.

हे अनमोल विचारधन सर्वांनाच विचारास प्रवृत्त करणारे व आदर्शवत आहे.

जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीतील एका महत्त्वाच्या उद्योगाचा सोहळा म्हणून आपण हा महोत्सव भरवत आहोत. हे एक अभिनव व्यासपीठ असून तिथे भारतीय तसेच परदेशी प्रसारण उद्योगाला पॅनल चर्चा आणि विविध व्याख्यानांतून आपापल्या संकल्पनांची देवाणघेवाण करता येईल. या महोत्सवात अँडी बर्ड, जॉन्सन, जेम्स मरडॉक, सुभाष चंद्र आदी मान्यवरही सहभागी होणार आहेत. या आयोजनामागील मुख्य हेतू भारत आणि इतर देशांतील टीव्ही क्षेत्रातील मंडळींना एका छताखाली आणणे हा आहे, असे आयबीएफचे अध्यक्ष उदय शंकर यांनी सांगितले.

या टेलिव्हिजन फेस्टिव्हलमध्ये विविध विषयांवरील चर्चासत्रे आणि व्याख्याने यांचा समावेश असून व्यवसायाच्या संधीही उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यासाठी खास जागाही महोत्सवात ठेवण्यात आली आहे.

या महोत्सवाविषयीची माहिती www.indiantvfest.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## * ज्येष्ठ शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांची इच्छा

ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी संस्कृत दिनाच्या निमित्ताने त्यांचे संस्कृतशी असणारे नाते उलगडले आणि उपस्थितांशी संवाद साधला. डॉ. सदानंद मोरे , रवींद्र गोडबोले, ज्येष्ठ पत्रकार विनय हर्डीकर आदी या वेळी उपस्थित होते. प्रभात रस्त्यावरील भारती निवास सोसायटीच्या सभागृहात हा कार्यक्रम झाला.

'संस्कृत दिवसाच्या औचित्याने हे व्यासपीठ सुरू केले आहे. संस्कृतमधील ज्ञान , तत्त्वज्ञान , काव्य, सुभाषिते, नाटक , विनोद व लोकवाङ्मय हे सर्व ज्ञानसौंदर्य व आनंदाचा खजिना सर्वांसाठी खुला करण्याचा हेतू आहे. संस्कृत ठराविक वर्गाच्या वर्चस्वाची भाषा असल्याचा गैरसमज दूर करुन ती सर्वसामान्यांपर्यंत पोचविण्यासाठी या माध्यमातून प्रयत्न केला जाणार आहेत ,' असे डॉ. मोरे यांनी सांगितले.

## * 'क्युरिऑसिटी' उलगडणार मंगळाचे अंतरंग

अमेरिकेतील अवकाश संशोधन संस्था 'नासा'ने आपला एकेकाळचा सर्वात मोठा प्रतिस्पर्धी असलेल्या रशियासह अनेक देशांची मदत घेऊन आखलेल्या मंगळ मोहिमेचा पहिला टप्पा 'क्युरिऑसिटी रोव्हर' मंगळावर उतरल्याने यशस्वी झाला आहे. शीतयुद्धानंतर रशियाबरोबर काम करण्याची अमेरिकेची ही पहिलीच वेळ होती. गेल्या आठ वर्षांपासून या मोहिमेवर अखंडपणे काम सुरू होते. मंगळावर जीवसृष्टी आहे का? तेथील वातावरणात सूक्ष्म जीव राहू शकतात का? तेथील

वातावरण कसे आहे? पाणी आहे का? कार्बनची संयुगे आहेत का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे 'क्युरिऑसिटी' हे यान शोधणार आहे.

मंगळाच्या पृष्ठभागावर उतरल्यानंतर काही वेळातच 'क्युरिऑसिटी'ने पृष्ठभागाची तीन छायाचित्रे पृथ्वीवर पाठविल्याने शास्त्रज्ञांचा उत्साह दुणावला. गेल्या वर्षी २६ नोव्हेंबर रोजी हे यान अंतराळात सोडण्यात आले होते. एखाद्या छोट्या मोटारीच्या आकाराएवढ्या या उपग्रहासाठी २.५ अब्ज अमेरिकी डॉलर खर्च आला आहे. आतापर्यंतचे हे अत्याधुनिक यान आहे. सुमारे ५६ कोटी किलोमीटरचे अंतर पार करून यान मंगळाच्या वातावरणात पोचले. मंगळावर २०३०पर्यंत मानव पाठविण्याचे उद्दिष्ट 'नासा'ने ठरविले आहे, त्याची तयारी म्हणून या मोहिमेचे विशेष महत्त्व आहे. यानात विविध उपकरणांबरोबर पृथ्वीची माहिती असणारी 'चिप'ही पाठविण्यात आली आहे. त्यात ५९,०४१ भारतीय नावेही समाविष्ट आहेत.

*** 'अ ब्युटीफुल ट्रुथ - द आर्ट ऑफ ग्रुमिंग' पुस्तकाचे प्रकाशन**

'मिस इंडिया' किताब मिळाल्यानंतर लोकांकडून मिळालेले प्रेम... झगमगत्या दुनियेत स्वतःला कधीच हरवून न घेण्यासाठी केलेली धडपड... वेगवेगळ्या मुलाखती, कार्यक्रम अन् व्याख्यानांच्या माध्यमातून आरोग्याची काळजी कशी घ्यावी यासाठी केलेले प्रयत्न... अशा जुन्या आठवणींना उजाळा देत माजी 'मिस इंडिया' डायना हेडन हिने 'योग्य आहार, चांगले कपडे, सुसंवाद, चेहऱ्याला साजेसा 'मेकअप' या सगळ्या गोष्टी व्यवस्थित असतील तर आपले व्यक्तिमत्त्व अधिक खुलून दिसते. तसेच स्वतःमध्ये खूप मोठा आत्मविश्वास निर्माण होतो,' अशा चांगल्या जीवनशैलीसाठीच्या टिप्स दिल्या.

डायना हेडनने लिहिलेल्या 'अ ब्युटीफुल ट्रुथ : द आर्ट ऑफ ग्रुमिंग' या पुस्तकाचे प्रकाशन मेनारा टाउन सेंटर (एटीसी) येथे शनिवारी डायना हेडन व क्रिस्टल होंडाचे अध्यक्ष कौशिक कोठारी यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी 'एटीसी'च्या मार्केटिंग विभागाचे अध्यक्ष तुषार मेहता उपस्थित होते. पुस्तकातील काही भागाचे वाचन केल्यानंतर डायनाने प्रेक्षकांशी संवाद साधला.

डायना म्हणाली, ''पुस्तकासाठी मी तब्बल अडीच वर्षे अभ्यास केला. त्यासाठी संशोधन, तज्ज्ञांशी चर्चा व माझ्या कामाच्या अनुभवाचा आधार घेतला आहे. लेखनाच्या काळामध्ये मी कोणताही कार्यक्रम न स्वीकारता केवळ पुस्तकावर लक्ष केंद्रित केले होते. पुस्तकात त्वचा, केस व शरीराची काळजी कशी घ्यावी; कपडे, सौंदर्य प्रसाधने कोणत्या प्रकारची वापरावीत; कोणत्या प्रकारचा आहार घ्यावा; व्यक्तिमत्त्व विकासासाठी उत्तम राहणीमान कसे आवश्यक आहे, या सगळ्या गोष्टींचा विचार करण्यात आला आहे.''

### * चंदावरकरांचा लघुपट 'बिल्डिंग ब्रिजेस'

'बिल्डिंग ब्रिजेस : पुणे-लाहोर-पुणे' हा लघुपट भारत व पाकिस्तान या दोन्ही देशांमधील सांस्कृतिक देवाण-घेवाण वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरेल.' असे मत दिग्दर्शक श्याम बेनेगल यांनी व्यक्त केले.

'सकाळ टाइम्स'चे निवासी संपादक राहुल चंदावरकर यांच्या 'बिल्डिंग ब्रिजेस पुणे-लाहोर-पुणे' या लघुपटाचे सादरीकरण फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (एफटीआयआय) मध्ये करण्यात आले. याप्रसंगी १९७१च्या भारत-पूर्व पाकिस्तानच्या युद्धाचे चित्रीकरण करणारे फिल्म डिव्हिजन ऑफ इंडियाचे प्रेम वैद्य, फाळणीपूर्वी सिंध प्रांतातील सुक्कुर येथे जन्मलेल्या आणि सध्याच्या मनुष्यबळ संसाधन तज्ज्ञ माधुरी शेठ आणि लाहोरच्या शासकीय महाविद्यालयात शिक्षण घेतलेल्या कुलबीर दौड यांचा बेनेगल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सेंट व्हिन्सेंट हायस्कूलच्या शिक्षिका सेलिन डिसा यांच्यासह 'जिसने लाहोर नहीं देखा...' या नाटकातील कलाकारांचाही विशेष गौरव करण्यात आला.

बेनेगल म्हणाले, ''राहुल यांना चित्रपट निर्मितीमध्ये आवड असेल, असे वाटले नव्हते. लघुपटाच्या सादरीकरणाचे निमंत्रण मिळाल्यानंतर ती 'होम फिल्म' असेल असे वाटले; परंतु प्रत्यक्षात हा लघुपट त्यापेक्षा खूप चांगला आहे. पाकिस्तानशी संबंधित अशा पद्धतीच्या फिल्म जास्तीत जास्त होणे गरजेचे आहे.''

चंदावरकर म्हणाले, ''लाहोरमधील नागरिक, त्यांचे राहणीमान, खान-पान या सर्व गोष्टी आपल्यासारख्याच आहेत. आपल्या कलाकारांनी आपली कला तिथे सादर केल्यानंतर अल्पावधीतच पाकिस्तानच्या 'स्ट्रिंग्स' या बँडने पुण्यात कोरेगाव पार्क येथे कार्यक्रम केला. ही बाब दोन्ही देशांच्या दृष्टीने चांगली आहे.''

### * नॅशनल नॉलेज नेटवर्क देणार संशोधनाला बळ

''येत्या दहा वर्षांत शिक्षणक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होणार आहेत. या संदर्भात पाच महत्त्वाची विधेयके सरकारने तयार केली आहेत. यापैकी काही विधेयकांना संसदेच्या पावसाळी अधिवेशनामध्ये मान्यता मिळण्याची शक्यता आहे,' अशी माहिती केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी दिली.

'उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या आपल्याकडे कमी आहे. ही संख्या वाढविण्याबरोबरच शिक्षणाचा दर्जा सुधारण्याचीही आवश्यकता आहे. यासाठी नॅशनल नॉलेज नेटवर्क तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे. याअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, प्रयोगशाळा, ग्रंथालये एकमेकांना जोडण्यात येणार आहेत. आंतरविद्याशाखीय संशोधनासाठी हा प्रकल्प फायद्याचा ठरेल.

'भविष्यात कुशल मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता असणार आहे. त्यासाठी पंतप्रधान राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाअंतर्गत विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास समन्वय समितीची स्थापनाही नुकतीच करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्षाला कॅबिनेट मंत्रिपदाचा दर्जा देण्यात आला आहे,' असेही डॉ. जाधव यांनी सांगितले.

'एमआयटी' च्या वाटचालीत महत्त्वाची भूमिका बजावलेल्या नऊ व्यक्तींचा माईर्स एमआयटी स्थापना दिन पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. डॉ. विश्वनाथ कराड, प्रा. डॉ. पांडव आदींनी मनोगत व्यक्त केले.

### * राज्यात पक्ष्यांच्या २६६ जाती

विविध प्रकारची भौगोलिक रचना, हवामान आणि वसतिस्थानांमध्येही वैविध्य असलेल्या महाराष्ट्रामध्ये पक्ष्यांच्या २६६ जाती वास्तव्यास आहेत. १ लाख ३० हजार ४०० पक्ष्यांची नोंद महाराष्ट्र पक्षिमित्र संस्थेने घेतलेल्या महागणनेमध्ये झाली आहे. यंदा २२ ते २९ जानेवारी दरम्यान राज्यात पक्षिगणना घेण्यात आली होती. राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये ही गणना घेण्यात आली. यात तीनशेहून अधिक पक्षीप्रेमी तर १२ स्वयंसेवी संस्था सहभागी झाल्या होत्या. शहर आणि ग्रामीण भागातील गवताळ प्रदेश, धरणे, तलाव, समुद्रकिनारे, चिखलीय प्रदेश, खारफुटी जंगल, शहरे, बागा अशा विविध अधिवासातील पक्ष्यांची माहिती घेण्यात आली.

'महागणनेत जळगावामध्ये सर्वाधिक म्हणजेच ५९हजार ६८८ पक्ष्यांची नोंद झाली. त्या पाठोपाठ सोलापूर ३० हजार ४९६ आणि भुसावळमध्ये २३ हजार ५८० पक्ष्यांची नोंद झाली. या संपूर्ण गणनेत एकासुद्धा गिधाडाची नोंद झाली नाही. ही बाब गिधाड संवर्धन करणाऱ्यांसाठी नोंद करून ठेवण्यासारखी आहे. काश्मिरी माशीमार जळगाव जिल्ह्यात तर रंगीत करकोचा व पांढुरका हरीण सोलापूर जिल्ह्यात दिसला,' असे आपटे यानी सांगितले.

### * मराठी साहित्यातील समाजदर्शन

''समाज झपाट्याने बदलत आहे. त्यामुळे प्रगतीबरोबरच समाजात फरफटही वाढली आहे. हे समाजजीवन साहित्यात अस्सलपणाने उतरताना दिसत नाही. त्यामुळे लेखकांनी मनाची दारे मोकळी करून लोकांमध्ये वावरायला हवे, त्यांच्यात मिसळायला हवे,'' असे प्रतिपादन साहित्यिक व सामाजिक कार्यकर्ते डॉ. अनिल अवचट यांनी केले.

विचारवंत स. ह. देशपांडे यांच्या स्मृतिदिनानिमित्ताने देशपांडे कुटुंबीयांतर्फे 'मराठी साहित्यातील समाजदर्शन' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले

होते. यात मिलिंद बोकील, मंगला आठलेकर. त्यांच्याशी पत्रकार मुकुंद संगोराम यांनी संवाद साधला.

डॉ. अवचट म्हणाले, ''पुस्तक वाचताना वाचक त्यात रमणे, त्याला बदलायला भाग पाडणे, नवा विचार देणे, त्यातून त्याला जगण्याची रीत मिळणे महत्त्वाचे आहे. ही ताकद फक्त पुस्तकात असते असे नाही, तर एखाद्या कवितेतूनही ती मिळू शकते. कवितासुद्धा वाचकाला झिंग आणते, मूल्यांची चौकट गदागदा हलवते. याला मी खरे साहित्य म्हणतो. भविष्यकाळाचा वेध घेऊन जो लेखन करतो, पुढील समस्या आपल्यासमोर मांडतो तो खरा लेखक होय.''

आठलेकर म्हणाल्या, ''कुठलाही समाज एका अवस्थेत दीर्घकाळ राहत नाही. तो बदलत असतो. हे चित्र साहित्यात उमटत असते; पण सध्या ते किती प्रभावाने उमटत आहे, हा खरा प्रश्न आहे. प्रतिभेची कमतरता आणि वेगवेगळी बंधने या कारणामुळे चौकट मोडून लिहिणे आता कमी झाले आहे.''

बोकील म्हणाले, ''हेतुपूर्वक साहित्यातून समाजदर्शन होतेच, पण निर्हेतुक साहित्यातूनही ते होत असेल तर तो अभ्यासाचा विषय आहे. लेखक जात-धर्म, लिंगभेद किंवा विशिष्ट विचारसरणीचा गुलाम असेल तर त्याच्या साहित्यातून समाजदर्शन होणार नाही.''

*** सामाजिक परिवर्तनचे पुणे हे उगमस्थान**

१९व्या शतकात स्त्रियांचा विकास आणि शिक्षणासाठी पुण्यातील स्त्रियांनी प्रयत्न केले आहेत. त्यामुळे पुणे हे केवळ ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट नाही तर सामाजिक परिवर्तनाला चालना देणारे स्थान आहे, असे मत सिम्बायोसिस विद्यापीठाचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी व्यक्त केले.

लीला पुनावाला फाउंडेशच्या शिष्यवृत्तीचे वाटप मुजुमदार आणि आयकिया फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी पेर हेग्गनेस यांच्या हस्ते झाले. लीला पुनावाला, फिरोज पुनावाला, प्रेरणा कोल्हे, वंदना वर्मा, गुलशन गिडवाणी, वसंत रामास्वामी उपस्थित होते. पेर हेग्गनेस म्हणाले, शिक्षणाने माणुस आत्मविश्वासाने जगायला लागतो. शिक्षणाने योग्य तो निर्णय घेण्याची क्षमता माणसात निर्माण होते.

लीला पुनावाला म्हणाल्या, भारतातील मूलभूत शिक्षणाच्या गरजा भागविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यामुळे मुलींच्या आणि पर्यायाने त्यांच्या कुटुंबाच्या आयुष्यात महत्त्वाचे बदल घडवून आणणे शक्य होणार आहे.

*** देशाच्या समृद्धीसाठी खेड्यांचा विकास करा**

खेड्यांचा विकास झाल्याशिवाय देश समृद्ध होणार नाही. राष्ट्रीय सेवा योजनेच्या

माध्यमातून विद्यार्थ्यांनी खेडी दत्तक घेऊन त्यांचा विकास करण्याचा प्रयत्न करावा, असे मत राष्ट्रीय सेवा योजनेच्या पुणे विद्यापीठ कार्यक्रम समन्वयिका डॉ. शाकेरा इनामदार यांनी व्यक्त केले. वाघोली येथील भारतीय जैन संघटना महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्‌घाटन प्रसंगी डॉ. इनामदार म्हणाल्या, परिश्रमाने मिळविलेले यश महत्त्वाचे असते. परिश्रमाचे धडे राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून मिळायला सुरुवात होते. केवळ पुस्तकी ज्ञानाने माणूस शहाणा होत नाही. व्यावहारिक ज्ञानही गरजेचे असते. या सर्व गुणांचा विकास राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहभागातून होतो. आपल्या विकासाबरोबर देशाच्या विकासाचाही विचार केला पाहिजे. देशाचा विकास होण्यासाठी खेडे समृद्ध होणे गरजेचे आहे.

*** अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शंकर सारडा यांचा साताऱ्यात सत्कार**

कोणत्याही गोष्टीकडे मग ती व्यक्ती असो वा कलाकृती, पूर्वग्रहाने पाहता कामा नये. कोणत्यातरी आदर्शाच्या निकषावर आपण इतरांशी तुलना करायला लागतो, तेव्हा त्यात उणिवाच दिसतात. त्यामुळे कोणत्याही गोष्टीचा स्वीकार हा गुणदोषांसह करावा, हा जे. कृष्णमूर्ती यांचा दृष्टिकोन जीवनात व साहित्यात जीवनभर उपयोगी ठरला, अशा शब्दात ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा यांनी आपले जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगितले.

लोकमंगल शिक्षणसंस्था, मराठी नाट्य परिषद शाखा, लायन्स क्लब ऑफ सातारा गेंडामाळ, महालक्ष्मी व दीपलक्ष्मी पतसंस्था यांच्या वतीने शंकर सारडा यांचा अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त जाहीर सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख, उद्योजक अजित मुथा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ज्येष्ठ साहित्यिक व संशोधक डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर अध्यक्षस्थानी होते.

प्रारंभी लक्ष्मीकांत देशमुख व सौ. प्रमोदिनी मंडपे यांच्या हस्ते शंकर सारडा व सौ. निर्मला सारडा यांचा मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

श्री. सारडा पुढे म्हणाले, ''आयुष्यात साने गुरुजी व जे. कृष्णमूर्ती यांचे मार्गदर्शन व आशीर्वाद मोलाचे ठरले. साने गुरुजींनी मनातील वाचनाची ऊर्मी अधिक बलिष्ठ केली. एका प्रवचनातले जे. कृष्णमूर्ती यांचे मार्गदर्शन जीवनभर उपयोगाचे ठरले. आपले मन विशिष्ट गोष्टींनी बद्ध असते. कोणत्याही गोष्टीकडे आपण त्याच विशिष्ट दृष्टिकोनातून पाहतो. दुसऱ्या चांगल्याशी त्याची तुलना करतो. त्यामुळे मूळ गोष्ट आपल्या समजतच नाही. हाच दृष्टिकोन साहित्यातही उपयोगी ठरला. कोणतीही कलाकृती, कादंबरी मूळ आहे तशी समजून घ्या. जे. कृष्णमूर्ती यांची शिकवणूक आयुष्याचा निकोप आस्वाद घेण्यासाठी, आयुष्याकडे निर्मळ दृष्टीने पाहण्यासाठी

उपयोगी ठरली.''

लक्ष्मीकांत देशमुख म्हणाले, ''शंकर सारडा यांनी पुस्तकांच्या समीक्षेतून लेखकाच्या जमेच्या बाजू वाचकांपुढे आणल्या. त्यांचे कार्य लेखकांसाठी दीपस्तंभसारखे आहे. मराठी साहित्याला त्यांनी दिलेले योगदान मोलाचे आहे. लेखकाला चिंतनशील बनवणारा समीक्षक म्हणून त्यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. ग्रंथसत्ता, ज्ञानसत्ता असणारा देश खऱ्या अर्थाने मोठा देश आहे, हे भान सातत्याने दाखवून देण्याचे तसेच समीक्षा, परीक्षण करताना सारडा यांनी लेखकरूपी हिऱ्याला पैलू पाडण्याचे कार्य केले असल्याचे गौरवोद्गार ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख यांनी काढले.

आजच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने 'शंकर योग' आल्याने माझ्यातील साहित्यिक उजळून निघाला आहे. सारडा यांनी समीक्षण करताना माझ्या सारख्या लेखकाला लिखाणासाठी मार्गदर्शन केले आहे. समीक्षा करताना केवळ टीका न करता लिखाणाची स्वागतशीलताही त्यांनी जपली आहे. अनेक लेखकांच्या लिखाणाची समीक्षा करून सारडा यांनी या लेखकांच्या लिखाणातील सामर्थ्य वाचकांपुढे मांडले आहे.

समीक्षेमधून त्यांनी साहित्यिकांना पुढे येण्यासाठी एकप्रकारे हातभारच लावला आहे. साताऱ्यात त्यांच्या प्रयत्नांतून ग्रंथ चळवळ सुरू झाली आहे. माणसाला खरा माणूस बनवण्याचे काम साहित्य बनवत असते. त्यामुळे या चळवळीला खूप महत्त्व आहे. गेल्या ५० ते ६० वर्षात सारडा यांनी मराठी साहित्य चळवळीत फार महत्त्वाचे योगदान दिले आहे असे दत्तप्रसाद दाभोलकर म्हणाले. साधना साप्ताहिकाचे संपादक डॉ. नरेंद्र दाभोलकर, डॉ. विश्वास मेहेंदळे, पुरुषोत्तम शेठ, राजकुमार निकम, शिक्षणाधिकारी मकरंद गोंधळी आदींनी सारडा यांच्या कार्याचा गौरव करणारी भाषणे केली. प्रारंभी शिरीष चिटणीस यांनी प्रास्ताविक केले. शिल्पा चिटणीस यांनी मानपत्राचे वाचन केले.

या सत्काराला जोडूनच दशकातील कादंबरीकार हे चर्चासत्र झाले. त्याचे बीजभाषण समीक्षक संजय भास्कर जोशी यांनी केले. प्रवीण बांदेकर, प्रा. छाया महाजन, कृष्णात खोत, रामचंद्र नलावडे, डॉ. राजेंद्र माते, आनंद विंगकर, अभिराम भडकमकर, सुधीर सुखटणकर, लक्ष्मीकांत देशमुख यांनी आपली मनोगते व्यक्त करुन भावी संकल्प विशद केले. कादंबऱ्यातील प्रकरणांचे अभिवाचन केले. ई-बुक्स, कादंबऱ्यांचे मार्केटिंग, अनुवाद प्रक्रिया यावर विवेक चितळे आणि मिलिंद जोशी यांनी मार्गदर्शन केले.

❐

# उत्सव पुस्तकांचा

## वाचकांना सस्नेह आमंत्रण!

**दि. १ ते १० ऑक्टोबर २०१२**
**वेळ सकाळी ९.३० ते रात्रौ ८.००**



# वाचकांना आमची सर्व पुस्तके ३५% सवलतीत

मेहता पब्लिशिंग हाऊस
१९४१ सदाशिव पेठ,
माडीवाले कॉलनी
पुणे ४११ ०३०

*स्वामी, श्रीमानयोगी, संभाजी,
ययाती, रुचिरा भाग १, २
व वितरणाची पुस्तके सोडून



# शंकर सारडा यांच्या मुळे मी लेखक झालो

डॉ. भा. ल. महाबळ

**(अमृतमहोत्सवानिमित्त पुढे तीन लेख देण्यात येत आहेत)**

अलीकडेच मी, सुधाकर अनवलीकर या लेखकाचे 'सहजी संवादिजे' हे मन प्रसन्न करणारे पुस्तक वाचले. त्या पुस्तकातून जोत्स्ना भोळे, ग. दि. माडगूळकर, मनमोहन नातू, पु. ग. सहस्त्रबुद्धे अशा कितीतरी व्यक्तींबद्दल नवीन माहिती मिळाली. त्या पुस्तकाला शंकर सारडा यांची प्रस्तावना आहे. त्या प्रस्तावनेमुळे मला शंकर सारडा जास्त समजले व सुधाकर अनवलीकरही समजले.

माझी व सारडांची प्रत्यक्ष भेट योगायोगाने घडली. पुण्याला १९९० साली साहित्य संमेलन झाले. डॉ. यू. म. पठाण हे त्या संमेलनाचे अध्यक्ष होते. त्या साहित्य संमेलनाला, एक साहित्यप्रेमी म्हणून मी गेलो होतो. पुण्याला माझे धाकटे चुलत बंधू श्रीकृष्ण भास्कर म्हणजे श्री. भा. महाबळ राहात होते. ते किर्लोस्करचे संपादक होते. (२०१० साली निधन पावले.) श्रीभांचे पूर्ण नाव मी लिहिले याचे कारण माझे भा. ल. महाबळ व त्यांचे श्री. भा. महाबळ हे नाव तसे थोडे सारखे असल्याने व आम्ही दोघेही लिहित असल्याने, दोघांच्या लिखाणांची बेरीज होऊन, आम्ही दोघेही भरपूर लिहितो असा आभास निर्माण होई व दोघांनाही त्याचा फायदा मिळे. श्री. भा. महाबळ गेल्याने मी या फायद्याला मुकलो.

मूळ मुद्दा मागेच राहिला. पुण्याच्या त्या साहित्य संमेलनाच्या प्रवेशद्वारापाशी शंकर सारडा व श्री. भा. महाबळ यांची गाठ पडली. ते दोघेही परस्परांना उत्तम ओळखत होते हे मला त्यांच्या संभाषणातून समजले. श्रीभांनी माझा शंकर सारडांशी परिचय करुन दिला. ''माझे बंधू भा. ल. महाबळ. हे मुंबईला व्हिजेटिआयमध्ये प्राध्यापक आहेत.'' शंकर सारडा हे नाव ऐकल्यावर मी आनंदून गेलो. महाराष्ट्र टाइम्सची रविवारची पुरवणी ही साहित्यिक दृष्टिकोनातून दर्जेदार निघत असे. शंकर सारडा त्या पुरवणीचे संपादन करत हे सर्व वाचकांना माहित होते.

पण मी खरा आनंदून गेलो, नव्हे थक्क झालो ते शंकर सारडांनी मला लेखक

म्हणून ओळखले यामुळे. सारडा श्रीभांना म्हणाले, ''मी भा. ल. महाबळ यांना ओळखतो. ते एके काळी हंस, मोहिनी, किर्लोस्कर या मासिकात लिहित होते.''

मी १९४९ ते १९५३ या काळात सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजचा विद्यार्थी होतो. बीएससी झाल्यानंतर मी दोन शाळांत शिक्षकाची नोकरी केली. १९५५ साली मी सांगलीच्या वालचंद कॉलेजचा विद्यार्थी बनलो. मी इंजिनिअर झालो. एक लेखक झालो व त्याच कॉलेजात नोकरीलाही लागलो. किर्लोस्कर, स्त्री, मनोहर, हंस, मोहिनी, नवल, अमृत, संजय, सह्याद्री या मासिकांतून व विविधवृत्त, स्वराज्य अशा साप्ताहिकांतून १९५१ ते १९६२ या काळात मी लिहित होतो. लिहिण्याची मला आवड होती.

१९६२ साली मी मुंबईला आलो आणि माझा लिहिण्याचा छंद मी विचारपूर्वक बाजूला ठेवला. विश्रामबाग (सांगली) येथील वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजात नोकरी करत असताना मी मिरजेला माझ्या मालकीच्या तीन खोल्यांच्या घरात रहात होतो व नोकरीच्या जागी सायकलने ये जा करत होतो. मी मुंबईला आलो आणि मला राहण्याची जागा ही केवढी दुर्मीळ आणि महागडी बाब हे समजले. हे मी १९६२ सालातील मुंबई विषयी बोलतो आहे. आजच्या २०१० सालातील मुंबई विषयी न बोलणेच बरे! मी मुलुंडला राहण्याच्या तीन जागा बदलल्या. १९६४ ते १९७४ पर्यंत मालकी हक्कावरच्या सहकारी गृहसंस्थेतील सदनिकांच्या किंमती चौरस फूट चटईक्षेत्राला २६ रुपये ते ९० रुपये एवढ्या वाढल्या. या किंमतीही तेव्हा डोळे फिरवणाऱ्या वाटत. आज मुलुंडला जागेचा दर चौरस फुटास १०,००० रु. एवढा आहे! मी ५२००० रुपये किंमतीच्या हजार चौरस फूट जागेत राहतो. त्या जागेची आजची किंमत एक कोटी रुपये आहे. एवढ्या मोठ्या किंमतीच्या जागेत मी राहतो आहे याचा मला सखेदानंद वाटतो. आनंद अशा करता की मी १९६२ साली मुलुंडमध्ये आलो व म्हणूनच छोटीशी, २२० चौरस फूटांची महिना साठ रुपये भाड्याची जागा घेऊन मी रुजू शकलो. खेद या गोष्टीबद्दल की आज मिरजेहून कोणी मुंबईत नोकरी मिळवून येऊ म्हणेल तर तर त्याला मुंबईत राहण्याकरिता भाड्याने जागाच मिळणार नाही. आणि आमच्या मालकीच्या जागेच्या किंमती डोळे फिरवणाऱ्या नाहीत तर डोळे मिटवणाऱ्या आहेत. डोळे मिटल्यावर मुंबईत राहण्याचा प्रश्नच उद्भवत नाही हा भाग वेगळा!

सांगायचा मुद्दा हा की १९६२ साली, मुंबईत आल्यावर मी माझी सर्व शक्ती सहकारी गृहसंस्थेतील, मालकीची मोठी सदनिका मिळवण्याकरता खर्च करावयाची हे निश्चित केलं. म्हणजे पैसे मिळवणं आलं. म्हणजे लेखन बाजूला ठेवणं आलं. इंजिनिअर म्हणून काम करत राहणं प्राप्त झालं!

१९६२ साली ज्यानं लेखन थांबवलं होतं अशा मला, शंकर सारडांनी १९९०

साली माझ्या १९५२ ते १९६२ या काळातील लेखक म्हणून ओळखले याचा मला केवढ्या रिश्टरचा आनंदाचा धक्का बसला असेल याची कल्पना करा. मी कितपत व कसा लेखक आहे, माझ्या मर्यादा काय याची मला पूर्ण जाणीव आहे. मी अफलातून लेखक वगैरे तेव्हा नव्हतो, आजही नाही. तरीही मी शंकर सारडांच्या लक्षात होतो याचा अर्थ शंकर सारडा हे साहित्यविश्वातील बारीकसारीक, किरकोळ घडामोडीही ध्यानात ठेवणारे सहृदय साहित्यदर्दी आहेत हाच होता.

साहित्य संमेलनाच्या प्रवेशद्वारीच त्यांनी मला पुढचा प्रश्न विचारला, ''महाबळ तुमचा एखादा कथासंग्रह वगैरे प्रसिद्ध झाला आहे का?''

मी म्हणालो, ''माझा कथासंग्रह निघालेला नाही. मी प्रयत्नही केलेला नाही. प्रयत्न तरी कसा करणार? माझ्या ओळखीचा कोणी प्रकाशकही नाहीत.''

सारडा सहज म्हणाले, ''तुम्ही तुमच्या कथा माझ्या सातारच्या पत्त्यावर पाठवून द्या.'' त्यांनी सातारचा पत्ताही दिला. माझा व शंकर सारडा यांचा कसलाही पूर्वपरिचय नव्हता. श्री. भा. महाबळांनी करून दिलेला तोच व तेवढाच परिचय.

मी मुंबईला आलो. माझ्या जुन्या कथा शोधल्या. झेरॉक्स प्रत सारडांकडे पाठवून दिल्या. दोन एक वर्षात म्हणजे १९९२ साली, वयाची साठ वर्षे पूर्ण केल्याने मी निवृत्त झालो. चौतीस वर्षे मी इंजिनिअरिंग विषयाची प्राध्यापकी केली होती. लेखनाची आवड बाजूला ठेवली होती. शंकर सारडांच्या भेटीमुळे व त्यांनी सहजपणे माझ्यातील जुन्या लेखकाची मला आठवण करून दिल्यामुळे मी १९९२ सालापासून पुन्हा लिहू लागलो. मुले मार्गाला लागली होती. मुंबईत मला जागा मिळाली होती. लिहिण्याचे टेबल कोठे ठेवायचे हा प्रश्न उरला नव्हता. त्यामुळे निवृत्तीनंतर माझ्या छंदाच्या आड येईल असे काहीच कारण नव्हते. नंतर सारडांचे पत्र आले. तुमच्या कथा मी पुण्याच्या एका प्रकाशकाकडे पाठवल्या आहेत असे कळवले होते. काही दिवसांनी पुण्याच्या दिलीपराज प्रकाशनाच्या राजीव बर्वे यांच्याकडून, सुयोग प्रकाशनातर्फे तुमचा 'नवरा बनवावा तसा बनतो' हा कथासंग्रह प्रसिद्ध होत आहे या आशयाचे पत्र व करारनामा मला मिळाला. त्या पत्रात श्री. बर्वे यांनी मधल्या काळात कथासंग्रह लवकर प्रसिद्ध करण्यासाठी तगादा न लावल्याबद्दल माझे आभार मानले होते. मी श्री. बर्वे यांना एकही पत्र लिहिले नव्हते हे सत्य होते. पण याचे कारण, सारडा यांनी माझे लिखाण बर्वे यांच्या हवाली केले आहे हे मला माहीतच नव्हते!

'नवरा बनावा तसा बनतो' हा माझा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. त्या संग्रहाला महाराष्ट्र शासनाचा विनोद या वाङ्मय प्रकारातील पुरस्कार मिळाला. महाराष्ट्र साहित्य परिषदेचा चिं. वि. जोशी पुरस्कार मिळाला. तुमचे एखादे पुस्तक प्रसिद्ध व्हायला हवे, एखादा तरी पुरस्कार मिळायला हवा. तरच तुम्ही अधिकृतपणे 'लेखक' म्हणून जन्माला येता! माझे हे पुस्तक केवळ शंकर सारडांच्या मुळेच

प्रसिद्ध झाले हे नि:संशय आहे. आपल्या कथा संग्रह रूपात प्रसिद्ध होतात हा शोध मला सारडांमुळेच लागला. त्यानंतर दिलीपराजच्या बर्वे यांनीच माझी चार पुस्तके प्रसिद्ध करून माझा आत्मविश्वास वाढवला. केवळ सारडांच्या मुळेच मला दिलीपराज प्रकाशन भेटले. त्यानंतर माझी तीस पुस्तके प्रसिद्ध झाली.

आजपर्यंत मी शंकर सारडांच्या बरोबर कृतज्ञ भावनेतून संपर्क ठेवून आहे. सल्ला मागितल्यावर, मला तो सारडांच्या कडून सहजपणे मिळतो. लिहित रहा असे उत्तेजनाचे शब्द तर ते उच्चारत असतातच. मी लिहीत राहिलो आहे. लिहिणे ही आता वेगळ्या प्रकारे माझी गरज झाली आहे. निवृत्तीनंतर मला तीन हार्ट ॲटॅक आले. प्रत्येक ॲटॅक नंतर माझे घरी बंदिस्त होत राहणे वाढत गेले. वाचन व लिखाण या छंदामुळे माझा बंदिवास मला जराही त्रासदायक वाटत नाही, नव्हे बंदिवास माझ्या छंदाला उपकारक ठरला आहे. मी न कंटाळता लिहू व वाचू शकतो याचे इंगित माझ्या प्राध्यापकीत आहे. विद्यार्थ्यांच्या पुढे टिकून राहायचे तर वाचणे व फळ्यावर लिहिणे भागच आहे, मी चौतीस वर्षे ते टिकून राहण्याचे काम केले होते. माझ्या वाचनात कितीतरी नियतकालिके व पुस्तके येत असतात. लेखाच्या प्रारंभी मी अनवलीकर यांच्या पुस्तकाचा उल्लेख केला आहे. कितीतरी प्रकाशसमारंभाचे वृत्तांत मी दैनिकातून, साप्ताहिका-मासिकातून वाचतो. कितीतरी वेळा वेगवेगळ्या लेखकांच्या भाषणातून, लिखाणातून, प्रस्तावनातून, अर्पणपत्रिकातून त्यांना शंकर सारडा यांनी उत्तेजन दिले हे माझ्या ध्यानी आले आहे. १९९० साली भा. ल. महाबळ नावाच्या काहीही पूर्वपरिचय नसलेल्या, एकही पुस्तक प्रसिद्ध न झालेल्या लेखकाला शंकर सारडांनी आपणहून, सहजपणे उत्तेजन दिले याचे मला त्याकाळी वाटलेले आश्चर्य आज मला वाटत नाही. कारण असे उत्तेजन देणे हा सारडांचा प्रकृतिधर्म आहे हे मला समजले आहे. मात्र योगायोगाने माझी व शंकर सारडा यांची भेट झाली हे माझे सरळ सरळ सुदैव होते. माझ्यापुरते मी खात्रीपूर्वक म्हणेन की मला शंकर सारडा भेटले नसते तर माझे पहिले पुस्तक प्रसिद्ध झाले नसते. आज मी जितपत लेखक आहे तितपतही झालो नसतो. माझे रोजचे जगणे मला सुखाचे झाले आहे ते माझा वेळ लेखनवाचनात जातो यामुळे. या सुखाचे दान सारडांच्यामुळे माझ्या झोळीत पडले आहे.

भा. ल. महाबळ
१७, चंद्रविजय गृहसंस्था
लो. टिळक रस्ता
मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१
फोन ०२२-२१६३१९४०/३२१९२०३२

❐



# प्रसन्नतेत प्रसन्नतेची प्रसन्न भर

प्रा. डॉ. संतोष मोतीराम मुळावकर

माणसाच्या भेटीची मोठी गंमत असते. भेटीभेटीत माणसांचे अनेक प्रकार उमजतात. काही व्यक्तींची भेट मिळणंच मोठं अवघड असतं; आणि त्यांची भेट झाल्यावर तर अधिक अवघडल्यासारखं होतं. काही व्यक्तींना भेटताना 'भेट नको, पण...' अशी आपली अवस्था होते. अनेकदा भेटूनही काही व्यक्ती भेटल्यासारख्या वाटत नाहीत.

काही व्यक्ती न भेटूनही भेटत राहतात. त्यांच्या प्रत्यक्ष भेटीत तर अनेक गोष्टी आपल्याला भेटत राहतात. आपणही आपल्याला भेटत राहतो. अशा व्यक्तींची भेट असतेच समृद्ध!

समृद्ध भेटीची ओढ आपल्याला असतेच.

म्हणून मी पुण्याला गेलो की शंकर सारडा सरांना भ्रमणध्वनी करत असतो. दि. २१.५.२०१२ ला मी त्यांना भ्रमणध्वनी केला. मी काही बोलण्याआधीच मला ऐकायला आले,

''नमस्कार मुळावकर, तुम्ही पुण्याला आलात का? घरी केव्हा येता?''

नेहमीप्रमाणे संवादाची सुरवात सारडा सरांनीच केली. मी त्यांना 'सर' म्हणतो आणि मानतो सुद्धा. अगदी श्रद्धापूर्वक.

त्यांना फोन करताना बरेचदा मी ठरवतो, ह्यावेळी तार आपण छेडायची... मी तारा जुळवायला लागतो, तर सारडा सरांनी तार आधीच छेडलेली असते.

मला त्यांना सहज भेटायचं असतं. कारण त्यांची सहज भेट सहजसुंदर होत असते. या सहजसुंदर भेटीत मला अशा अनेक गोष्टी भेटतात, ज्या प्रत्यक्ष भेटणं मला शक्य नसतं. सारडा सरांची प्रत्यक्ष भेट म्हणजे अनेकांच्या अप्रत्यक्ष भेटीचं

अकृत्रिम संक्रमण असतं.

दोन वर्षांपूर्वी त्यांच्या झालेल्या भेटीत मला देशोदेशीचे लेखक भेटले होते. ही अप्रत्यक्ष भेट त्यांच्या बोलण्यातून घडलेली होती. गाजत असलेली चांगली चांगली पुस्तके, चांगली नसतानाही गाजत असलेली पुस्तके, चांगली असूनही गाजत नसलेली पुस्तके सारडा सरांनी उलगडून ठेवली होती माझ्यासमोर.

... आणि समीक्षा म्हणजे उलगडा - अगदी साधा, सोपा, आणि सरळ ह्या समीक्षेच्या व्याख्येचा उलगडा झाला होता मला.

समीक्षा केवळ साहित्याची नसते तर साहित्य - व्यवहाराचीसुद्धा असते. हाही उलगडा झाला होता मला. बोलता बोलता हा उलगडा पुस्तकांकडून माणसांकडे संक्रमित झाला होता. पुस्तकांचे जग उलगडता उलगडता पुस्तकांत, पुस्तकांभोवती असणाऱ्या आणि नसणाऱ्या माणसांचं जगही उलगडलं गेलं होत.ह्या उलगड्यात माझ्याही निरीक्षणांना, मतांना स्थान होतं. ह्या उलगड्यात संवाद अधिक होता, श्रोतृत्वाची समान वाटणी होती. त्यामुळे - 'समीक्षा म्हणजे संवाद. समीक्षा असतेच संवादासाठी' - ह्या समीक्षेच्या (नव्या) व्याख्येने आणि कार्याने माझ्याशी संवाद साधला होता.

सारडा सरांशी संवाद साधावा, त्यांना आवर्जून भेटावं असं वाटण्याचं एक प्रसन्न कारण म्हणजे त्यांचं प्रसन्न व्यक्तिमत्त्व.

'शंकर सारडा यांना नेहमी प्रसन्न राहणं कसं जमत?' हा मला पडणारा आणि पडता पडता प्रसन्न करणारा प्रश्न. हा प्रश्नाचा पदर धरून येणाऱ्या 'ते त्यांच्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तीला प्रसन्न करतात हे घडतं कसं?' ह्या उपप्रश्नात उपप्रसन्नता नव्हे तर तेवढीच प्रसन्नता आहे. मी जेव्हा जेव्हा कमालीचा अप्रसन्न होतो तेव्हा तेव्हा मला वाटतं सारडा सरांकडे जावं आणि प्रसन्न होऊन यावं.

'शंकर सारडा नेहमी प्रसन्न का असतात?' हा प्रश्न खरं तर - मोगऱ्याची फुलं नेहमीच सुगंधाची उधळण का करतात? गुलाबाच्या उमलण्यात कोमल गुलाबी ऐट का असते? पावसात भुरभुरती, रिमझिमती, कोसळती भीज का असते? पहाटेच्या कोवळ्या उन्हातून रेशीम हळदेची हळुवार रांगोळी का झिरपत असते? चांदण्यातल्या झाडाच्या काळ्याशार सावलीत चंदेरी कविता का भिनलेली असते? - ह्या प्रश्नांसारखाच आहे. एकतर माणूस मूळातच प्रसन्न असावा लागतो, नाहीतर आपली प्रसन्न वृत्ती विकसित ठेवावी लागते. मला तर वाटते, सारडा सर मुळातच प्रसन्न आहेत आणि त्यांनी आपली प्रसन्न वृत्ती विकसित

ठेवली आहे. मी त्यांना कधी चिडलेलं, रागावलेलं बघितलेलं नाही. पण जर ते कधी चुकून चिडत असतील तर त्यांच्या चिडण्याला प्रसन्नतेची किनार असते. प्रसन्नता गाभ्यात असल्याशिवाय ती किनार गाठत नसते.

शंकर सारडा नावाच्या प्रसन्नतेशी माझी झालेली पहिली भेट 'मनोहर' आहे. त्यांचं मनोहर ह्या नियतकालिकात प्रसिद्ध होणारं लेखन मी वाचत असे. ज्यावेळी मी कथाकवितेची धुळाक्षरं गिरवायला सुरवात केली होती, त्यावेळी शंकर सारडांचे समीक्षण बहरात आलेलं होतं. त्यांचं समीक्षात्मक लेखन विविध साहित्यकृतींमधलं सहजतेनं अभिव्यक्त झालेलं अनभिव्यक्त असलेलं, अभिव्यक्तीच्या अडथळ्यात अडकून पडलेलं किंवा मुळीच नसलेलं तरीही दुराग्रहानं वेगळाच आव आणत असलेलं वेगळेपण अधोरेखित करत होतं. ही समीक्षा वाचल्यावर ही समीक्षा ज्या पुस्तकाची आहे ते पुस्तक वाचून आपलंसं करावं, असं मला प्रकर्षानं वाटत असे. आणि मी 'प्रयत्नांती पुस्तक' मिळवत असे. 'समीक्षा ही वाचकाला वाचनासाठी उद्युक्त करणारी सृजनशील प्रक्रिया आहे. समीक्षा वाचक निर्माण करते, जोपासते, आणि विकसित करते. हे शंकर सारडांच्या समीक्षेतलं प्रसन्न वाचनप्रेरक तत्त्व माझ्यातल्या चोखंदळ वाचकाला दिग्दर्शित करतं होतं.

वाचन हे लेखनाला पोषक आणि पूरक ठरतं. आपण कसं लिहावं, कसं लिहू नये, आपल्या लेखनावर होणारा इतरांचा प्रभाव टाळत लेखनातलं सत्त्व आणि स्वत्व कसं जोपासावं हे वाचनामुळं बऱ्याच अंशी कळतं. माझ्या ह्या आकलनामुळं कदाचित, मला प्रामुख्यानं कथा छान जमायला लागल्या. कथांमधल्या विधायक व्यंगतत्त्वामुळं त्या आवडीनं वाचल्या जाऊ लागल्या. त्या काळात माझं लेखन शंकर सारडांपर्यंत पोहोचलेलं नव्हतं. माझं पुस्तकही आलेलं नहतं. त्यामुळे त्यांनी माझ्या कथांची समीक्षा करण्याचा प्रश्नच नव्हता. अशा परिस्थितीत मी एक नवा मार्ग शोधला. शंकर सारडांनी केलेली समीक्षा आणि संबंधित लेखकांचं पुस्तक मी वाचू लागलो. आणि माझ्या कथांची समीक्षा मी मनाशी करू लागलो. शंकर सारडा हे माझे 'सर' ठरले ते असे. त्यामुळं एक घडू लागलं, माझं लेखन वेगवेगळी नवी वळणं घेऊ लागलं.

तशातच मी वेगळ्या वळणाची 'नशीब' ही कथा लिहिली. आणि 'साप्ताहिक सकाळ'च्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त इ.स. १९८८ मध्ये आयोजित कथास्पर्धेसाठी पाठवून दिली. माझ्या कथेनं पहिलं पारितोषिक पटकावलं. पारितोषिक वितरण सोहळ्यासाठी मी पुण्याला गेलो. तिथं समजलं स्पर्धेचे परीक्षक सारडा सर होते. सोहळा सुरू असताना इतरांच्या बोलण्यातून मला समजलं, हे शंकर सारडा

आहेत. मी त्यांना पहिल्यांदाच पाहात होतो. त्यांना भेटावं का? बोलावं का? ते आपल्याशी बोलतील का? काय बोलतील? ह्या प्रश्नांमध्ये मी गुरफटलेला असतानाच सारडा सर माझ्याकडं आले. ''तुम्हीच संतोष मुळावकर का?'' असा प्रश्न करत माझ्या होकारानंतर माझ्याशी बोलू लागले, ''तुमच्या कथेचं नाव नशीब आहे. पण तुम्हाला पहिलं पारितोषिक नशीबानं मिळालेलं नाही. कथा खूप चांगली आहे. पण, तुम्ही फार मोठा टप्पा गाठला असं समजू नका. पारितोषिक मिळणं ही एक चांगली बाब आहे. पण अनेक जण पारितोषिकावर संपतात. असं होऊ देऊ नका. केवळ स्पर्धेसाठी, पारितोषिकासाठी लिहू नका. पुढं तुम्हाला खूप प्रवास करायचा आहे. लेखन प्रसिद्ध झालं म्हणजे ते चांगलंच असतं असं नाही. खूप चांगलं लिहायचं आहे तुम्हाला. बरीच वर्षं.'' त्यांच्या प्रसन्न पण परखड बोलण्यात माला माझ्या लेखनाची पूर्वसमीक्षा जाणवली. आज जेव्हा मला हा प्रसंग आठवतो तेव्हा लक्षात येतं.'समीक्षा ही लेखकाचं लेखनगतिमत्व प्रेरित करणारी दूरदर्शी, परखड पण तेवढीच प्रसन्न आणि सृजनशील प्रक्रिया आहे. साहित्यकृतीची सर्वांगीण संपन्नता ह्या प्रसन्नतेला अभिप्रेत असते.'

इ.स. १९८८ च्या ह्या भेटीनंतर तब्बल एका तपानंतर म्हणजे इ.स. २००० मध्ये माझी व सारडा सरांची भेट पुण्यात 'लोकमत' मध्ये झाली. मला वाटलं, त्यांना माझी ओळख सांगावी लागेल. पण तसं घडलं नाही. मी दिसताच 'या मुळावकर' म्हणून त्यांनी माझं स्वागत केलं. माझ्या लेखनाची आत्मीयतेनं चौकशी केली. त्यानंतर इ.स. २००६ मध्ये मी पुण्याला गेलो. त्यांना सहज फोन केला. त्यांनी मला माझ्या आवाजावरून ओळखलं. म्हणाले, ''फार वर्षांनंतर बोलत आहात. घरीच या. म्हणजे मनमोकळं बोलता येईल.'' पण काही कारणामुळं मला अंबाजोगाईला लागलीच परतावं लागलं. माझ्या एका विद्यार्थिनीचा अपघात झालेला होता. मी सारडा सरांकडं जाऊ शकलो नव्हतो. त्यानंतर इ.स. २००७ मध्ये मी पुण्याला गेलो. सारडा सरांना सहज भ्रमणध्वनी केला. त्यांनी घरी येण्याचं निमंत्रण दिलं. मी त्यांच्या घरी गेलो. त्यांच्या प्रत्यक्ष भेटीतलं हेही मध्यंतर मोठंच होतं. पण त्यांच्या प्रसन्न आत्मीयतेत कुठलंही अंतर पडलेलं नव्हतं.

आता तर पुण्याला गेलं की सारडा सरांना घरी जाऊन भेटायचं हा माझा शिरस्ताच ठरलाय. मी एवढ्या मोठ्या समीक्षकाच्या घरी जातो, ह्या गोष्टीचं मला खूप अप्रूप वाटतं. शंकर सारडा ह्यांच्या समीक्षेचा आज मराठी साहित्याच्या प्रांतात केवढा मोठा नैतिक दबदबा आहे! त्यांच्या समीक्षेत निर्भीडपणा आणि टीकाविवेक ह्यांची सहजसुंदर गुंफण झालेली आहे. ही गुंफण वरवरची नाही तर खोलवरची

आहे. आणि म्हणून त्यांची समीक्षा पोटातून येते. दिग्दर्शन, मार्गदर्शन आणि सूचन ही त्यांच्या समीक्षेतली बोलकी तत्त्वं आहेत. तो त्यांचा अधिकार आहे. हा अधिकार त्यांच्या तपस्येचं फलित आहे. समीक्षा ही तर फार मोठी तपस्या असते. तपस्येला अनेक दिव्यातून तावून सुलाखून निघावं लागतं. उचलला पेन की लावला कागदाला ह्या पद्धतीनं कोणालाही समीक्षक, मूल्यमापक होता येत नाही. स्वार्थत्यागाची कठीण तपस्या, ना खेद ना खंद ह्या वृत्तीनं करत राहिलं, साहित्य निर्मितीच्या विविध प्रवाहांच्या प्रेरणांशी आणि मर्मदृष्टींशी अविरत एकात्म होत राहिलं तरच समीक्षा तटस्थ आणि वास्तव होते. हा संपन्न अनुभव शंकर सारडांची समीक्षा अव्याहत देत असते. आणि म्हणून 'शंकर सारडा : व्यक्ती आणि समीक्षा' हा माझ्या लेखनाच्या दृष्टीनं माझा अभ्यासविषय ठरतो. आणि त्यासाठीसुद्धा मला त्यांची प्रत्यक्ष भेट हवी असते.

दि. २१.५.२०१२ ला मी त्यांच्या घरी गेलो. त्यांनी नेहमी प्रमाणं माझं प्रसन्नतेनं स्वागत केलं. 'शंकर सारडा : माझे सर' ह्या श्रद्धेनं मी त्यांना चरणस्पर्श केला. सौ. वहिनीसाहेब घरी नव्हत्या. त्या घरी असल्या की गरमागरम भरपेट नाष्टा ठरलेला. सारडा सरांनी स्वत: माझ्यासाठी कोकमचं सरबत तयार केलं. ह्यावेळचा संवाद प्रामुख्यानं माझ्या प्रकृतीसंबंधी घडला. गेली दोन वर्षे कॅन्सरशी झुंज देत ते युद्ध मी जिंकलेलं... सारडा सरांनी ह्या दरम्यान दूरध्वनीद्वारे मला खूप धीर दिलेला. बोलता बोलता मी बोललो, ''माझा कॅन्सर मी एन्जॉय केला.'' सारडा सर म्हणाले, ''मग तर या अनुभवावर एखादा प्रदीर्घ लेख किंवा पुस्तकच लिहा.'' नेहमीप्रमाणं त्यांनी माझ्या घरच्या सगळ्यांची चौकशी केली... अत्यंत आत्मीयतेनं... मी निघताना मला दोन पुस्तकं दिली... प्रसन्नतेत पुस्तकांची प्रसन्न भर...


प्रा. डॉ. संतोष मोतीराम मुळावकर


समर्थनगर

मु.पो.ता. अंबाजोगाई, जि. बीड ४३१ ५१७

०९४२२२४०३३८

santoshmulawkar@gmail.com


❒




**आगामी**

# मिरॅक्युलस इफेक्ट्स ऑफ अॅक्युप्रेशर

**डॉ. ए. के. सक्सेना**

**डॉ. एल. सी. गुप्ता**

अनुवाद

**मुग्धा गोखले**

सत्तेचाळीस वर्षांच्या जोनाथनला जग मुठीत आल्यासारखं वाटतं. त्याच्याजवळ काय नाही? लठ्ठ पगाराची नोकरी, सुखी संसार, खासगी शाळेत जाणाऱ्या दोन मुली, झकास बंगला आणि आलिशान गाडी! त्याच्यावर कर्जाचा बोजाही आहे; पण त्याची त्याला काळजी नाही.

मात्र, एका पहाटे त्याच्या लघवीवाटे रक्त जातं. रुग्णालयाच्या इमर्जन्सी विभागात डॉक्टरांच्या भेटीसाठी आठ तास थांबावं लागतं. ह्या यशस्वी आयुष्यात जोनाथनचं आरोग्याकडे दुर्लक्ष झालंय. युरॉलॉजिस्ट डॉ.मोहम्मद खाद्रा त्याच्या संपर्कात येतात. त्याला मूत्राशयाचा कॅन्सर असल्याचं निष्पन्न होतं; पण डॉ. खाद्रांच्या दृष्टीनं जोनाथन आजाराच्या मानानं तरुण असला, तरी एक सामान्य रुग्ण राहत नाही. त्यांच्या आयुष्यातली साम्यस्थळं दिसू लागतात. डॉ. खाद्रांचं आयुष्यही एका ठरावीक वळणावर जातं. आयुष्य नश्वर आणि बेभरवशाचं असल्याचं त्यांचा आजार त्यांना शिकवून जातो. स्वत:च्या मर्त्यपणाची जाणीव झाल्यावर त्या दोघांनाही आजवर लाभलेल्या आयुष्याबद्दल कृतज्ञता वाटू लागते.



# शंकर सारडा: उदाहरणार्थ,काही पुस्तके- काही लेखक, वगैरे

प्रा. अनंत मनोहर

शंकर सारडांच्या आयुष्यातील अनुकूल पडलेला टंब्लर म्हणजे १९६१ ला सारडांनी एम.ए. पूर्ण केले आणि जून १९६२ मध्ये महाराष्ट्र टाइम्स सुरू होऊन शंकर सारडांना रविवार पुरवणीचं संपादन करण्याची संधी मिळाली. Literary Criticism applied म्हणावं असं सदरही समीक्षेसाठी मिळालं. म.टा.चं ठरीव पान, त्यातली ठरीव जागा इथे 'नवी पुस्तके' हे शंकर सारडांचं सदर रविवारी नियमितपणे येऊ लागलं. म.टा.च्या वाचकांना त्याची सवय लागली. खरंतर 'चटक' लागली. केवळ वाचकांना नव्हे तर जुने जाणिते -प्रथितयश - नव - अतिनव - उदयोन्मुख असे लेखक - कवि - समीक्षक यांनाही या सदराने आकर्षित केलं. एक रीडरशिप तयार झाली. सारडांना त्यातून तेव्हा फीडबॅक मिळत गेला असेल. (पुढल्या काळात कानोकानी, घटिका गेली पळे गेली, पितळी दरवाजा, राजधानीतून, पंचम वगैरे सदरांना अशी मिरास लाभली.) असं म्हणावंसं वाटतं की महाराष्ट्र टाइम्सने शंकर सारडांना समीक्षक म्हणून सुस्थापित केलं आणि शंकर सारडांनी म.टा.च्या रविवार पुरवणीला वाङ्मयीन उंची दिली -दर्जा दिला - स्थान मिळवून दिले.

त्यांच्या जीवनातील मणिकांचन योग (म्हणजे तिसरे सूत्र) म्हणजे ज्या कालखंडात, समीक्षक म्हणून त्यांना लेखन करण्याची संधी मिळाली तो कालखंड शंकर सारडांचे पूर्वसूरी म्हणजे (काहीसे) वा.ल.कुलकर्णी, गो.म.कुलकर्णी, रा.शं. वाळिंबे, रा.श्री.जोग, श्री.के.क्षीरसागर, मागे जात जात अगदी न.र.फाटक, वा.म.जोशी, द.सी.पंगू इथपासून तत्कालिन नियतकालिके व वृत्तपत्रे यातून पोच व अभिप्राय सदरात परामर्श घेणाऱ्या परिचयकारांपर्यंत विचार केला तरी त्यांच्या कालखंडात साहित्यजगात विशेष असे कितीसे व काय घडत होते? साहित्याची पिढी दशकाच्या मापाने मोजली जाते. प्रत्येक दशकात प्रत्येक क्षेत्रात एखादा अपवाद जरूर सापडतो. तो

वजा केल्यास आपल्याला त्या त्या दशकाचे कथा- कविता - कादंबरी - समीक्षा - ललितगद्य व इतर साहित्यप्रकार याबद्दल अंदाज घेता येतो. संख्यात्मक व गुणात्मक कसोट्यांनी पारख करता येते.

पूर्वसूरींपेक्षा शंकर सारडा त्या दृष्टीने सुदैवी ठरले. १९६२ ते १९६९ या काळात सारडांनी म.टा.मध्ये सदर चालवले आणि लेखही लिहिले. त्यानंतर त्यांचे लेखन अन्यत्र येत गेले. मुख्य म्हणजे त्यांची पत्रकरिता सुरू झाली.

इकडे मराठी साहित्यसृष्टीत खूपकाही घडत होते. जुने कालबाह्य झाले होते. नव्या जीवनप्रश्नांशी त्या साहित्याची नाळ जुळत नव्हती. फडके - खांडेकरांदि बुरुज काळाच्या खुणांनी थोडे इतिहासजमा झालेले दिसत होते. त्यांना नव्या साहित्याचे रूप, सामर्थ्य त्यातून उभे राहणारे प्रश्न वेगाने बदलत जाणारे वास्तव जीवन, नव्यानव्या वाचकांच्या साहित्य व साहित्यिक यांच्याकडून असलेल्या बदलत्या अपेक्षा हे दिसत होतं पण भिडत नव्हतं. नवकथा व नवकाव्य यांवर दुर्बोधतेचा शिक्का बसला होताच.

या पार्श्वभूमीवर ऐन पंचविशीतल्या शंकर सारडांचे आगमन झाले. वैश्विक साहित्याची, त्यातील कलातत्त्वांची जाण असलेला नव्या पिढीच्या नव्या वास्तवाला भिडलेल्या जीवनानुभवांचे स्वच्छ कलादृष्टीने उमदेपणाने स्वागत करणारा नवा समीक्षक म.टा.ने अपल्या रविवार पुरवणीसाठी उचलला.

इथे थोडं सारडांचं वेगळेपण सांगायला हवं, जे पुढे त्यांच्या लेखनाने अधोरेखित केलं.

सारडा कोणत्याही परंपरेला बांधील नव्हते. त्यांच्या मानगुटीला कोणताही 'इझम' बसलेला नव्हता. त्यावर कोणताही शिक्का नव्हता. ही समीक्षा डोळस होती आणि कोणत्याही पूर्वग्रहाने दूषित नव्हती. पुस्तकी नव्हती. ती काहीशी आस्वादाच्या अंगाने जाणारी होती. वाचकाला बहुश्रुत करणारी होती पण कलाकृतीला पर्याय होणारी नव्हती. आवश्यक तेवढे सांगून वाचकाच्या मनात कुतूहल आणि औत्सुक्य निर्माण करून त्याला मूळ कलाकृतीकडे वळवणारी होती. खरंतर कलाकृती कशी घ्यावी हे वाचकाला शिकवणारी होती. वाचकाला केवळ रसिक नव्हे समीक्षकाच्या भूमिकेत उभे करणारी होती. नवकलाकृतींच्या स्वीकारासाठी नव्या जाणिवा जागृत झालेले नववाचक मिळवून देणारी होती.

साहित्य हा समाजजीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. वाचन संस्कृती निर्माण होणे ही समाजाच्या प्रबोधनाच्या दृष्टीने आवश्यक गोष्ट आहे. सुसंस्कृत व्यक्तीला कलास्वादाची निकड वाटते. वाटायला हवी. त्यावाचून आपल्या जीवनात त्याला अपूर्णता जाणवायला हवी. कलेच्या, वाचनाच्या मागणीतून भावी कलावंत निर्माण

होत असतात. भौतिक व व्यावहारिक सुखांच्या पलीकडे असलेली कलात्मक श्रीमंती त्याला आवाहन करते आहे अशी समाजधारणा हवी. सारडांची समीक्षा या ग्रंथगत श्रीमंतीकडे पोचण्याचा रस्ता वाचकाला दाखवणारी होती.

साठीचे दशक साहित्यात नवे नवे पाणी आणणारे ठरले अर्थातच आठवड्यातून एका लेखाने दशकादशकांचा धांडोळा घेणे शक्य नसते म्हणून पुस्तकांचे जग, ग्रंथविशेष, ग्रंथचैतन्य, ग्रंथसंवत्सर, ग्रंथवैभव यातून सांवत्सरिक आढावा घेण्याचा उपक्रम त्यांनी राबवला. कधी दूरदेशच्या प्रतिभावंतांची ओळख करून दे तर कधी विश्वसाहित्यातून फेरफटका मार हेही त्यांनी केलंए्व्हांना स्त्री तिच्या हक्कांबाबत जागृत झाली होती. बघताबघता तिने जीवनाच्या अनेक क्षेत्रात, स्पर्धात्मक परीक्षांत पुरुषांशी बरोबरी साधून नंतर त्यांना मागे टाकले. ती स्वतःला व्यक्त करू लागली. त्यातून स्त्रीवादी कथा काव्य, कादंबऱ्यांची, आत्मकथनांची लाट आली. सारडांनी मग स्त्रीवादी कादंबऱ्यांचा पद्धतशीर आढावाच घेतला. ह.मो.मराठे यांच्या बहुचर्चित कादंबऱ्या म्हणजे 'निष्पर्ण वृक्षावर' आणि 'काळेशार पाणी'. त्या सारडांनी 'साधना'च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध केल्या. पुढे त्यावर सारडांनी संहिता आणि समीक्षा अशी अभ्यासपूर्ण पुस्तके लिहिली. कुरुंदकरांच्या ग्रंथसंपदेचे संपादन केले.

समीक्षेची त्यांची अशी काही पथ्ये होती, Norms होते ते पाळून त्यांनी समीक्षा लेखन केले. आवश्यक तिथे ते स्पष्टपणे आपले मत नोंदवत पण त्यात उद्धटपणा आणि तुसडेपणा नसे. इंग्लिश समीक्षक जेफ्रे साहित्यात काही नवे आणू पाहाणाऱ्या लेखकांना 'This will never do' असा दम द्यायचा. Slashing verdicts साठी जेफ्रे कुप्रसिद्ध होता. मॉटेन तर नव्याचा मारेकरी होता. त्याने एकदा स्पष्ट सांगितले

'I care not for new books because old seem to be fuller.' एक समीक्षक म्हणायचा की उगाच नवे छंद, नवी वृत्ते आणण्याचा व्यर्थ खटाटोप करू नका आणि नवे काही सांगितल्याचा दावा करू नका कारण, तुमच्या पूर्वसूरींनी सर्वकाही पूर्वीच लिहून टाकले आहे. परिणामी लेखक आणि समीक्षक अशी दोन टोकांना पोचले की एकदा कॉफी हाऊसमध्ये टीकाकाराला येतांना पाहून एक कवी म्हणाला, Shoot him. He is a critic.

आपल्याकडे प्रा. हातकणंगलेकर, गंगाधर गाडगीळ, शंकर सारडा यांच्या स्वागतासाठी पायघड्या घातल्या जात असत. त्या त्यांच्या उमद्या तरीही नि:स्पृह व समतोल समीक्षेसाठी त्यांच्या व्यासंगासाठी त्याच त्यांच्या अधिकारातून त्यांनी साहित्य संमेलनांना मार्गदर्शन केले. काही संमेलने आयोजित केली, परिषदा भरवल्या, हस्तलिखिते वाचून उपयुक्त मार्गदर्शन केले, प्रकाशकांच्या कानावर नव्या लेखकांबद्दल शब्द टाकले, भलावण केली, स्पर्धांतून परीक्षक म्हणून सहकार्य दिले. ते पत्रकारितेत होते तेव्हा संपादकांचे संपादक होते. कारण लेखक

कसे हेरावेत, त्यांचे Topics of Interest अजमावून त्यांना कसे लिहिते करावे याबद्दल त्यांचे अनुभव होते.

'कोसला' मध्ये शंकर सारडा यांना सॅलिंजर जाणवला. त्याची 'कॅचर इन दि राय' कादंबरी जाणवली. तरीही कोसला त्यांना भावली. तिचे वेगळेपण जाणवले. कोसलाची भाषा, एकुणातली तिची शैली, त्यातील प्रांजलपणा, निवेदकाचा प्रिमिटिव्ह माणसाला साजेसा दृष्टिकोन, प्रतिष्ठा व मूल्यविषयक कल्पना, निवेदनातील आणि अनुभव घेण्यातील जिवंतपणा, नायकाची भेदक आरपार सुरी भोसकणारी नजर ही सर्व सृष्टी वेगळी होती. त्याचे कौतुक करताकरता कादंबरीतला ढिसाळ भाग, अनावश्यक रेंगाळणं, गिमिक वजा येणारी शैली यावर सारडा प्रहार करतात. सारडांना स्टर्नच्या 'ट्रिस्टॅम कॉंडी' या कादंबरीचीही आठवण होते. पांडुरंग सांगवीकर आणि कॅचर चा नायक होल्डेन कॉलफील्ड यांच्यातील साम्यही सारडा अधोरेखित करतात.

'कोसला'वरून सांगावेसे वाटते की सारडांनी स्वत:ला सतत अपडेट केलं आहे. जे पाणी थांबतं तिथे शेवाळ जमतं. मग लेखनात आवर्त येतो. प्राध्यापक तीसपस्तीस वर्षापूर्वी त्यांच्या गुरूनी डिक्टेट केलेल्या नोटस वर्षानुवर्षे त्यांच्या विद्यार्थ्यांना डिक्टेट करीत निवृत्ती गाठतात. नेते तेचतेच बोलत राहतात. व्हिजन हरवून बसतात. 'अर्ज' गमावतात. तसेच समीक्षकांचे होते. सारडा हे एक आल्हाददायक अपवाद. त्यांच्यात पन्नास वर्षांपूर्वी जे कुतूहल, जी उर्मी, जी निकड, तहान होती ता आजही तितकीच ताजी तरतरीत आहे.

असं नमूद करावं लागेल की सारडा स्वत: अक्षरश्रीमंत होत गेले आणि मराठी वाचकांना सतत ती श्रीमंती वाटत राहिले. नाहीतरी विंदांनी सांगितलं होतंच.

देणाराने देत राहावे

घेणाराने घेत राहावे

घेताघेता घेणाऱ्याने

देणाऱ्याचे हात घ्यावे.

शंकर सारडांनी तरी दुसरं काय केलं?

प्रा. अनंत मनोहर

एस-१, तेज रेसिडेन्सी, टिळकवाडी, बेळगाव ५९०००६

मो. ८३१२४२७५१३

❒



# अनुवादाबद्दल...


**सुप्रिया वकील**

९८६०९२०२८३


गेल्या काही दशकांत अनुवादविषयक ग्रंथव्यवहार जोमात सुरू आहे. त्यात सुद्धा अलिकडच्या दोन दशकांत अनुवाद या विषयाची, अनुवादित साहित्याची बरीच चर्चा होताना दिसते आहे. अनुवादित पुस्तकाचं नवं पर्वच सुरू आहे. या क्षेत्रात अनेक प्रकाशक - अनुवादक उतरत आहेत. आणि वाचकही आपल्या सांस्कृतिक, भाषिक परिघापलीकडल्या साहित्याचे अतिशय आस्थेने स्वागत करत आहेत.

आपल्याकडे जो अनुवाद किंवा भाषांतर व्यवहार घडतो त्याचे ढोबळ दोन प्रकार सांगता येतील. त्यातला एक म्हणजे साहित्य किंवा वाङ्मय क्षेत्रातील अनुवाद आणि दुसरा वाङ्मयेतर क्षेत्रातील - म्हणजे उद्योग, व्यापार जाहिरात अशा ठिकाणी केले जाणारे 'प्रोफेशनल' अनुवाद. यामध्ये माहितीपुस्तिका, ब्रोशर्स, मॅन्युअल्स, जाहिरातींचे कॉपीरायटिंग, दोन कंपन्यांमधले किंवा देशांमधले करार, जाहीरनामे अशा विविध गोष्टींचा समावेश असतो. त्याचबरोबर 'प्रिंट मिडीया' मध्ये व 'इलेक्ट्रॉनिक मिडीया'मध्येही बातम्यांच्या संदर्भात भाषांतराचं महत्त्व खूप मोठं आहे.

हे दोन्हीही प्रकार आव्हानात्मक असतात, पण प्रत्यक्ष काम करताना त्यासाठी आवश्यक बाबी थोड्याफार वेगळ्या असतात असं लक्षात येतं. अर्थात यामध्ये या दोन्ही क्षेत्राचं वेगवेगळं स्वरूप हे मुख्य कारण आहे. वाङ्मयीन कलाकृतीमध्ये तिचं सौंदर्यमूल्य जपणं फार महत्त्वाचं असतं. तर वाङ्मयेतर क्षेत्रात कालमर्यादा जपणं, दर्जा टिकवणं, तुमचं सामान्यज्ञान, प्रत्यक्ष माहिती घेणं हे मुद्दे महत्त्वाचे ठरतात. अशा अर्थाने या दोन्ही कामात फरक असतो.

मी या दोन्ही क्षेत्रात काम केलं आहे, करीत आहे. मी गेली दहा वर्षे विशेषकरून वाङ्मयीन अनुवाद क्षेत्रात, माझ्या कुवतीनुसार काम करीत आहे. त्यामध्ये बऱ्यापैकी सातत्य राखण्याचाही प्रयत्न करीत आहे. आत्तापर्यंतच्या प्रवासात माझी प्रकाशित, अप्रकाशित, अजून काम सुरू आहेत अशा टप्प्यावरची अशी एकूण अनुवादित पुस्तकांची मी तिशी पार केली आहे. अनुभवकथन, आत्मकथन, आत्मचिंतनपर, मार्गदर्शनपर, व्यवस्थापन विषयक कादंबऱ्या, सेल्फ हेल्प बुक्स, ललित, चिकन सूप

मालिकेतील पुस्तके अशा साहित्यप्रकारातील भारतीय भाषांमधील आणि भारतीय लेखकांच्या, तसंच इंग्रजी भाषेतील आणि विदेशी लेखकांच्या साहित्याचाही मी मराठी अनुवाद केला आहे.

गेल्या काही वर्षात अनुवादाला बरे दिवस आले आहेत. नाहीतर अनुवादक ही तशी उपेक्षित जमात असते, हे काम दुय्यम दर्जाचं मानलं जातं वगैरे वगैरे मीही वाचत ऐकत आले आहे. पण याबाबतीत मला विशेषकरून असं काही जाणवलं नाही. मी जेव्हापासून या क्षेत्रात आहे तेव्हापासून अनुवाद या क्षेत्राचा भरभराटीचाच काळ सुरू आहे. अगदी सुवर्णयुग म्हणायला हरकत नाही असा. त्यामुळे मला मात्र कधी या उपेक्षेच्या झळा फारशा जाणवल्या नाहीत. अर्थात यामध्ये आपण हातात घेतलेलं काम सर्वशक्तीनिशी आणि अगदी मनापासून करायचं त्यात बाकी कशाची फारशी अपेक्षा करायची नाही असा माझा प्रयत्न असतो, त्याचाही वाटा असू शकेल आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, या कामात स्वत:ला जो आनंद मिळतो त्याची बरोबरी कशाशीही होऊ शकणार नाही.

साधारणपणे एका दशकाच्या माझ्या अनुवाद प्रवासात मला या क्षेत्राबद्दल काय जाणवलं, काय समजलं, काय अनुभव आले, या क्षेत्राकडून वाचकांच्या कोणत्या अपेक्षा जाणवल्या, अनुवादाचं मूळ भाषेतील साहित्याच्या संदर्भात काय स्थान आहे आणि असावं, ही समृद्धी आणखी कशी वाढवता येऊ शकते, अशा अनेक मुद्द्यांच्या संदर्भात जे वाटलं, जे दिसलं, जाणवलं, मनात आलं इतरांच्या प्रतिक्रियांनी सांगितलं, ते तुमच्या समवेत 'शेअर' करण्याची संधी मला या लेखाच्या निमित्तानं मिळाली आहे.

प्रत्येक भाषेला स्वतंत्र इतिहास असतो. तिच्यावर त्या त्या प्रदेशातील, देशातील सामाजिक परंपरा, चालीरीती, धर्म, संस्कृती यांचा पगडा असतो. तसंच राजकीय, आर्थिक, शास्त्रीय बदलांचा ठसा उमटलेला असतो. अशा जगातील बहुसांस्कृतिक अनुभवांची ओळख करून देण्याचं, ते अनुभव एकवटण्याचं काम अनुवादाच्या माध्यमातून करता येणं शक्य होतं. आपल्या अनुभवविश्वाच्या काहीतरी दूरची क्षितिजापलीकडच्या जीवनाची विलक्षण अनुभूती आपल्या भाषेत घेण्याचा आनंद अनुवादित साहित्य देत असतं. अनुवादातून केवळ एखादी साहित्यकृतीच नव्हे तर एक संस्कृती, एखादा विशिष्ट कालखंड एका भाषेतून दुसऱ्या भाषेत पोहोचत असतो. जगातील सर्वोत्तम मानल्या जाणाऱ्या श्रेष्ठ साहित्यकृतींचा, भाषेच्या अडसरामुळे रसास्वाद न घेता येणाऱ्या साहित्य - रसिकांना अनुवादामुळे त्यांच्या मातृभाषेत या साहित्यकृतीचा अनुवाद घेता येतो.

आशय-विषयाचं वैविध्य देण्यासाठी; जगाच्या कानाकोपऱ्यात नांदणाऱ्या संस्कृती, माणसाचं जीवन, त्यातील संघर्षनाट्य, मनोव्यापार, हे सगळं त्याच उत्कटतेनं आणि तरलतेनं जाणून घ्यायचं असेल तर अनुवादाला पर्याय नाही असं म्हणावं लागेल.

स्वतंत्र प्रज्ञेच्या अनेक थोर लेखक कवींनी अनुवादाचा समृद्ध ठेवा दिलेला आहे हा मुद्दाही लक्षात घेण्याजोगा आहे.

अनुवादाला स्वतंत्र दर्जा असतो की नाही, याबद्दल बरीच चर्चा होत असते, अनुवाद हे केवळ ट्रान्सलेशन नाही तर ते ट्रान्सक्रिएशन आहे असं आवर्जून म्हटलं जातंय. अनुवाद जर तेवढ्या ताकदीचा आणि कसदार उतरला असेल, तर त्याला स्वतंत्र साहित्य निर्मितीचा दर्जा मिळायला काहीच हरकत नाही.

अनुवादक समर्थ वाचक आणि मुक्त लेखकही असतोच पण जग जवळ येण्याच्या प्रक्रियेमध्ये या ट्रान्सक्रिएशनला अतिशय महत्त्व प्राप्त झालं आहे, यासाठी अनेक संधी उपलब्ध होत आहेत. या क्षेत्रामध्ये अनुवादकाला अतिशय मोठा मानसिक समाधान देण्याची क्षमता आहे आणि मराठी साहित्य दरबार अधिक समृद्ध करण्याचीही क्षमता आहे.

अनुवाद या क्षेत्राकडे स्वतंत्र करिअर म्हणून पाहता येईल असं आज आशादायी चित्र आहे. पण या सर्व परिस्थितीत अनुवादक-प्रकाशक-संपादक-समीक्षक आणि वाचकांवरही काही जबाबदारी आहे असं मला वाटतं. भाषांतर हा विविधतेतला एकतेच्या बंधनात बांधणारा पूल आहे आणि अनुवादक हा दोन भाषांमधील साहित्यच नव्हे तर दोन भाषांमधील मनं जोडणारा दुवा आहे.

अनुवादक म्हणून मला विशेषकरून जाणवलेले काही मुद्दे ज्यांचा विचार होणं अतिशय आवश्यक आहे असं मला वाटतं म्हणून do's & don't अशा स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

सगळ्यात महत्त्वाची आणि पहिली गोष्ट म्हणजे अनुवाद ही 'हौस' म्हणून किंवा सहज जाताजाता आणि फावल्या वेळात करण्याची गोष्ट नाही, असं माझं अनुभवसिद्ध मत बनलं आहे. अनुवाद आपल्या पूर्ण ताकदीनिशी करणं आवश्यक असतं तिथे 'पाट्या टाकल्या' तर तो अनुवाद फसतो. घासाघासाला भातात खडे लागावेत तसा वाचकाला अनुभव येऊ शकतो. त्यामुळे अनुवादासाठी पुस्तक निवडताना किंवा आपल्याकडं अनुवादासाठी आलेलं पुस्तक स्वीकारताना ते नीट वाचून, आपली कुवत, आपला आवाका तटस्थपणे लक्षात घेऊन, ते आपल्या 'जॉनर'चं आहे की नाही याचा पूर्ण विचार करून पुस्तक स्वीकारावं. ते एकदा स्वीकारलं की त्यासाठी लागतील तेवढे कष्ट घ्यायचे आहेत हे गृहीतच असतं. मग ते संदर्भाच्या संदर्भातले. तिथे तडजोड करून चालत नाही. थोडक्यात आपला आणि त्या साहित्यकृतीचा सर्वार्थानं आवाका ओळखून अनुवादाचं काम हाती घ्यावं अनुवाद हे एका कुपीतून दुसऱ्या कुपीत अत्तर ओतण्याचं नजाकतीचं काम आहे. त्यामुळे ते घाई गडबड न करता, न 'उरकता', पुरेपूर खबरदारीनं भान कायम राखून करावं लागतं. अनुवादकाचं दोन्ही भाषांवर प्रभुत्व असणं तर आवश्यक असतं. शब्दांचा किंवा शब्दप्रयोगांचा अर्थ

लावताना खूप दक्षता बाळगावी लागते. आपल्याला 'वाटला' म्हणून अर्थ लावणं, तर्कानं अनुवाद करणं फार धोक्याचं असतं. शब्दकोश, थिसॉरस, ज्ञानकोश यांचा पुरेपूर वापर करणे आवश्यक असते. नाहीतर वाक्प्रचार, म्हणी चकवा देतात आणि अनुवादात हास्यास्पद वाक्यं येतात. काही वाक्प्रचार व म्हणी किंवा शब्दप्रयोग निरनिराळ्या भाषांत एकच अर्थ व्यक्त करतात. तो अभ्यास फार रसपूर्ण आणि आनंददायी असतो. उदाहरणादाखल सांगायचं झालं तर, 'लोहा गरम है मार दो हाथौडा!' या हिंदी चित्रपटातल्या सुप्रसिद्ध डायलॉगला इंग्रजीत 'Strike while the iron is hot' असा नेमका त्याच अर्थाचा व तशाच शब्दांचा शब्दप्रयोग आहे. असाच आणखी एक वाक्प्रचार म्हणजे 'Put all one's eggs into one basket' याचा शब्दकोशातला अर्थ आहे 'risk everything one has on the success of one plan' म्हणजेच 'Putting all one's money into one business' याला आपण 'सर्वस्व पणाला लावणं' म्हणतो तसा अर्थ आहे. पण हा वाक्प्रचार असलेल्या एका वाक्याचा 'अमक्या अमक्यांनी टोपलीत अंडी टाकली' असा अनुवाद मी वाचला आहे. शब्दांची व्युत्पत्ती, परभाषेतून आपल्या भाषेत येऊन इथलेच बनलेले शब्द. कधी निनिराळ्या भाषेतील शब्दांमध्ये वा संकल्पनांमध्ये आढळणारं साधर्म्य, त्यांचा उपयोग ही माझ्यासाठी नेहमीच आकर्षणाची गोष्ट असते.

कधी कधी शब्द 'कॉईन' करणं, पारिभाषिक शब्द निर्माण करणं गरजेचं असतं. अशा वेळी मूळ संहितेला धक्का न लागता तिचा अर्थ स्पष्ट करता येतो. तोही सोप्या भाषेत. विशेषत: 'डिझाईन युवर करिअर', 'थॉट लीडर्स', 'डबेवाला', 'धीरूभाईझम', 'प्रतिकूलतेवर मात', 'असामान्य यशप्राप्तीसाठी दहा सामान्य सूत्रे' या पुस्तकांच्या बाबतीत हा अनुभव आला. त्याचबरोबर शब्दाच्या जागी शब्द ठेवला की झाला अनुवाद असंही त्याचं स्वरूप नसतं. जे. सी.कॅटफोर्ड यांनी म्हटलं आहे की, 'Translation is the replacement of the textual material in one language (Source language) by the equivalent textual material in another language (target language) म्हणजेच एका भाषेतील मजकुराची जागा 'त्याच रूपात' दुसऱ्या भाषेतील मजकुराने घेणे होय.

प्रत्येक भाषेचा स्वत:चा बाज असतो, बलस्थानं असतात. तशा आपापल्या मर्यादाही असतात त्यामुळे त्याचं दुसऱ्या भाषेत रूपांतर करताना, तो बाज, ती शैली अचूक पकडणं. तसंच आपण ज्याला 'बिटवीन द लाईन्स' म्हणतो ते नेमकं पकडणं फार गरजेचं असतं. जसा भाषेचा बाज निराळा असतो तशी प्रत्येक लेखकाची शैली वेगळी असते. संहितेचा विषय वेगळा असतो. तिचे 'मूड', रंग वेगवेगळे असतात. ते भान ठेवून, ते भाव नेमके पकडता आले तरच अनुवाद उत्तम होऊ शकतो.

अनुवादकानं मूळ साहित्यकृतीत स्वत:चा रंग मिसळून चालत नाही. अनुवादकाचं भावविश्व, अनुभवविश्व, मतं, विचार, या गोष्टी मूळ लेखकाशी तुलना करता 'दोघे दोन ध्रुवांवर, इतक्या भिन्न असू शकतात. तरीसुद्धा मूळ लेखनानं मनात निर्माण झालेले प्रतिक्रियांचे तरंग अनुवादात प्रतिबिंबीत होऊन चालत नाहीत. त्यामुळे अनुवादकामध्ये त्या अर्थाने संपूर्ण तटस्थ असणं फार आवश्यक असतं, तसंच अनुवादावर मूळ भाषेची छाप येऊन चालत नाही. यासाठी व्यासंग वाढवणं, चौफेर माहिती असणं, याचा अन्वय लावणं अशा गोष्टी महत्त्वाच्या असतात. मगच शास्त्र आणि कला यांचा सुरेख संगम घडून चांगला अनुभव निर्माण होऊ शकतो. यासंदर्भात मला आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मूळ संहितेशी प्रामाणिक असणं, मूळ संहितेवर आपली मतं आणि भावावेग न लादण्याचं भान अनुवादकानं सतत ठेवणं गरजेचं असतं. अनुवाद जास्तीत जास्त प्रामाणिक आणि मूळ पुस्तकाच्या जवळ जाणारा असावा यावर कटाक्ष टाकणे आवश्यक असते. मूळ साहित्यकृतीतले कुठलेही संदर्भ पाहण्याचा कंटाळा करून चालत नाही. प्रत्येक साहित्यकृतीची प्रादेशिक, सांस्कृतिक इ. वैशिष्ट्यं असतातच. ती जाणून घेणं अनुवादाच्या दृष्टीनं किती महत्त्वाचं असतं हे मला 'फरासि प्रेमिक' (तसलिमा नासरिन), 'लिव्हिंग हिस्ट्री' (हिलरी क्लिन्टन), सेक्स वर्कर (नलिनी जमिला), कटींग फ्री (सलमा अहमद), या पुस्तकांचे अनुवाद करताना, तसच 'फाईव्ह पॉईंट समवन', 'वन नाईट ॲट कॉल सेंटर आणि 'थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ' (चेतन भगत) या पुस्तकांचा अनुवाद करताना विशेषकरून जाणवलं. त्या त्या साहित्यकृतीतलं वातावरण टिपणं आव्हानात्मक होतं. सध्या मी अरुण शौरी यांच्या 'डज ही नो अ मदर्स हार्ट'चा अनुवाद करतेय. त्यामध्ये तर याचा कळस आहे आणि कसही लागणार आहे.

संदर्भ शोधणं किंवा एखाद्या शब्दाचा आपल्या मनाचं पूर्ण समाधान करणारा अर्थ शोधणं. या बाबतीतला एक अनुभव सांगते. 'हायसिंथ' या फुलाला मराठीत देखणा पर्यायी शब्द हवा होता. दुर्गाबाईंच्या 'दुपानी'मध्ये मला 'हायसिंथ' हा 'जलकामिनी' हा देखणा शब्द मिळाला. आपल्या समृद्ध साहित्यसागरातून असे अनेक माणिकमोती आपल्या हाती लागत जातात. आपण फक्त चिकाटीनं, उत्कट भावनेनं, झपाटून त्यांचा शोध घेत रहायला हवं.

अनुवाद हे काम एखाद्या अभिनेत्यासारखं असतं. कथेत रंगवलेलं पात्र समजून घेऊन ते पडद्यावर साकारताना तो जसा त्या पात्राचा आत्मा पकडत असतो त्याचप्रकारे अनुवादक त्या मूळ साहित्यकृतीचा आत्मा पकडत असतो. त्याचं मुख्य सूत्र पकडत असतो.

एकच व्यक्ती सर्व भाषा आत्मसात करू शकत नाही, पण अनुवादित साहित्याच्या मदतीनं सर्व भाषांमधलं ज्ञान मिळवता येतं, निराळ्या विश्वातील साहित्याचा आनंद

घेता येतो. असा आनंद घेणाऱ्या अनेक साहित्यप्रेमींच्या भरभरून प्रतिसादानं, त्यांच्या प्रेमानं मला खूप श्रीमंत केलं आहे. पत्र, फोन, मेलवरून तसेच प्रत्यक्ष भेटून अनेक वाचक त्यांच्या प्रेमाची पावती व शुभेच्छा देत असतात. अनुवादाबद्दल 'प्रत्यक्षाहून प्रतिमा उत्कट' ही कॉमेंट मला खूप आनंद देऊन गेली आहे. एका तरुणानं मला आवर्जून पत्र लिहून अभिप्राय दिला. त्यामध्ये त्यानं लिहिलं होतं की, तुमची 'पुस्तकं माझी जगण्याची उमेद टिकवून ठेवतात.' अनुवादक म्हणून यापेक्षा समाधानाचा क्षण कोणता असेल?

(सौजन्य : माय-मावशी वासंतिक अंक २०१२)

**सुप्रिया वकील यांनी अनुवादित केलेली पुस्तके**

| **पुस्तकाचे नाव** | **किंमत** |
|---|---|
| अदम्य जिद्द | २०० |
| धीरुभाईझम | ९० |
| असामान्य यशप्राप्तीसाठी दहा सामान्य सूत्र | १०० |
| फरासी प्रेमीक | २५० |
| चिकन सूप फॉर द मदर्स सोल | २०० |
| फाईव्ह पॉइंट समवन | २२० |
| चिकन सूप फॉर द टीनएज सोल | १६० |
| की नोट | २२० |
| कटींग फ्री | २६० |
| मी संपतपाल गुलाबी साडीवाली रणरागिणी | १७० |
| डिझाईन युवर करीअर | १२० |
| मृत्यू... माझ्या उंबरठ्याशी | १५० |
| नवभारताचे शिल्पकार | १०० |
| द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाइफ | २२० |
| वन नाइट ॲट द कॉल सेंटर | २२० |
| थॉट लीडर्स | ३०० |
| प्रतिकूलतेवर मात | ८० |
| टाइमपास | २५० |
| सेक्स वर्कर | १२० |

❒




*** डॉ. शेषराव मोरे यांना न.र.फाटक पुरस्कार**

'आपण भावनेवर जगतो. तसेच भावना आणि व्यवहार या परस्परविरोधी गोष्टींचा अवलंब करतो. हे सामान्यांच्या बाबतीत घडते, तसेच विचारवंतांच्या बाबतीतही घडते. याच विसंगतीचा शोध घेण्याचा प्रयत्न मी माझ्या लेखनातून केला,' असे मत प्रसिद्ध लेखक डॉ.शेषराव मोरे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे डॉ. मोरे यांना साहित्य संमेलनाचे अध्यक्ष वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते न.र.फाटक पुरस्कार प्रदान करण्यात आला. परिषदेच्या कार्याध्यक्ष डॉ.माधवी वैद्य उपस्थित होत्या.

'मी उपलब्ध माहितीच्या आधारेच लेखन केले. सर्वांनाच ठाऊक असलेल्या माहितीचा मी तर्कशुद्ध क्रम लावला आहे. कठोर बुद्धिवाद म्हणजेच धर्मचिकित्सा आणि राष्ट्राचे हित म्हणेजच हिंदूंचे हित ही सावरकरांची तळमळ होती. या गोष्टी समोर ठेवून मी लेखन केले', असे डॉ. मोरे यांनी सांगितले.

'देशाचा इतिहास आणि समाजरचना यांनी विचारवंतांना झुंजवत ठेवले. आजच्या विचारवंतांना याचा वेध घ्यावासा वाटतो, हेच जागरुक विचारवंतांचे लक्षण आहे. डॉ.मोरे यांनी गांधी, सावरकर, आंबेडकर यांच्यासारख्या महत्त्वाच्या नेत्यांवर लिखाण केले. विचारकलह आणि अप्रियपणा या पुस्तकांमधून त्यांनी धाडसाने तर्कशुद्ध मांडणी केली आहे', असे डहाके यांनी सांगितले.

परिषदेचे मुख्य कार्यवाह डॉ.मिलिंद जोशी यांनी प्रास्ताविक केले.

*** संपादक परिषदेचे पुरस्कार**

महाराष्ट्र संपादक परिषदेतर्फे 'आदर्श पत्रकारिता गौरव पुरस्कार' नाशिक येथे जाहीर करण्यात आले. त्यात नानासाहेब वैराळे ज्येष्ठ आदर्श संपादक पुरस्कार

('देशान्नती' पुरस्कृत)'लोकमत'च्या नागपूर आवृत्तीचे संपादक सुरेश द्वादशीवार यांना, दैनिक 'केसरी' पुरस्कृत लोकमान्य टिळक स्मृती पुरस्कार पुण्याचे ज्येष्ठ पत्रकार अरविंद व्यं. गोखले यांना, तर 'सकाळ'चे संपादक (मराठी नियतकालिके) विश्वास देवकर यांना ब्रह्मा व्हॅली शिक्षण संस्था पुरस्कृत '(कै.) विष्णूशास्त्री चिपळूणकर स्मृती पुरस्कार' जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण सप्टेंबर अथवा ऑक्टोबरमध्ये होईल, अशी माहिती परिषदेचे कार्याध्यक्ष यशवंत पाध्ये यांनी दिली.

ज्येष्ठ आदर्श संपादक पुरस्काराचे स्वरूप रोख २१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, महावस्त्र, तर आदर्श पत्रकारिता पुरस्काराचे स्वरूप रोख ११ हजार रुपये, सन्मानचिन्ह, महावस्त्र असे आहे. परिषदेतर्फे अन्य आठ आदर्श पत्रकारिता गौरव पुरस्कार देण्यात येणार आहेत.

पुरस्कार विजेत्यांची नावे अशी - सुभाष आपटे परिवार पुरस्कृत दर्पणकार जांभेकर स्मृती- पुण्याच्या दैनिक 'संध्यानंद'चे संपादक श्याम अग्रवाल, भारती विद्यापीठ पुरस्कृत स्वर्गीय गो. ग. आगरकर स्मृती- मुंबईच्या दैनिक 'प्रहार'चे संपादक महेश म्हात्रे, तटकरे विश्वस्त निधी पुरस्कृत स्वर्गीय शि. म. परांजपे स्मृती- पनवेलच्या दैनिक 'रामप्रहर'चे संपादक मदन बडगुजर, दैनिक 'मुंबई लक्षदीप' पुरस्कृत आचार्य अत्रे स्मृती- श्रीरामपूरच्या दैनिक 'सार्वमत'चे संपादक नंदकुमार सोनार, श्री. सुधीर जाधव-गजानन चव्हाण पुरस्कृत प्रबोधनकार ठाकरे स्मृती साहित्य- पुण्याचे ज्येष्ठ पत्रकार डॉ. माधव रा. पोतदार, स्वर्गीय दादासाहेब काळमेघ स्मृती- नागपूरच्या दैनिक 'महाराष्ट्र टाइम्स'चे निवासी संपादक श्रीपाद अपराजित यांना जाहीर झाला.

पुरस्कार प्रदान सोहळा नाशिकमध्ये केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते महाकवी कालिदास कलामंदिरात संपन्न होणार आहे. राज्याचे महसूलमंत्री बाळासाहेब थोरात हेही उपस्थित राहतील. यापूर्वी मुंबई, पुणे, नागपूर, सिंधुदुर्गमध्ये असा सोहळा झाला आहे, असेही श्री. पाध्ये यांनी सांगितले.

### * श्री उद्धव पुरस्कार

'शालेय क्रमिक पुस्तकांमध्ये ध्येयवादी व्यक्तींचा समावेश केला गेला, तर विद्यार्थी त्यातून प्रेरणा घेतील, त्यांचे आदर्श विद्यार्थ्यांसमोर राहतील. त्यासाठी शासनाने पुस्तकांमध्ये अशा ध्येयवादी व्यक्तींचा समावेश करावा, असे आवाहन शिवसेनेचे ज्येष्ठ नेते मनोहर जोशी यांनी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहामध्ये 'उद्धव श्री' पुरस्कार वितरण कार्यक्रमावेळी केले. डॉ.शां.ब.मुजुमदार, प्रा.डॉ.विश्वनाथ कराड, नीलम गोऱ्हे इ.यावेळी उपस्थित होते.

व्यावसायिक डी.एस.कुलकर्णी, संपादक श्याम अग्रवाल, कायदेतज्ज्ञ विराज

कानडे, लोकमान्य हॉस्पिटलचे संचालक डॉ. नरेंद्र वैद्य, महापालिकेचे सह शहर अभियंता एम.टी.कांबळे, उद्योजिका बाळूताई धुमाळ, गायिका गोदावरी मुंडे, साहित्यिक उत्तम तुपे, व्यावसायिक कॅप्टन बरखासिंग, व्यावसायिक किशोरीलाल चड्ढा, गिर्यारोहक विनोद ठोकळे, व खंडू चिंचवडे यांना या वर्षीच्या 'उद्धव श्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच गायक आनंद शिंदे, अभिनेत्री भार्गवी चिरमुले यांना विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

'अमराठी लोकांनी येथे येऊन उद्योग उभाल्यामुळे मराठी उद्योजकांची संख्या कमी दिसून येते. मराठी उद्योजकांना उद्योग उभारणीसाठी पाठिंबा मिळाला नसल्याची खंत जोशी यांनी व्यक्त करीत मराठी तरुणांनी नोकऱ्यांपेक्षा उद्योग उभारण्याला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले.

### * मंगला बनसोडे यांना 'कलारत्न' पुरस्कार प्रदान

''लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची केवळ जयंती साजरी करू नका. तर त्यांच्या विचाराने प्रेरित होऊन समाजातील तरुणांनी समाज परिवर्तनासाठी एक तरी डिग्री प्राप्त करण्याचा संकल्प करावा,'' असे आवाहन पाणीपुरवठा मंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे यांनी केले.

ढोबळे यांच्या हस्ते तमाशा सम्राज्ञी मंगला बनसोडे यांना 'कलारत्न' पुरस्कार दऊन गौरविण्यात आले.  प्रा.ढोबळे म्हणाले, ''अण्णांचे सामर्थ्य समजाला कळेल अशा विचाराने वागा. समाज परिवर्तनासाठी एकत्र येऊन लढा देण्याची गरज आहे. अण्णा भाऊंचे सर्व साहित्य एकत्र करण्यासाठी साहित्य खंडाचे काम सुरू आहे. पहिला टप्पा पार केलेला आहे. साहित्य हा अण्णांचा श्वास होता. साहित्यातून समाजातील जीवनघेण्या संघर्षाचे वास्तव चित्रण त्यांनी केले आहे. शाहिरीतून महाराष्ट्राला जागे केले आहे. बारी आणि वारी यांच्यत श्रद्धा पहायला मिळते.''

मंगला बनसोडे म्हणाल्या, ''पुरस्काराने लावणी कलेला खऱ्या अर्थाने किंमत मिळाली. हा माझा सन्मान नसून विठाबाई व सर्व कलावंताचा सन्मान आहे.''

### * नारी समता मंचातर्फे स्त्री शक्तीचा गौरव

चौकटीतून बाहेर पडत जगणं समृद्ध करा, स्त्रीत्वाशी जडलेल्या सर्जनशीलतेला वाव द्या, चौकटीतील घुसमट सोडून मुक्त विश्वात संचार करा. असा संदेश नारी समता मंचातर्फे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्राच्या दोन कन्यांनी दिला.

भटक्या-विमुक्तांसाठी असलेल्या कमिशनच्या सदस्या ॲड.पल्लवी रेणके यांना 'कन्या महाराष्ट्राची पुरस्काराने' तर जळगावच्या सामाजिक कार्यकर्त्या वासंती दिघे

यांना 'मीमांसाभूषण पु.बा.साठे आणि ताराबाई साठे स्मृती' पुरस्काराने गौरविण्यात आले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. रूपा कुलकर्णी-बोधी, मंचाच्या अध्यक्ष डॉ.गीताली वि.मं,साधना दधिच, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ, ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य, बाबा आढाव, बाळकृष्ण रेणके आदी यावेळी उपस्थित होते.

जळगाव सेक्स स्कँडल आणि स्त्रीभ्रूण हत्येविरोधातील लढ्यासाठी दिघे यांना तर भटक्या विमुक्तांसाठीच्या कार्याबद्दल रेणके यांचा सन्मान करण्यात आला.

### * प्रभावळकर, अवचट यांना बालसाहित्यभूषण पुरस्कार

नातू फाऊंडेशन तर्फे ज्येष्ठ अभिनेते लेखक दिलीप प्रभावळकर आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व साहित्यिक अनिल अवचट यांना बालसाहित्यभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या रेणू गावस्कर, शंकर सारडा, अंकुश काकडे, फाऊंडेशनचे विश्वस्त दत्ता टोळ, चंद्रशेखर यार्दी आदी यावेळी उपस्थित होते. पुरस्कार वितरणानंतर झालेल्या मुलाखतीच्या कार्यक्रमात प्रभावळकर आणि अवचट यांनी बालसाहित्याबाबत आपले विचार मांडले.

बालसाहित्य हे मुलांचे भावविश्व समृद्ध करणारे असावे, असा विचारही या कार्यक्रमातून पुढे आला.

बोक्या सातबंडे या व्यक्तीरेखेने साहित्याची जुळणी किती अवघड असते याचे धडे दिले. विनोद टिपण्याची वृत्ती माझ्यात आहेच. त्यातूनच मुलांसाठीचे ोलखाण होत गेले. मुलांचे भावविश्व समृद्ध करू शकलो तर समाधान वाटेल, अशी भावना प्रभावळकर यांनी व्यक्त केली

### * मोडक, इंगळे, पोंक्षे यांना पुरस्कार

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची पिंपरी-चिंचवड शाखा, कलारंग प्रतिष्ठान आणि सिद्धिविनायक ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने परिषदेच्या १६व्या वर्धापन दिनानिमित्त संगीतकार आनंद मोडक, आनंद इंगळे, यांच्यासह शरद पोंक्षे, गिरीष जोशी आणि प्रतीक्षा लोणकर यांना वनमंत्री पतंगराव कदम यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

### * वसुंधरा पेंडसे यांना 'जोगळेकर पुरस्कार'

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे मराठीच्या अभ्यासिका व राज्य मराठी विकास संस्थेच्या माजी संचालिका वसुंधरा पेंडसे - नाईक यांना डॉ. गं. ना. जोगळेकर स्मृती

पुरस्कार (रोख दहा हजार रुपये) १४ ऑगस्ट रोजी माजी आमदार उल्हास पवार यांच्या हस्ते देण्यात आला.

या समारंभात संतोष शेणई, डॉ. केतकी मोडक यांनी संपादित केलेल्या 'उपयोजित मराठी' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

*** 'फरफट' आत्मकथनास जीवनसाधना पुरस्कार**

ज्येष्ठ लेखक आणि चित्रकार नारायण शेळके यांच्या 'फरफट' या आत्मकथनास राज्यस्तरीय 'जीवनसाधना पुरस्कार' जाहीर झाला आहे.

साहित्यप्रेमी मंडळ-सोमेश्वरनगर यांच्या वतीने हा पुरस्कार देण्यात येतो. केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त १२ डिसेंबर रोजी पारितोषिक वितरण होणार आहे. स्मृतिचिन्ह, मानपत्र, ग्रंथ, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. शेळके यांनी निवृत्तीनंतर लेखनास सुरवात केली आणि पंधरा वर्षात त्यांची एकवीस पुस्तके प्रकाशित झाली. त्यात कादंबरी, लघुकथासंग्रह, प्रवासवर्णन, आत्मकथन आदी साहित्याचा समावेश आहे. त्यांच्या अनेक लघुकथांना पुरस्कार मिळाले आहेत.

चित्रकलेची त्यांची अनेक प्रदर्शने मुंबई व पुणे येथे भरविण्यात आली आहेत. बालगंधर्व येथे नुकतेच २०० व्यंगचित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

*** विजया मेहतांना 'चतुरंग पुरस्कार'**

'चतुरंग प्रतिष्ठान'चा प्रतिष्ठेचा 'जीवनगौरव' पुरस्कार यंदा ज्येष्ठ रंगकर्मी विजया मेहता यांना जाहीर झाला. सांस्कृतिक क्षेत्रात बहुमूल्य योगदानाबद्दल त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात येत आहे. एक लाख रुपये, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. 'चतुरंग रंगसंमेलन' डिसेंबर अखेर होणार आहे.

*** श्रीधर फडके यांना पुरस्कार**

अजित सोमण स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणारा पुरस्कार संगीतकार श्रीधर फडके यांना प्रदान करण्यात येणार आहे. कोथरूड येथील बालशिक्षण मंदिराच्या सभागृहामध्ये 'शब्दप्रभू' अजित सोमण स्मृती समारंभाचे आयोजन केले आहे. संगीतकार प्रभाकर जोग यांच्या हस्ते फडके यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. ११ हजार रुपये रोख व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

*** नारायण सुर्वे स्मृतिगंध पुरस्कार**

वाचनसंस्कृतीचे काय होणार अशी चिंता केली जाते. कारण दृकश्राव्य माध्यम

अतिशय प्रभावी ठरते आहे. ते एक प्रकारचे पेय आहे, घेतले की गरगरायला लागते. आपल्याला बांधून ठेवते, इतकी त्याची ताकद आहे. मात्र, ग्रंथाचे तसे नाही. ते वाचकाला गुलाम करत नाहीत, तर मित्र करतात. ग्रंथातून अनुभूती मिळते, ती दृकश्राव्य माध्यमातून मिळत नाही, असे प्रतिपादन जेष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी चिंचवड येथे केले. अशी कितीही माध्यमे आली तरी वाचनसंस्कृतीची चिंता करण्याची गरज नाही, असे सांगत घराघरांत ग्रंथकार तयार झाला पाहिजे, अशी अपेक्षा कुलकर्णी यांनी व्यक्त केली. नारायण सुर्वे साहित्य कला अकादमीच्या वतीने चिंचवड येथे आयोजित काव्यजागर संमेलनात कुलकर्णी यांना जेष्ठ साहित्यिक द.मा.मिरासदार यांच्या हस्ते 'नारायण सुर्वे स्नेहबंध पुरस्कार' देण्यात आला. कविवर्य सुर्वे यांच्या पत्नी कृष्णाबाई, निवृत्त अतिरिक्त पोलीस महासंचालक सुभाष आवटे, संस्थेचे अध्यक्ष रवींद्र आवटी आदी उपस्थित होते. या समारंभात निवेदक प्रदीप भिडे यांना सुर्वे यांच्या नावाचा 'शब्दयात्री' पुरस्कार, तर लेखक अरुण सावळेकर यांना 'टवाळांची मैफल'साठी साहित्य पुरस्कार देण्यात आला. याखेरीज, प्रशांत मोरे (मुंबई), चंद्रकांत वानखेडे, मीनल बाठे (पुणे), संजय बोरुडे (नगर), शिवाजी सातपुते (मंगळवेढा) तसेच चिंचवडच्या शिवाजीराजे माध्यमिक विद्यालयाला संस्कारक्षम शाळेचा पुरस्कार देण्यात आला.

*** रामदास फुटाणे यांना समाजरत्न पुरस्कार**

प्रतिशिर्डी साई संस्था आणि नामदेव शिंपी समाजातर्फे देण्यात येणारा समाजरत्न पुरस्कार साहित्यिक रामदास फुटाणे यांना देण्यात आला. यावेळी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे उपस्थित होते. मनोज फुटाणे, दादा गुजर, विवेक खटावकर, डॉ. संजीव खुर्द, श्रीकर परदेशी यांचा विशेष गौरव करण्यात आला.


❒

भारतीय टपाल खात्याच्या नवीन अधिनियमानुसार मासिकाचे वितरण करताना पिनकोड सहित संपूर्ण पत्ता टाकणे अनिवार्य झाले आहे. आपला अंक नियमीत वितरित होण्यासाठी कृपया पिनकोडसह आपला संपूर्ण पत्ता पोस्टकार्डद्वारे अथवा ई-मेल




# अनलाइकली हिरो ओम पुरी

तोंडात लाकडाचा चमचा घेऊन जन्माला आलेल्या ओम पुरीचे
चित्रपट सृष्टीतील आगळेवेगळे भाग्य




लेखक : **नंदिता सी पुरी / अनु. अभिजित पेंढारकर**

२२०रु. - सभासदांना सवलतीत

लेखिका व पत्रकार नंदिता पुरी या अभिनेते ओम पुरी यांच्या पत्नी आहेत. त्यांनी 'अनलाइकली हिरो' या पुस्तकात आपल्या नवऱ्याची विविध रूपे उलगडून दाखवली आहेत. अभिनेता होण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या एका गरीब मुलापासून गुणवत्तेच्या व चिकाटीच्या जोरावर देवीचे वण चेहऱ्यावर असूनही चित्रपटसृष्टीवर आपला ठसा उमटविणाऱ्या ओम पुरी या प्रसिद्ध कलाकाराची ही कहाणी आहे.

ओम पुरी यांचा जन्म अंबाला येथे १९४९ किंवा १९५० मध्ये झाला. जन्मतारखेची निश्चित नोंद उपलब्ध नाही. त्यामुळे शालेय व कॉलेज जीवनात त्यांना आपला वाढदिवस साजरा करण्याची कधी संधीच मिळाली नाही. त्यांचे मित्र नसिरुद्दीन शहा यांनी त्यांच्या बालपणाचे वर्णन करताना म्हटले आहे, "ओम तोंडात लाकडाचा चमचा घेऊन जन्माला आला होता." ओमचे वडील टेकचंद पुरी व आई तारादेवी. ओमच्या वयाची पहिली चार वर्षे अंबाल्यातील एका भाड्याच्या घरात रेल्वे वसाहतीत गेली. किशोरावस्थेत ओम आपल्या मामांच्या घरीच काही वर्षे राहिला होता. रिवडी येथे राहात असताना ओमला देवी आल्या. त्यावेळचे देवीचे व्रण त्याच्या चेहऱ्यावर कायमचे राहिले. शाळेत तो खेळांमध्येही प्रवीण होता. ओम खूप गरीबीत वाढला. अनेकदा शेजाऱ्यांच्या व नातेवाईकांच्या उपकारावरच कुटुबियांना जगावे लागत होते. ओमला बालपणी कोणीही सवंगडी नव्हता. पुढे भटिंडा येथील रेल्वे वसाहतीत राहात असताना ओमला आयुष्यभर डाचत राहणाऱ्या दोन घटना घडल्या. पांढरी मिशी असलेल्या एका ज्येष्ठ पंडिताने केलेला त्याचा लैंगिक छळ व वडील तुरुंगात असताना अचानक रेल्वे वसाहतीमधील घर सोडण्याचा या कुटुंबावर ओढवलेला प्रसंग.

ओमचे पिता प्रेमळ असले तरी रागीटही होते. बऱ्याचदा ते अचानक भडकत असत. ओमकडेही हा वारसा आला आहे. ओमचे वडील म्हणजे बाऊजी बायकोला मारत. आईला मारताना पाहिल्यामुळे त्याच्या मनात बाऊजींबद्दल राग होता.

ओमच्या आयुष्याच्या जडणघडणीची अनेक वर्षे पतियाळात गेली. मामांच्या घरीच ओमचे अभिनयाचे गुण पहिल्यांदा लक्षात आले. अफाट निरीक्षण शक्ती असणारा ओम फावल्या वेळेत बाजारात किंवा रेल्वेस्टेशनवर जायचा आणि एका कोपऱ्यात उभा राहून लोकांचे निरीक्षण करत राहायचा. लोकांच्या लकबीची तो हुबेहूब नक्कल करायचा.

चौदा वर्षाचा ओम नववीत शिकत असताना त्याचे आयुष्य बदलून टाकणारी एक घटना घडली. उन्हाळ्यातील एके रात्री सर्व कुटुंबीय गच्चीवर झोपले होते. त्यावेळी छोट्या मामीच्या पोटाचा भाग उघडा पडल्याचे ओमला दिसले. त्या काळात त्याला मामीचे आकर्षण वाटू लागले होते आणि त्या रात्री त्याचा तोल सुटला. तो तिच्याजवळ गेला आणि तिच्या पोटाला त्याने घट्ट मिठी मारली. मामी

कुशीवर वळली आणि रागाने काहीतरी बडबडली. दुसऱ्या दिवशी सकाळी मामांनी काहीही न बोलता त्याच्या सणसणीत थोबाडीत ठेवून दिली आणि त्याला लुधियानाच्या गाडीत बसवून दिले.

ओमने अनेक संकटांना तोंड दिले. मॅट्रिकच्या परीक्षेत जेमतेम दुसऱ्या वर्गात तो उत्तीर्ण झाला.

सुरवातीच्या काळात ओमला लष्करात जाण्याची खूप इच्छा होती. त्याने प्रवेशप्रक्रियेसाठी अर्जही केला होता. परंतु प्रशिक्षणाचे शुल्क त्याच्या वडिलांना परवडणारे नव्हते त्यामुळे त्याचे ते स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकले नाही.(पृ.१६)

रुपेरी पडद्याचे आकर्षणही ओमला होते. नववीत असताना त्याने 'जिओ और जीने दो' या चित्रपटातील भूमिकेसाठी अर्ज केला होता पण पैशाअभावी त्याची रुपेरी पडद्यावरची स्वप्नेही तिथेच विरली.

आधुनिक पंजाबी रंगभूमीचे जनक हरपाल तिवाना यांचा ओमचे करिअर घडविण्यात सिंहाचा वाटा होता. तिवाना यांच्या नाट्यसंस्थेत तो दाखल झाला. त्यांच्याबद्दल ओम म्हणतो, ''हरपाल तिवाना माझे पहिले गुरू होते. त्यांनी मला या माध्यमाची सर्वप्रथम ओळख करून दिली. मी आज जो काही आहे तो केवळ त्यांच्यामुळेच. 'एनएसडी' मधील माझ्या प्राध्यापकांपेक्षाही त्यांचे योगदान मोठे आहे.'' एक आठवण कायमची त्याच्या मनात घर करून राहिली ती म्हणजे आई तारादेवी यांचे निधन. आईच्या मृत्युनंतर ओम लुधियानामध्येच आपला भाऊ वेद याच्यासोबत काही दिवस राहिला. नंतर काही दिवस पतियाळात राहून तो दिल्लीला गेला.

'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा' मधील प्रशिक्षण हा अनुभव ओममध्ये आमूलाग्र बदल घडवणारा होता. अल्काझी यांनी 'एनएसडी' स्थापन केली होती. या संस्थेतील तीन वर्षे (१९७०-७३) ओम पुरी याची एक अभिनेता म्हणून जडणघडण होण्यासाठी अतिशय महत्त्वाची ठरली.

'फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' हे ओम पुरीच्या आयुष्यातील पुढील महत्त्वाचे ठिकाण. 'एफटीआयआय'चा अभ्यासक्रम पूर्ण करून १९७६ साली ओम उत्साहाने मुंबईत आला. सुरुवातीच्या काळात ओमच्या आयुष्यात विशेष काही घडले नाही. कुठेतरी 'व्हॉइस ओव्हर'दे, कुठे किरकोळ भूमिका कर अशी वाटचाल सुरू होती. सन १९७७ मध्ये त्याने बी. व्ही कारंथ आणि गिरीश कर्नाड यांनी दिग्दर्शित केलेल्या 'गोधुली' या चित्रपटात काम केले. 'शायद' नावाचा चित्रपटही याच काळात केला.

त्याला मिळालेला पहिला मोठा चित्रपट म्हणजे १९८०चा आक्रोश. या चित्रपटाचे दिग्दर्शन गोविंद निहलानी यांनी केले होते. आक्रोशमधील भूमिकेसाठी

त्याला सन १९८२ मध्ये सहायक फिल्मअभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला.

**अर्धसत्य**

कलाकाराच्या आयुष्यात असा एखादा क्षण येतो, जेव्हा त्याची एखादी भूमिका ही त्याच्या कारकिर्दीचे पताकास्थान ठरते. ओमच्या आयुष्यात अशी संधी 'अर्धसत्य'च्या निमित्ताने आली. हिंदी चित्रपटातील उत्कृष्ट पटकथांपैकी ती एक मानली जाते. गोविंद निहलानींच्या मनात 'अर्धसत्य'च्या मुख्य भूमिकेसाठी अमिताभ बच्चनचे नाव होते पण बच्चनकडे वेळ नव्हता. नंतर दहा वर्षांनी 'देव' या चित्रपटात त्यांनी लोकप्रिय आणि कलात्मक अशा दोन्हीही धाटणीतील दोन मोठ्या अभिनेत्यांना प्रथमच एकत्र आणले - अमिताभ बच्चन आणि ओम पुरी

सन १९८४ मध्ये ओम प्रसिद्धीच्या झोतात आला. 'अर्धसत्य'साठी उत्कृष्ट अभिनेत्याचा राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला, या चित्रपटामुळेच ओमला पहिला आंतरराष्ट्रीय पुरस्कारही मिळाला तो होता झेकोस्लोव्हाकियामधील महोत्सवातील उत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार! अर्धसत्यमुळे ओमला अनेक मार्ग मोकळे झाले. अनेक चित्रपटांचे प्रस्ताव त्याला येऊ लागले. अखेर ओम 'अभिनेता' झाला.

ओमने त्यानंतर अनेक वैशिष्ट्यपूर्ण आणि बुद्धिमान दिग्दर्शकांबरोबर तसेच उत्कृष्ट कलाकारांबरोबर काम केले. सामाजिक संदर्भ असलेल्या अर्थपूर्ण चित्रपटांचे हे युग जवळपास दशकभर चालले. नव्वदीच्या दशकातील गौतम घोष यांच्या 'पतंग'(१९९४) आणि प्रकाश झा यांच्या 'मृत्युदंड'(१९९७) पर्यंत!

**दूरचित्रवाणीमध्ये काम**

भारतीय दूरचित्रवाणीच्या इतिहासातील काही उत्कृष्ट कलाकृतींमध्ये सहभागी होण्याचे भाग्य ओमला लाभले. 'यात्रा', 'भारत:एक खोज', 'कक्काजी कहिन', 'मिस्टर योगी', सई परांजपे यांची 'स्पर्श', गुलजार यांची 'किरदार' आणि गोविंद निहलानी यांची 'तमस' ही भव्य मालिका. यांमध्ये ओमच्या महत्त्वाच्या भूमिका होत्या.

**आंतरराष्ट्रीय चित्रपटांत विविध भूमिका**

ओम पुरी यांनी अनेक भारतीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील दिग्गज दिग्दर्शकांबरोबर आत्तापर्यंत काम केले आहे. त्यांनी दोनशेहून अधिक भारतीय चित्रपटांत तर जवळजवळ तीस आंतरराष्ट्रीय चित्रपटांतही विविध भूमिका साकारल्या आहेत. त्यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीचा आढावा पुस्तकात घेणे अशक्य असले तरी त्यांनी भूमिका केलेल्या मुख्य चित्रपटांची झलक या पुस्तकात दिलेली आहे.

**त्याच्या जीवनात आलेल्या स्त्रिया**

कोणत्याही लोकप्रिय कलावंताच्या बाबतीत त्याच्या जीवनात आलेल्या स्त्रियांची चर्चा सर्वात जास्त होते. मामांच्या घरी सनौर येथे जाईपर्यंत ओमच्या आयुष्यातली

एकमेव स्त्री म्हणजे त्याची आई. सनौर मध्ये गेल्यावर त्याच्या ओळखीच्या स्त्रिया म्हणजे त्याच्या दोन माम्या व घरातल्या नोकर बायका.

ओम चौदा वर्षाचा असतानाच त्याचा कौमार्यभंग झाला. मामाच्या घरात शांती नावाची ५५ वर्षांची बाई हातपंपावरून पाणी आणायची. ओम तिला मदत करी. अनेक दिवस ओम हातपंपाने पाणी काढत होता. तो हे काम करताना शांती त्याला मिठी मारायची व त्याच्याशी काही चाळे करायची. एके दिवशी घरी वीज गेलेली असताना शांतीने अंधारात त्याला जवळ घेतलं. दोघांचा संबंध आला. शांती ही ओमची पहिली प्रेयसी!

शाळेतल्या सावित्री या एका विद्यार्थिनीबद्दल त्याला प्रेम वाटायचे. तो तिची खाजगी शिकवणी घेत असे. एनएसडी मध्ये शिकताना ज्योती, जयश्री, रोहिणी, रीटा आणि नीलम यांच्याशी त्याची चांगली मैत्री जमली. ओम सर्वात आधी रोहिणी हट्टंगडीकडे आकर्षित झाला होता. त्याने आपले प्रेम एकदा तिच्यापाशी बिनधास्त व्यक्त केले होते पण रोहिणीने ती जयदेवच्या प्रेमात पडल्याचे सांगितले. त्याला पहिले खरे प्रेम १९८२ मध्ये मिळाले. ओम 'गंगाविहार'मध्ये राहताना कुलभूषण खरबंदाने त्याची गर्लफ्रेंड सीमा साहनी हिच्याशी ओमची ओळख करून दिली. ती एक स्त्री आणि व्यक्ती म्हणून ओमला खूप आवडली. सीमाने 'आक्रोश' पाहिला होता. ती ओमच्या अभिनयाने भारावून गेली होती. सीमा घटस्फोटित होती.ओमच्या आयुष्यातील उमलत्या काळात सकारात्मक परिणाम घडवणारी ती स्त्री होती. गंगाविहार सोडल्यानंतर ओमच्या आयुष्यात माला नावाची मुलगी आली. पण पुढे मालाने ओमचा मित्र अशोक बांठिया याच्याबरोबर लग्न केले.

फेब्रुवारी १९९० मध्ये सीमा साहनी व ओम पुरी यांचे लग्न झाले. पण ते ओमसाठी सुखाचे ठरले नाही.

**पत्नी नंदिता**

पुढे ओमला एक पत्रकार मुलगी आवडल्याचे तो सांगतो. 'मी कोलकत्त्यात असताना माझी मुलाखत घेण्यासाठी आलेल्या एका तरुण, चमकदार पत्रकार मुलीशी माझी भेट झाली. नंदिता ही संपन्न व उत्कट व्यक्तिमत्त्वाची होती. पारंपरिकता व आधुनिकता यांचा उत्तम मिलाफ तिच्याकडे होता. माझ्यापेक्षा ती सोळा वर्षांनी लहान असली तरी माझ्या वैवाहिक जीवनात ज्याची कसर होती ती सुखाची झुळूक तिच्यामध्ये मला दिसली.'' पुढे ओमने म्हटलंय, ''जानेवारी १९९३ मध्ये घटस्फोटाची पूर्तता झाली आणि काही महिन्यांनंतर मी दुसऱ्यांदा लग्न केलं ते नंदिताशी. गेली १९ वर्षे आम्ही एकत्र आहोत.''

ओम आणि नंदिता यांना एक मुलगा आहे - ईशान. ओमने पितृत्वाची जबाबदारी उत्साहाने स्वीकारली. कामाचा प्रचंड व्याप आणि सातत्याने करावा

लागणारा प्रवास सांभाळूनही त्याने ईशानसाठी भरपूर वेळ देण्याचा प्रयत्न केला.

ईशानने सन २००८ मध्ये शालेय स्पर्धेत लिहिलेल्या वडिलांवरील निबंध पुस्तकात भाषांतरीत करून जसाच्या तसा दिलेला आहे.

प्रामाणिक आणि उत्साहपूर्ण शैलीत नंदिता पुरी यांनी लिहिलेली ही कहाणी म्हणजे आपल्या देशातील एका गुणवंत कलाकाराच्या कार्याचा केलेला गौरव होय. अतिशय दुर्मिळ आणि काही खास छायाचित्रेही या पुस्तकात समाविष्ट केलेली आहेत. हे पुस्तक रसिकांनी आवर्जून वाचावे असेच आहे.

डॉ. निर्मला सारडा

मो. ९५०३५०८४४५

❐





८वी आवृत्ती

# वपुर्वाई

**व. पु. काळे**

१००रु. पोस्टेज २०रु.


''....महाकाय वटवृक्ष तोडून त्याच्या लाकडाचे पैसे नक्कीच भरपूर येतील; पण त्याच्या कितीतरी पट अधिक, पिढ्या न् पिढ्या पुरणारी संपत्ती त्याची सावली असते. मला सावलीचं महत्त्व पटतं....''

— लोकप्रिय कथाकार व. पु काळे आपल्या कथेत अशा अनोख्या प्रतिमांमधून सतत माणूसपणाचा उद्घोष करताना दिसतात. वेगवेगळ्या परिस्थितीत सापडलेली, संघर्ष करणारी, हसणारी, रडणारी, कुढणारी सर्वसामान्य माणसं रंगवताना, ते त्यांच्यातल्या असामान्यत्वाचा नेमका वेध घेतात आणि आपल्या प्रसन्न, खुमासदार, मिस्किल शैलीत त्याचा आविष्कार करतात. वपुंच्या लेखनातील हा पैलूच वाचकांना अपूर्वाईचा वाटतो. 'वपुर्वाई' यामुळेच वाचकांचं मन सहज जिंकून घेते...




# गोतावळा

## गोतावळा - नारबाचा आणि त्याच्या नेणिवेचा




**डॉ. आनंद यादव**

१५०रु. - सभासदांना सवलतीत

नारबा आणि त्याचा गोतावळा यांच्यातील भावसंबंधांना दिलेला अर्थपूर्ण कथात्म आकार हा आनंद यादव यांच्या 'गोतावळा' या कादंबरीचा व्यूह आहे. नारबा हा बाह्यत: पेशाने शेतमजूर असून त्याच्या गोतावळ्यात प्रामुख्याने गाय, बैल, म्हैस, रेडा, घोडे, कोंबडा, कुत्रे इत्यादी शेतीजीवनाशी सबंधित असे पशू आहेत. मालक, मालकीण त्यांचा मुलगा विकास, कोल्हापूरचा पाव्हणा, सीताराम गडी, ट्रॅक्टर ड्रायव्हर इत्यादी माणसेही या गोतावळ्यात दिसतात. पण त्यांचे स्थान दुय्यम आहे. असेही दिसते की नारबाच्या अंतर्मनाच्या गुहेवरील शिळा पशूशी संबंध आला की सहज सरकते, आत उतरायची वाट मकळी करून देते. माणसांच्या बाबतीत ते इतकं सहजपणे होत नाही. त्यांचा नारबाच्या मनातील अन्त:स्तराशी असलेल संबंध थोडा दूरान्वयाने आलेला जाणवतो. या संबंधांचे सूत्र मुद्दाम शोधावे लागते आणि ते थोड्याफार परिश्रमानंतर गवसते.

या कादंबरीच्या निमित्ताने साधलेल्या कथात्म विश्वासंबंधीची एक वस्तुस्थिती अतिशय बोलकी आणि मार्गदर्शक आहे. हे सारे विश्व काम आणि क्षुधा या प्राणिजीवनाच्या दोन आदिम प्रेरणांनी विणले गेलेले आहे. पशूच्या बाबत तर त्यांचे खाणे-पिणे आणि त्यांच्यातील लैंगिक संबंध, प्रजोत्पत्ती यांचे निर्देश सतत झालेले आहेत. माणसांच्या बाबतीतही भाकरीचे सूत्र महत्त्वाचे आहे. नारबाच्या मनोविश्वात हलचल माजविणारा ट्रॅक्टर भाकरी-संवर्धक म्हणूनच मालक पत्करतो आहे. तसेच नारबाच्या मनाच्या तळाला डसून बसलेला लग्नाचा विचार कामप्रेरितच आहे. लग्न करून देण्याची बोली मोडणारे मालक-मालकीण, लग्न झालेला सित्या आणि लग्नानंतर बाळंतपणासाठी माहेरी येऊ घातलेली (लहानपणी नारबाने अंगाखांद्यावर खेळवलेली) मालकाची मुलगी यांच्याबद्दलची नारबाची भूमिका कामजन्यच आहे. शिवाय नारबा आणि त्याचा गोतावळा यांची दृश्य पार्श्वभूमी म्हणून पसरलेल्या शेतीचा एकूण व्यवहारही (खत, पाणी आदी) खाणे आणि (धान्यादी शेतमालाची) निर्मिती साधणे या दोन कृतींतच विभागलेला आहे. (उदा. लांब लांब सप्पा पसरून पडलेली वावर खताची वाट बघत हुती. काय थोड्या वावरात ढीग सोडलेलं... पंगतीला वाढलेल्या भाताच्या ढीगागत ते एका वळीनं दिसतेलं... पोटभर जेवायला मिळाल्यागत रान तेवढ्यावर सालभर खूष. लाख हातांनी देतं. दोन हातांनी आम्ही घेणार किती? (प्रकरण ९)

तेव्हा गोतावळ्यातील कामक्षुधामय विश्व हे असे 'पाशवी' आहे; मानवी नव्हे. बुद्धीच्या आधारे जोजावल्या जाणाऱ्या (सांस्कृतिक वगैरे म्हणू अशा) संलग्न प्रेरणांना या विश्वात स्थान आलेले दिसत नाही. एरवी नारबाच्या पद्धतीने का होईना, शेती-शेतमजूर -शेतमालक यांच्या स्थितीवर काही ना काही (बौद्धिक)

भाष्य 'गोतावळा'त शब्दबद्ध झाले असते!

फार लहान वयात बाप आणि पौगंडावस्थेच्या प्रारंभीच आई निवर्तलेला नारबा मालकाच्या मळ्यात शेतमजूर म्हणून कामाला लागलेला आहे. ('कळाय लागलं तवाच आई-बा मेलं' प्रकरण १०) 'आई!... तिच्याबी पोटाला आठ-नऊ पोरं कुठंतरी बघत बसायची. नुसता मी जगलेला. माझ्याकडं बघत बघत माझ्या पाचव्या वर्षीच बा मेला . आई बाच्या जाण्यानं जास्तच पोकळ... माला पंधरा वर्षाचा करून बडबडीनं चालती झाली. मी कामाला गेलो असतानाच..'प्रकरण१) त्याला नंतर मालक-मालकिणीबद्दल वाटलं, 'हेच आता आई-बा' (प्र.५) नारबाची घडण ही अशी झालेली आहे. त्यामुळे बापाप्रमाणे वाटणाऱ्या मालकाबद्दल त्याला रागही आहे आणि धाकही आहे. पाचव्या वर्षी बाप निवर्तलेल्या नारबाच्या बाबतीत ही सुसंगत अशीच मनोधारणा आहे. तसेच पंधराव्या वर्षी आई गेलेली असल्यामुळे मालकीण त्याला गंडशून्य कोऱ्या स्वरूपात (आई म्हणून) भावणेही सुसंगत आहे. इथे असेही दिसते की दिवंगत आई-वडिलांविषयीची साचत आलेली कणव गाय आणि म्हाळुंगा बैल किंवा म्हारुत्या घोडा यांच्या संदर्भात मूर्त होते. त्यांच्या विषयीचा एक सहज कळवळा सतत जाणवतो.

'गोतावळा' या कथात्म भावबंधाच्या विणीचे केंद्र नारबा आहे. हा नारबा म्हणजे दडपलेल्या कामेच्छेचा मूर्त अविष्कार होय. 'गोतावळा'भर संघटीत होणाऱ्या त्याच्या बहुतांश उक्ती -कृतींद्वारा त्याच्या मुळचा हाच गंड व्यक्त होताना दिसतो. ओपेला आलेली पाडी आणि सोन्या-चाण्णा, शेपूट वर करून समोर आलेल्या रेडीमागे गाडीसह सुसाटलेला टिक्क्या रेडा, चंपी आणि नाम्या हे कुत्र्याचे जोडपे इत्यादी अनेक प्रतिकांद्वारा गंडाचीच प्रचीती येत जाते. इतकेच नव्हे तर 'वळवाचं पाणी पिऊन ढेकळं मऊमऊ झालेली. सित्या नि गंग्यानं त्येच्यावर कुळव धरलेला... पैली पाळी. ढेकळांचा कुळवाबुडी रगडून चुरा हुईत चाललेला. रान सप्पा हुतेलं... गुदगुल्या हुईत असतील. पोटात बीयाणं पडायच दिस जवळ आलं. (प्र.७) असे कुळव कामाच्या वर्णनाद्वारा लैंगिक समागमाचे होणारे सूचन किंवा... 'आयला कावळा नि कावळीन एका जागी दिसत न्हाईत. रातचं घरट्यात एक हुईत असतील., दार झाकून. बाकीच्या कावळ्यास्नी बिनकळता. माणसाचीच खोड (प्र.१७) अशी निरीक्षणे. शेवटी या गंडाचेच अविष्करण साधतात. 'रात चढत चाललेली. चांद वर ढगांतनं पांढरं पांढर उधळत भराभरा चाललेला. मी घोंगड्यावर एकटाच. सित्या भाकरी कवा घेऊन येतोय कुणाला खबर? पोटात रातची भूक (प्र.७) किंवा 'हिरव्या रानावर हळूहळू अंधार उतरु लागला. दीसभर हलकं हलकं झालेलं. मन अंधार येईल तसं जडजड झालं नि एकलकोंडं होऊन

खोपीत बसलं. (प्र.१५) अशा स्वरूपाचे 'गोतावळ्या'त सर्वभर भेटणारे उल्लेख नारबाच्या रूपाने दडपल्या गेलेल्या कामगंडाचेच दर्शन घडवतात.

कामपूर्तीची संधी देत नाही म्हणून नारबाला मालकाबद्दल आकस आहे., तर जे वांछित आपल्याला मिळत नाही ते (लग्न झाल्यामुळे) लाभलेला म्हणून सीतारामाबद्दलचा सूक्ष्म मत्सरही आहे. कामेच्छेच्या अतृप्तीतून येणारा एक विलक्षण एकटेपणा नारबाला सर्वांगाने वेढून राहिलेला आहे. यामुळे त्याचे मधूनच नेणिवेच्या धूसर प्रदेशात उतरणेही परिणामी दु:सह ठरते आहे. पाचव्या प्रकरणातील चांदण्यारात्री केलेली बैलगाडीतून दौड आणि शेवटी झालेला अपघात किंवा दहाव्या प्रकरणाअखेरीचे स्वप्न आणि त्यातील सर्वव्यापक घुबडे अशा प्रतिमा नारबा या व्यक्तिमनाच्या नेणिवेतील भयंकारी अस्ताव्यस्तताच दर्शवितात. विसाव्या प्रकरणाची अखेर म्हणजे त्याच्या नेणिवेचा नेमका धांडोळा आहे. 'भुंड्या बाईगत रिकामा दिसाय लागला.' अशा गोठ्याची ती प्रतिमा आहे. त्यात एक म्हैस आहे आणि नुसती चाण्णा-सोन्याची जोडी आहे. पाडी गेल्याने ते सर्वार्थाने अर्थशून्य झालेले आहेत. याशिवाय 'काळं राजा कुत्र बसलेलं' तेही कसे,तर 'तेबी अंगाची चुंबळ करुन, फुडच्या पायावर डोकं ठेऊन... इचार करणाऱ्या माणसागत.' विकल्या गेलेल्या जनावरांच्या जागा आणि खुंटे ओस पडलेले. त्यामुळे 'बाकीचा सबंध मांडव पोखरलेल्या सांगाड्यागत मोकळा.' हे सारे नेणिवेतील उदास अशा रितेपणाचेच चित्र आहे.

'गोतावळ्या'च्या शेवटीही चक्रावून टाकणाऱ्या नेणिवेच्या अनाकलनीयतेतच नारबासह नारबाचे निवेदन विलीन होताना दिसते. 'काय उन हे! सोसवत न्हाई, घेरी याय लागलीय. जीव नसल्यागत वाटाय लागलंय. पोटात लईच ढवळाय लागलंय... भवतीनं रान फिरतंय... किती रानं ही. एका रानाची साठ रानं. साठाची सातशे ... रानं...रानं...रानं... किती चालणार ही? काय करू तरी आता? या अखेरच्या टप्प्यात त्याला लागलेली ढाळ म्हणजेही एक मानसिक उपसाच आहे. पण त्यानेही मनाचा त्रिस्तरीय कोठा साफ होत नाही.

दडपलेल्या कामेच्छेबरोबर किंवा त्यामुळेही – न्यूनत्वाने जडावलेला अहंगंड नारबाच. या रूपाने संचारताना जाणवतो. स्वत:च्या अपुरेपणाची, एकटेपणाची असहाय्यतेची आणि परावलंबित्वाची पार खोलवर रुजलेली जाण त्यामागे आहे. लग्न करून देतो म्हणून ते न करून देणाऱ्या मालकाचे बोलणे - वागणे मान्य नसूनही या गंडापोटीच नारबाकडून त्याला विरोध केला जात नाही. एका सतत दबलेल्या वातावरणाखाली त्याचे व्यक्तित्व यामुळेच सतत वावरताना दिसते. दडपलेली कामेच्छा आणि हा न्यूनगंड यांच्या जोडीला विपरीत परिस्थितीची जाण

यामुळे त्याच्या प्रेरणांची प्रतिक्षिप्ततेची प्रवृत्तीही टेन्डन्सी टू रीफ्लेक्ट गारठलेली. मग शिल्लक राहते फक्त सहन करणे, वाट्याला येईल ते फक्त आपल्या ठायीच जिरवणे. नारबा तेच करताना दिसतो. यामुळेच त्याच्या ठायीचे निर्बंधकही विशेष कार्यकारी झालेले आहेत. त्यामुळेच लग्नाशिवाय अन्य मार्गाने कामेच्छापूर्ती साधणे किंवा सांगितलेले न ऐकण्यासारख्या अन्य मार्गाने मालकाला विरोध करणे नारबाला जमत नाही.

'गोतावळ्या'तील कोंबडा ही एक उल्लेखनीय प्रतिमा आहे. तोही नारबासारखा (कोंबडीविना) एकटा आहे. पण अशा एकटेपणामुळे किंवा दडपलेल्या कामेच्छेमुळे नमलेला नाही तर बिथरलेला आाहे. चढाईखोर झालेला आहे. हा कोंबडा म्हणजे नारबाचा कांक्षित अहं होय. तो मालकालाही जुमानीत नाही ही वस्तुस्थिती या संदर्भात महत्त्वाची ठरावी. वाटेल त्याच्यावर अगदी धामिणीसारख्या सापावरही तो हल्ला करतो. साऱ्या मळ्यावर राज्य चालवितो. तो असतो वा आहे तोवर सर्व दृष्टींनी कंगाल नारबाजवळ खूप काही असल्यासारखे असते. पण एकोणिसाव्या प्रकरणात मालकाच्या आज्ञेवरून तो कापला जातो आणि नारबाची खऱ्या अर्थाने घसरण सुरू होते. आणि २३व्या प्रकरणात तर नारबाचे गोतावळ्यातले अस्तित्वच संपुष्टात आल्यागत होते.

वस्तुस्थितीच्या कैचीत सापडलेल्या नारबा या व्यक्तिमनाने स्वत:च्या सोडवणुकीसाठी दोन मार्ग शोधलेले दिसतात. तेही अगदी नैसर्गिकपणे किंवा निसर्गनियमानुसार या कैचीलाच फुटल्यासारखे. पहिला मार्ग उदात्तीकरणाचा. याद्वारा नारबा स्वत:ला शेती आणि गुरेढोरे यांच्यात वाटून टाकताना दिसतो. त्याचे दृश्य रूप म्हणजे नारबा मळ्याशी, तिथल्या पीकपाण्याशी आणि गुराढोरांशी साधत असलेला भावनात्मक संवाद. गाय बैल आदि प्राणी सोडाच, पण विरोधाने तो कोल्हे, मुंगूस, रानबोका, वानरे, साप किंवा पिकात चरून नुकसान करणारी गाढवे यांच्याशीही संवाद साधताना दिसतो. ते सारे त्याच्या ठिकाणीच्या अतृप्त, ठसठसणाऱ्या प्रेरणांचे रुंदीकरण, समावेशीकरण किंवा उदात्तीकरणच होय. पण असे उदात्तीकरण मूळचे ठसठसणे थोडेफार कमी करू शकते; नाहीसे करू शकत नाही.

दुसरा मार्ग आत्मकणवेचा सेल्फ पिटीचा. ही कणव शेतीवरल्या जनावरांच्या संदर्भात सातत्याने व्यक्त झालेली आहे. आंधळ्या मारूत्या घोडा, म्हातारा म्हालिंगा बैल, नामी कुत्री यांच्या अखेरच्या क्षणाच्या निमित्ताने ती व्यक्त होतेच; पण मालकाकरवी विकल्या जाणाऱ्या किंवा दुर्लक्षिल्या जाणाऱ्या प्रत्येक ढोरासंगे तिचेच निनाद उमटत जातात. त्यांच्या बद्दल स्वगत बोलताना नारबा परिणामी आत्मप्रक्षेपणच

साधतो. स्वत:विषयीच भळभळून बोलतो. उदा. 'रात न्हाई...ध्याड न्हाई; कवाबी कामाला वडली. कितीदा तरी वडली. हू न्हाई का चू न्हाई. कामापाई कचणीनं डोसकी चिरून टाकली... तरीबी गपगार... कामं करून मरमर मेली तरी मालकाला माया न्हाई...(प्रकरण १६ अखेर)

उदात्तीकरण आणि आत्मकणव यांच्या उभ्या आडव्या धाग्यांनी 'गोतावळ्या'चा संपूर्ण पट अगदी भारावून गेला आहे.

अत्यंत प्रतिकूल स्थितीतही नारबा हे व्यक्तिमन जगू पाहते, आपले रुग्ण अस्तित्व टिकवू पाहते. ते जीवनेच्छेच्या एरॉसच्या जोरावर. यासाठी ते कधी मुक्या जनावरांच्या मायेचा आधार घेते तर कधी शेताच्या सर्जनशीलतेचा. मालक दाखवीत असलेल्या लग्नाच्या आमिषाचा, तर कधी ऋतुमानानुसार बदलणाऱ्या सृष्टीच्या विलासाचा. कामप्रेरणेच्या तृप्तीची आणि प्रभुत्व संपादनाची आशा असलेल्या प्रेरणामूल गंडाची म्हणजे लिबिडो ची त्याला, त्याच्या अस्तित्व टिकवण्याच्या इच्छेला साथ मिळते. त्यातून संभवणाऱ्या जाणिवा कधी जोराची उचल घेतात आणि त्याचे सारे मनोविश्व अनुकूलतेच्या हिंदोळ्यावर आंदोलू लागते. तेरावे प्रकरण याचे दर्शक आहे. इथे आकाराला येणारी प्रतिमा पोळ्याच्या सणाची आहे. सततच्या अन्तर्यामीच्या दडपणाच्या भाऊगर्दीतून (म्हणजे शेतीच्या काबाडकष्टातून आत्मसमकक्ष गुराढोरांसह) त्यांचे मन निसटलेले आहे. (खरं म्हंजे आज बेंदराचा सण... रान मोकळमोकळ.) रेड्यांस्नीबी आज कासरा न्हवता, काचण्या न्हवत्या... म्हालिंग्या तर आज पाऽर मोकळा झाला हुता. गळ्यात ना दावं ना कंडा' (प्रकरण १३) नारबाला सकाळी सकाळी भारद्वाज पक्ष्याचे शुभंकर दर्शन घडते ही शिवत्वाचीच होणारी जाणीव. सर्व जनावरांच्या रूपाने नारबा आपल्या मनोविश्वालाच आंघोळ घालतो. धुऊन पुसून लखलखीत करतो. सजवतो. मालकाची आज्ञा झुगारून द्यायलाही तो आज सिद्ध झालेला आहे. मालकाने 'बैल नदीला धुण्यासाठी नेऊ का' असा निरोप दिल्याचे मालकाचा मुलगा सांगतो. त्यावर नारबा म्हणतो, 'त्यांस्नी काय कळतंय?' मुलगा पुन्हा म्हणतो 'बाबा रागाला येईल बघ तुला.' नारबा उत्तरतो, 'येऊ दे. माझं मी बघतो ते.' इतकेच नव्हे तर तो मालकाशीही वाद घालतो. सणाची अंडी औताच्या बैलांना प्रथम न पाजता दावणीच्या सर्वात जुन्या म्हालिंग्या बैलाला पाजली पाहिजे असे सरळ सरळ मालकाला सांगतो. मालक म्हणतो, 'आता काय धन देणार आहे तो बैल? हाडं वैकुंठाला गेल्यात की आता त्येची.' त्यावर नारबा म्हणतो, 'हे बघा तुमच तुमी जावा घराकडं. बैलांचं आणि ढोरांचं माझं मी बघतो. माला हाय काळजी बैलांची.' नारबाच्या उसळण्यावर मालक नमतो आणि म्हणतो, 'काय तरी करा तर' आणि 'उसाकडनं

फेरी माराय म्हणून' निघून जातो.

पण इथेही शेवटी अतृप्त कामगंड फडा काढतोच. ''पाडीनं सित्याच्या हातातला किचडा हुंगून सोडून दिला. सित्या गमतीनं म्हणाला, 'रांड पाळती काय रं?' 'पाळला तर पाळू दे. कुणीतरी पाळावा' —(नारबा). 'ते कुठलं रे? गरबार म्हणून पत करती वाटतं... काय उपासतापास, नवससायास चालल्यात कुणाला दखल? —(सित्या). 'कशापाई?'—(नारबा) 'पाडा व्हावा म्हणून असंल' —(सित्या) मी हासलो. सित्याची मोठी गंमत वाटली. 'सित्या बायकूला कितवा म्हैना रं?' 'हॅऽल! अजून काय न्हाई' सित्या लाजला. 'लेका बायकूला पोट आलय नि... काळजी घेत जा तिची.' 'गप्प बस बेन्या'— (सित्या)'' इथे सित्याच्या तोंडून बेन्या हा शब्दही सहज आलेला वाटला तरी तो सहज नाही. या वीर्यदर्शक शब्दाचा वापर योजनापूर्वक पार नेणिवेतून झालेला अहे. त्यामागे उभा आहे तो कामगंडच.

या इरॉस आणि लिबिडो चा विध्वंस २१व्या प्रकरणात होताना दिसतो. त्यासाठी निर्माण झालेली प्रतिमा पिंपळाची आहे. आधी बाकीची झाडे साफ केली जातात. ''पिंपळाला हात घालायच्या आदूगर मालकाला म्हणालो, 'मालक, पिप्पळ कशाला तोडता?' 'ठेऊन तरी काय फायदा? ना फळ ना फूल.' 'माळाला चरणाऱ्या ढोरास्नी सावली हुती. तेवढीच माळाला सोभा.' 'हंऽऽ! आता ह्यो माळ तरी कुठं ठेवायचा हाय? पाक नांगरून पावसुळ्यात थोडं थोडं पीक करायच ह्यात.' मालक बोलून घराकडं गेला.'' शेवटी पिंपळावर कुऱ्हाडे पडतात. 'माळाच्या तळात पाणी होडकत गेलेल्या पिंपळाच्या मुळ्या उघड्या होऊ लागल्या. गोऱ्यापान. शंभरदीडशे वरसं तरी त्येंनी त्या माळासंगं संसार केलेला. बारक्या मुळ्यांवर कचाकच कुऱ्हाडीचं घाव पडू लागलं. कचांतनं घटघटीत चीक रगात बाहीर पडल्यागत येऊ लागला. टरफालं उडू लागली. माणसं वर चढून खालनं वरनं झाडाच्या ढाप्या तोडायच्या कशा याचा इचार करू लागली. कैद्याच्या दंडाला बांधल्यागत लांबलांब काढण्या दांडग्या ढाप्यांस्नी कचकचून बांधल्या... पिंपळ वर निवांत. माळावरनं गावाकडं त्येची नजर माळ्याच्या सगळ्या रानभर, डोंगराकडं, खोपीकडं, हिरीकडं... सगळीकडं पानांचं डोळं चमकतेलं. मी हितं हाय, चिंता नगं, — असं गावातल्या ढोरास्नी म्हणणार. वर समदीकडं बघत सळसळणारं... किल्ल्याचा बुरूज ढासळल्यागत एकदिशी त्येचं जंगच्या जंग खोड खाली पडलं नि टरकात घालून न्हेलं. गुळाला मुंग्या लागल्यागत ढाप्यांचं खांडूळं करून आठ-धा गाड्यांनी पिप्पळ हळूहळू न्हेला. माळाजवळ वर करायला आया योकबी हात नव्हता. सारं माळरान उनात बेशुद्धी उताणं पडल्यागत दिसत

हुतं...' या साऱ्या वर्णनातील प्रत्येक बारकावा लक्षात घेण्यासारखा आहे. जिथे त्यांच्या आधारावर जगणे सिद्ध होते, त्याला एक प्रचंड परंपरा लाभते. त्या सनातन प्रेरणांवरच घातलेले घाव दिसू लागतात. त्यामुळे विलक्षण ओकाबोका झालेल, खरडून निघालेला, वैराण वैराण असा मनाचा तळ जाणवायला लागतो.

यानंतर लगेच २२व्या प्रकरणात ट्रॅक्टरचे आगमन होते. ते बिनबोभाट होत नाही. त्यावेळी 'समदी खोप हदराय' लागते. 'राँञ राँञ राँञ आवाज येऊ लागतो. नारबाची 'कुणीतरी मानत धक्का दिल्यागत नीज'उडते. तो ट्याक्टर गावाकडनं पांदीची झाडं गिळाय धावल्यागत पळत' येतो. 'खोपीकडं पिसाळलेल्या हत्तीगत' धावतो. 'जवळ येईल तसा सगळा माळ नी मळा हदराय' लागतो. या ट्रॅक्टरचा 'रेडा मुरगळून घालावा तसा पाठीमागचा योक योक टायर दिसत हुता.'

'गोतावळ्या'च्या पहिल्या प्रकरणापासून या ट्रॅक्टरची (अशुभ वाटावी अशी) सावली नारबा या व्यक्तिमनावर पसरलेली आहे. त्याच्यावर एक जबरदस्त दडपण आणते आहे. कोल्हापूरचा पाव्हणा, मालक आणि ट्रॅक्टरचा ड्रायव्हर हे या ट्रॅक्टरचे तीन टप्प्यातील तीन गुमास्ते एजन्ट आहेत. या तिघाहीजणांबद्दल नारबा या व्यक्तिमनात अरुची, प्रतिकूलता आहे. मालकाबद्दल (विशेषत: ढोरांच्या निमित्ताने केलेल्या नारबाच्या स्वगतात) दिसते.

पहिल्याच प्रकरणात भेटणाऱ्या कोल्हापूरच्या पाव्हण्याचे दर्शनी रूप नारबा असे रेखाटतो — 'उच्चच्या उच्च. त्येची सावली माळावर लांबपत्तोर गेलेली... अजून तसाच नाळ - रोगी. व्हटांवरच्या मिशा काढलेला. भुंडा. पायात पट्यापट्याचं कसलंतरी चप्पल. हातपाय बारक्या पोरागत बिनकामानं मऊमऊ दिसतेलं. चुन्यात बुडीवल्यागत पांढरीधोट कापडं...' या पाव्हण्याच्या कपड्यांवर बुजलेल्या पाडीनं मुतात भिजलेली शेपटी फिरविल्याने 'चिङ्या चिङ्या' उठतात. मग नारबा पाणी आणतो... 'मालकानं कापडावरचं डाग घासून धुतलं. मालकाचं हात तरी एवढं कुठलं निर्मळ?डाग धुतलं पर गेलं न्हाईत. गडद हुतं ती पातळ झालं नि पसरलं.' हा सारा नारबाच्या विरोधी सुराला झालेल्या समाधानाचा अप्रत्यक्ष आविष्कार. त्यानंतर नारबा सांगतो, 'मी बारडी घेऊन फुडं चालू लागलो. (मालक व पाव्हणा यांचं) बोलणं चालूच हुतं. काय थोडं कळत हुतं नी काय थोडं कळत न्हवतं.' हेही परिस्थितीस अगदी योग्य नी सुसंगत. कारण नेणिवेतील विरोधी लाट जाणिवेच्या श्रवणकार्यात अडथळे आणीत होती.

नारबा घडवीत असलेले ड्रायव्हरचे रूपदर्शनही असेच लक्षात घेण्यासारखे आहे. — 'डुईला तेल लावलेला नी गळ्यात तांबडभडक रुमाल बांधलेला काळा मिचकूट डायवर'... 'त्येनं आपलं काळं मिचकूट हात धूतलं... माझी दुपारची

भाकरी गपागपा खाऊन टाकली. पाणी पिऊन निवाऱ्याला घटकंत घुर्र घुर्र घुर्र घोराय लागला. मालकानं दुपारी भाकरीच पाठवून दिली न्हाई. मी उपाशीच.' हा ड्रायव्हर नारबाला 'नाऱ्या' म्हणतो. सारखी आपली कामे करायला सांगतो. चाण्णानं लाथ मारली म्हणून त्याला काठीनं बडवून काढतो. तेव्हा नारबा त्याच्या हातची काठी हिसकून घेतो आणि त्याला उचलून रानात सोडून देतो. त्यासाठी मालक नारबाला रागावतो आणि काम सोडून जाण्यास फर्मावतो.

या साऱ्याच्या बुडाशी ट्रॅक्टर आहे; आणि ट्रॅक्टर ही एक प्रतिमा आहे. तिच्या द्वारा आविष्कृत होते ती मृत्यूविषयीची सहज प्रवृत्ती, भयगंड, आपल्या अस्तित्वाला असलेल्या सततच्या धोक्याची सूचना या गंडाद्वारा नेणिवेतून येते. ती नकोशी असते, पण असे नकोसेपण तिला नाहीसे करू शकत नाही. प्रसंगी तिला विरोध होऊ शकतो. - जसा ड्रायव्हरला नारबाने केला. पण असा विरोध विजयी तर होत नाहीच, टिकूही शकत नाही. कोल्हापूरचा पाव्हणा, मालक आणि ड्रायव्हर हे ट्रॅक्टरचे, म्हणजे या भयगंडाचेच गुमास्ते होत. त्यांच्या द्वारा नारबाचे सारे मनोविश्वच उद्ध्वस्त होते.

गोतावळा या कादंबरीचे लेखन करताना आपण जाणीव, अर्धजाणीव आणि नेणीव यांनी बनणाऱ्या त्रिस्तरीय मनाच्या तळाच्या नेणीव या स्तरावरील काही सहज प्रेरणा, सहजप्रवृत्ती आणि गंड यांचा मेळ साधतो आहोत याची कल्पना लेखक आनंद यादव यांना असेलच असे नाही. उलट तशी कल्पना नसण्याचा संभवच जास्त. कारण साहित्यकृतीतींल व्यक्तिमनांच्या कृतीउक्तींची एका कथात्म पातळीवर संघटना बांधण्यातच लेखक व्यग्र असतो. साहित्य कलेचे म्हणून जे काही असतील ते नियम सांभाळीत जाणिवेच्या पातळीवर तो कार्यरत झालेला असतो.

तसा साहित्यकृताचा लेखनव्यवहार हा जाणिवेच्या पातळीवरून होणारा व्यवहार आहे असे म्हटले जाते. ते एका मर्यादेपर्यंत खरेही आहे. कथात्म साहित्यकृतीतून दिसणारे सर्व विश्व जाणिवेच्या पातळीवरील तर्कशुद्ध आणि तर्कबद्ध धाग्यांनी विणलेले दिसते. जाणिवेच्या पातळीमुळे त्यात बुद्धीचे, विचार शक्तीचे कार्यही सहभागी झालेले असते. गोतावळ्याच्या बाबतीत तसेच झालेले असावे. आजवर गोतावळ्यावर झालेले विपुल समीक्षालेखन पाहिले तर सर्व समीक्षकांनी हा दृष्टिकोनच स्वीकारलेला दिसतो.

पण जाणिवेच्या पातळीवरील बुद्धीच्या कक्षेत येणारे अनेक व्यवहार नेणिवेतून संभवलेले असतात असेही दिसते. अगदी तर्काच्या आधारेही तिची संगती लागत नाही असे अनेकदा होते. आई व्यभिचारी असून तिनेच आपल्या काकाशी

संगनमत करून नवऱ्याला म्हणजे आपल्या वडिलांना ठार मारले हे समजूनही हॅम्लेट आपल्या आईला शासन करीत नाही याचे कारण जाणिवेच्या पातळीवर सापडत नाही म्हणूनच डॉ. अर्नेस्ट जोन्स नेणिवेच्या गुहेकडे वळला आणि त्याने ओडिपस — मातृकाम्येच्या आधारे कारणाचा शोध घेतला. तेव्हा जाणिवेच्या पातळीवर दाखवलेले सर्वच व्यवहार त्या पातळीवरून गम्य होतातच असे म्हणता येत नाही.

वरवर पाहिले तर साधारणपणे जाणिवेच्या पातळीवरील व्यवहार दिसतात, समजतात आणि नेणिवेच्या पातळीवरील व्यवहार दिसत, समजत नाहीत हा तर सततचा अनुभव आहे. पण नेणिवेच्या पातळीवरील हालचाल समजूच शकत नाही असे नाही. त्याकरिता थोडी खोल बुडी घ्यावी लागते. संहिता बारकाईने पिंजावी लागते. थोड्याफार प्रयत्नांनी या हालचालीचा सुगावा लागू शकतो. इतकेच नव्हे, नेणिवेची अदृष्य वास्तव आणि जाणिवेचे दृष्य वास्तव यांचीही संगती लागू शकते. त्यांच्यातील मेळाचा पडताळा येऊ शकतो. हाही साहित्यकृतीच्या अन्तर्यामाचाच एक शोध होय. मानसशास्त्रीय समीक्षा या शोधाच्या रोखाने आपली स्वतंत्र वाट निर्माण करते आणि जाणिवेच्या पातळीवरील दृश्य बुरखे बाजूला करीत नेणिवेच्या तळावरील बिनरंगांच्या सहज वासनाप्रवृत्तिंचा वेध घेते. या एकदम न दिसणाऱ्या वा जाणवणाऱ्या मनोविशेषांची संघटना शोधणे, तिचे कायदेकानू समजून घेणे आणि जाणिवेच्या पातळीवरील दृश्य संघटनेशी तिची सांगड घालणे हे अशा मानसशास्त्रीय समीक्षेचे कार्य ठरते. खरे तर ज्ञात जाणिवेच्या पातळीवरून नेणिवेची अज्ञात म्हटली जाणारी पातळी उलगडण्याचाच हा प्रयत्न होय.

मानसशास्त्रीय समीक्षा म्हणजे १९४५ नंतरच्या नवसाहित्याच्या काळापासून मराठी साहित्यसृष्टीत नावारूपाला आलेले मनोविश्लेषण नव्हे तसे मानवी मनाशी संबंधित असल्यामुळे सर्वच साहित्य व त्यावरील समीक्षा मानसशास्त्रीय असली तरीही मानसशास्त्रीय समीक्षेचा संसार वेगळा आहे. मनोविश्लेषणाचा प्रवासमार्ग आणि साध्य ठरलेले असते. या दोन्ही गोष्टी प्रामुख्याने जाणिवेच्या पातळीवरीलच असतात. क्वचित कुठेतरी चवीपुरता नेणिवेचा किंवा एखाद्या प्रेरणा-गंडाचा निर्देश होतो इतकेच. मानसशास्त्रानेही मनाच्या व्यवहाराचे सर्व कोष्टक पूर्णपणे उलगडले आहे असे नाही. मानसिक व्यवहारामागचे सर्वच कायदेकानू प्रयोगाद्वारे सिद्ध केलेले आहेत असे तर नाहीच नाही. तरीपण या शास्त्राने मानवी मनाच्या जटिलतेत प्रवेश करण्याचा एक मार्ग दाखवून दिला आहे. जाणिवेच्या स्तराशिवाय मनाला आणखी दोन स्तर असतात आणि तेच मानवी मनाच्या व्यवहाराच्या

संदर्भात अनेकदा निर्णायक असतात ही या शास्त्राने दिलेली दृष्टी मोठीच लक्षणीय आहे. मानसशास्त्रीय समीक्षेचा आधार ही दृष्टीच आहे. तिचा वापर करून काढल्या जाणाऱ्या निष्कर्षात कित्येकदा नेमकेपणा वा ठामपणा नसूही शकेल. साहित्यकृतीचे मूल्यमापन वा प्रतवारी ठरविता न येणे ही तिची मर्यादाही असू शकेल. तिच्या मदतीने साहित्यकृतीची कलात्मकता कशी निश्चित करायची हा पेचही ठरू शकेल. पण मानवी मन हे केंद्र धरून निर्माण होणाऱ्या साहित्यविश्वातील कृतीउक्तींचा गुंता उलगडण्याच्या प्रयत्नांना ही समीक्षापद्धती एक मूलगामी परिणाम देऊ शकते हे मान्य करण्यास अडचण येऊ नये. याचे मोल निश्चितच मोठे ठरेल.

'गोतावळ्या'त जाणिवेच्या पातळीवर एक संघटना बांधत असतानाच नेणिवेच्या पातळीवरही (कदाचित त्यांच्या स्वत:च्या नकळत )सहजप्रवृत्ती, प्रेरणा, गंड यांचीही एक संघटना आनंद यादवांनी बांधली आहे. त्यांचे हे यश निश्चितच खास उल्लेखनीय व लक्षणीय आहे. खास अशासाठी की सगळ्याच सिद्धहस्त लेखकांना जमेल अशी ही कामगिरी नव्हे

इथे आणखी एका गोष्टीचा उल्लेख करायला हवा. एक रूपकात्मक रचना म्हणून साहित्यकृतीचा उलगडा मानसशास्त्रीय समीक्षेत होत नसतो. त्यामुळे जाणिवेच्या पातळीवरून प्रकट झालेल्या साहित्यविश्वातील प्रत्येक घटकाची नेणिवेतील प्रवृत्तीप्रेरणाशी एकास एक अशी बरोबरी दाखविण्याच्या कारागिरीत ती पडत नाही. तिचा वेध व्यापक असतो. नेणिवेतील सत्त्व जाणिवेच्या पातळीवरून व्यक्त होताना त्यासोबत इकडचे तिकडचे असे अनेक घटक विशेष जमा होत असतात हे तिने गृहीत धरलेले असते.

आनंद यादवांच्या 'गोतावळ्या'त असा दोन्ही पातळ्यांचा मेळ कसा साधला गेला किंवा एकंदरीत तो कसा साधला जातो, या प्रश्नाचे नेमके उत्तर देणे तितकेसे शक्य नाही. असे सांगता येईल की, आविष्कारासाठीचे अनुभव सर्वांगानी लेखकाच्या मनात खोल खोल मुरलेले असले की हे साधू शकते. अशा अनुभवांची हाक जाणिवेचा स्तर ओलांडून पार नेणिवेच्या गुहेपर्यंत पोहोचते, आणि नेणिवेतून उठलेल्या अज्ञात, तर्कमुक्त अशा प्रत्युत्तरासह ते अनुभव साहित्यकृतीतून रूपबद्ध होतात. यामुळेच की काय सर्वच साहित्यकृतींबाबत मानसशास्त्रीय समीक्षेचे उपायोजन करूनही अशा मेळापर्यंत पोहोचता येत नाही.

डॉ. अरविंद वामन कुलकर्णी

❒

**आगामी**




# ट्रॅव्हलिंग टू इन्फिनिटी

## माय लाइफ विथ स्टीफन

**जेन हॉकिंग**

अनुवाद **सुदर्शन आठवले**


आजच्या युगातील नामवंत वैज्ञानिकांच्या मालिकेतील एक वैशिष्ट्यपूर्ण नाव आहे, 'ब्रीफ हिस्ट्री ऑफ टाइम' या अडीच कोटी प्रतींच्या विक्रीचा विक्रम केलेल्या शास्त्रीय पुस्तकाचे लेखक, प्रोफेसर स्टीफन हॉकिंग. त्यांची पहिली पत्नी जेन हिने या पुस्तकात त्यांच्या असाधारण वैवाहिक जीवनाचे अंतरंग उलगडून दाखवले आहे. स्टीफन आपल्या बुद्धिबळावर गगनाला गवसणी घालत असताना 'मोटर-न्युरॉन' या मज्जासंस्थांच्या महाभयंकर रोगाने मात्र त्याच्या शरीराला जखडून ठेवले होते. आपल्या विकलांग पतीची दिवस-रात्र सेवा करणे आणि त्याच वेळी आपल्या वाढत्या कुटुंबाची काळजी वाहणे या दोन्ही कर्तव्यांचा समतोल राखण्यासाठी जेनने अथक परिश्रम केले. पतीची असाधारण प्रज्ञा, प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत त्याने पादाक्रांत केलेली यशशिखरे आणि त्यासाठी त्याला जेनने स्वत:च्या आंतरिक शक्तीचा दिलेला भक्कम आधार यांची ही कहाणी खरोखरच अविश्वसनीय वाटावी अशीच आहे. त्यांच्या पंचवीस वर्षांच्या वैवाहिक जीवनाची क्लेशकारक अशा घटस्फोटात झालेली परिणती, त्याच्या सेवेतील एका नर्ससाठी स्टीफनने जेनला दिलेली सोडचिठ्ठी आणि जेनने एका जुन्या मित्राशी केलेला विवाह – या साऱ्याच प्रसंगांतून लेखिकेच्या स्पष्टवक्तेपणाचा प्रत्यय येतो.

आत्यंतिक प्रांजलपणाने लिहिलेल्या, मन हेलावून टाकणाऱ्या आणि तरीही जागोजागी नर्म विनोदाची पखरण करणाऱ्या या संस्मरणिकेत जेन हॉकिंग हिने तिच्या गुंतागुंतीच्या, यातनामय वैवाहिक आयुष्यातील अवघड प्रसंग धीरोदात्तपणे दाखवताना नात्यांच्या विणी कशा उसवतात, हळव्या जखमा कशा उकलतात हेही हळुवारपणे चितारलेले आहे. त्यामुळे हे पुस्तक वाचकांना निरपेक्ष प्रेमाचे दर्शन घडवते.

पुस्तक परिचय

# इन द हॅन्ड्स ऑफ तालिबान

खंडणीसाठी अपहरण करणाऱ्या तालिबानांच्या नजरकैदेत सहा दिवस काढणाऱ्या डच पत्रकार तरुणीला दिसलेले त्यांचे अमानुष क्रौर्य आणि त्यांचे संवेदनशील स्वभाव विशेष




जॉन दे रिजके

२५०रु. - सभासदांना सवलतीत

ते सहा दिवस...

अफगाणिस्तानातली तालिबान राजवट म्हटल्यावर आपल्याला आठवतो तो हिंसाचार, स्त्रियांच्या शिक्षणावर घातलेली बंदी, त्यांच्यावरचे अत्याचार आणि दहशतवाद. आजवर या सगळ्या गोष्टींवर विविध अंगांनी, विविध बाजूंनी अनेक पुस्तके लिहिली गेली आहेत. यामध्ये आत्मकथनं आहेत, गोष्टी-कथा आहेत तसंच अभ्यासपूर्ण लेख, संपादनं केलेली पुस्तके किंवा प्रबंधही आहेत.

जाओनी दी रिजके लिखित 'इन द हॅन्ड्स ऑफ तालिबान' हे पुस्तकही वरील गटात मोडते.

जाओनी ही डच पत्रकार, बेल्जियमधल्या एका मासिकासाठी माहितीपूर्ण लेख तयार करण्यासाठी काही तालिबानांना भेटावयास जाते. तेव्हा तिचं अपहरण करण्यात येतं आणि त्यानंतर सहा दिवसांनी हवी ती खंडणी मिळाल्यावर, तिची सुटका करण्यात येते. या सहा दिवसांचे अनुभव जाओनी हिने पुस्तकरूपात मांडले आहेत. जाओनीची अनुभव मांडण्याची शैली ही ललित लेखनासारखी नाही, तर ती थेट - पत्रकारितेची शैली आहे. त्यामुळे या पुस्तकाला रिपोर्टरूपी आत्मकथन असं म्हणावं लागेल.

जाओनीच्या आयुष्यात ही घटना घडली ती २००८साली. काबूलपासून ५० किलोमीटर्सवर असलेल्या फ्रेंच पॅराटूपर्सच्या गटाला तालिबान्यांनी पकडलं आणि त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली. हत्याकांडाची सूत्रे गाझी या तालिबानी कमांडरकडे होती. असं का झालं, यामागे हत्या करणाऱ्यांची मानसिकता काय होती याचा शोध घेण्याचं एक पत्रकार या नात्याने जाओनीने ठरवलं. ४१ वर्षीय जाओनी या आधीही अशा काही मोहिमांसाठी काबूलला आलेली होती. आपल्या मित्राकडे - डेव्ह विल्यम्सकडे, काबूलला ती राहत होती. तिच्या आधी, काही फ्रेंच पत्रकारही तालिबान्यांना भेटले होते व त्यांची भेट यशस्वीही झाली होती. त्यामुळे जाओनीला वाटलं की आपली मोहिमही यशस्वी होईल. म्हणून ती एक दुभाष्या आणि मध्यस्थ यांना घेऊन गाझीला भेटायची मोहीम आखते. परंतु ती यशस्वी होत नाही, तिला हेर समजून तिचं अपहरण केलं जातं. आणि तब्बल सहा दिवस तिला त्या तालिबानी टोळी सोबत निर्मनुष्य डोंगराळ भागात फिरत राहावं लागतं.

अपहरण केल्यावर तिची सगळी कागदपत्रं, पैसे, फोन तिच्याकडून काढून घेतले जातात आणि सुरू होतो तो थरार! कारण संपूर्ण भिन्न

संस्कृती आणि भाषा असलेल्या लोकांबरोबर राहणं, तेही अपहरण होऊन, हे तिच्यासाठी भीतिदायक असतंच. पण अशा परिस्थितीत भीती वाटली तरी, ती न दाखवता तालिबान्यांशी जास्तीत जास्त जुळवून घेण्याची तारेवरची कसरत जाओनीला करावी लागते. या कथनात दोन स्वर आहेत.

पहिला स्वर आहे तो पत्रकार जाओनीचा. त्या लोकांच्या हालचाली, भाषा, तो प्रदेश, तिथला निसर्ग यांचं सूक्ष्म निरीक्षण करून ती ते नीट टिपते.

दुसरा स्वर आहे जीव वाचवण्यासाठी धडपडणाऱ्या, भीतीने घाबरलेल्या जाओनीचा! यात तिची भीती, जगण्याची इच्छा, त्यासाठी करावी लागणारी धडपड ती उत्कटपणे मांडते.

तिचा फोन जप्त झाल्यावर खंडणीच्या पैशांची व्यवस्था झाली आहे का नाही इतकंच जाणून घेण्यासाठी बाहेरच्या जगाशी संपर्क साधण्यापुरतंच तिला फोनवर बोलण्यास दिलं जातं. त्या फ्रेंच लोकांसारखं आपल्याला मारून टाकतील या भीतीच्या सावटात जाओनीला सहा दिवस काढावे लागतात. त्या गटात असलेला मुल्ला तिला तिने इस्लाममध्ये धर्मांतर करावं असं सांगतो. जेणेकरून ती मुस्लीम म्हणून मरेल आणि तिला सगळ्यांत चांगलं आणि दयाळू मरण मिळेल. त्यानंतरचं अधिक चांगलं जीवन प्राप्त होईल. हे सांगत असताना जाओनीला भीती वाटते. ती लिहिते, ''मी मनातल्या मनातच विचार करतेय की हे मला आत्ता मारून तर टाकणार नाहीत ना? त्याचं हे असं बोलणं म्हणजे मला मारून टाकणार असल्याची पूर्वसूचना तर नाहीये ना?''पुढे एके ठिकाणी जाओनी लिहिते की, ''मी त्यांच्याकडून कुराणमधल्या काही ओळी म्हणायला शिकले कारण मला त्यांच्याशी नीट संबंध प्रस्थापित करायचे होते. उगीच त्यांच्याविरुद्ध काही वावगं वागायचं नव्हतं जेणेकरून ते माझ्या जीवावर बेतेल! इतकंच नाही यासाठी तर मी त्यांना डच बडबडगीतही शिकवलं!' एके दिवशी फळं चिरून देत असताना गाझी म्हणतो की, हीच ती सुरी होती, जिने मी त्या फ्रेंच लोकांचा गळा चिरला! त्याच्या बोलण्यातला त्वेष आणि त्याच्या डोळ्यातला द्वेष पाहून जाओनी घाबरते. पैसे मिळाले नाहीत तर आपल्यालाही असंच चिरून टाकलं तर! जाओनीला भीती वाटते. तिच्या अंगावरून सरसरून काटा जातो. पण तिला आपलं डोकं शांत ठेवावं लागतं आणि आपण

न घाबरल्याचं दाखवावं लागतं.

या नाट्यातला सर्वांत महत्त्वाचा टप्पा आहे तो तालिबान्यांनी सांगितलेली रक्कम देण्यास नेदरलँडस सरकारने दिलेल्या नकाराचा. जाओनी लिहिते की, अशा प्रकारच्या अपहरण करून पैसे उकळण्याच्या गोष्टींना खतपाणी मिळू नये, त्यांना आळा बसावा म्हणून सरकारने पैसे देण्यास नकार दिला असावा. पण त्यामुळे माझी मात्र भीतीने गाळण उडाली. आता आपण नक्कीच मारल्या जाऊ असं खात्रीनं वाटू लागलं. आम्ही एकमेकांशी बोलत असलो, मी कुराण व ते डच वगैरे शिकत असले तरी ते एका मर्यादेपर्यंतच ठीक होतं. म्हणून दोन मुलांच्या या कुमारी आईला सोडवण्यासाठी तिचा मित्र डेव्ह आणि तिच्या ऑफिसमध्ये काम करणारे मित्र-सहकारी मिळून पैसे देतात आणि अखेर तिची सुटका होते.

या सहा दिवसांत जाओनीला काही चांगलेही अनुभव येतात. चांगले असं सांगण्याचा हेतू हा की तालिबानीदेखील माणसंच असल्याचं, त्यांनाही भावभावना असल्याचं या सहा दिवसांत लक्षात आलं असं ती म्हणते. जाओनी लिहिते, ''आम्ही कधी कधी जोक्सही सांगायचो आणि हसायचो. एकदा तर त्यांनी मला मुजाहिद्दीन हॅट - ज्याला पाकोल असं म्हणतात तीही घालायला दिली आणि मी त्यांना काही गाणी शिकवली.''

एकदा त्यांनी तिला विचारलं की, तुम्हा परदेशी माणसांची त्वचा इतकी चांगली का असते. तेव्हा ती म्हणाली की, आम्ही दुग्धजन्य पदार्थ खूप खातो म्हणून असेल कदाचित. हे कळताच त्यांच्यातल्या एकाने गावांमधून तिच्यासाठी चीझ आणले आणि तिला खाऊ घातले. अपहरण केल्यावर खाण्याचे, पिण्याचे हाल होतील असं सुरुवातीला जाओनीला वाटतं. पण तसं होत नाही. त्या गटामध्ये असलेल्या मौलवीला पहिल्यांदा खाण्याचा हिस्सा दिल्यानंतर (मौलवी हा इस्लामी धर्मगुरू व तत्त्वज्ञ असतो. त्याला इस्लाम धर्मात आदराचे स्थान असते.), जाओनीला देण्यात येई. ती आजारी पडू नये म्हणून तिला व्हिटॅमिन्सच्या गोळ्या देण्यात येत. रात्री थंडीपासून बचाव करण्यासाठी ब्लॅकेंट्स देण्यात येत. डोंगराळ भागांमध्ये इकडून तिकडे फिरताना सामान वाहण्यासाठीही मदत करण्यात येई. अर्थात यामागे वेगळा हेतू असा की गाझी कमांडरसाठी जाओनी ही पैसे मिळवण्याचं साधन होती, त्यामुळे तिला नीट ठेवणं त्याच्यासाठी आवश्यक होतं. पण असं त्या पॅराट्रूपर्सच्या बाबतीत मात्र का घडलं नाही असा प्रश्न जाओनीला पडतो. या सहा दिवसांमध्ये

जाओनी व तालिबान यांमध्ये काही गोष्टींची देवाणघेवाणही होते. मौलवी व गाझी तिला कुराणमधल्या काही आयता (श्लोक किंवा ओळी) म्हणायला शिकवतात. तर जाओनीदेखील त्यांना डचमधले आकडे व थोडीफार डच भाषा शिकवते. जो माणूस कुराणमधल्या विशिष्ट ओळी म्हणतो तो मुसलमान होतो. त्यामुळे मी तुला या ओळी म्हणायला शिकवतोय असंही गाझी तिला सांगतो. तिचे उच्चार आणि तिचा शिकण्याचा वेग याचंही तो मनापासून कौतुक करतो आणि प्रत्येक प्रार्थनेच्या वेळी मुद्दाम तिच्याकडून या आयता म्हणवून घेतो.

इतकेच नाही तर जेव्हा तिची सुटका करण्यात येते तेव्हा गाझी तिला म्हणतो, ''तू बेल्जियमला पोहोचलीस की मला कॉल कर!'' आणि तो तिला आपला संपर्क क्रमांक देतो. जाताना तिच्याकडून कुराणमधल्या ओळी म्हणवून घेतो आणि तिची सुटका करतो. असा हा गाझी तिच्यावर बलात्कार करतो तेव्हा माणूस आणि त्याच्या मनाच्या काळ्या-पांढऱ्या बाजू यांचं कोडं न उमजणारं आहे असं तिला वाटतं.

तालिबान कमांडर गाझीचं वर्णन करताना जाओनी म्हणते की, ते अस्वस्थ व्यक्तिमत्त्व आहे. त्याचा इस्लामवर पूर्ण विश्वास आहे आणि त्यासाठी तो अगदी मरायलाही तयार आहे. त्यांचा गट म्हणजे जणू त्या खऱ्या डोंगरात फिरणाऱ्या मेंढ्याच! कारण त्याला आणि त्याच्या गटातल्या माणसांना त्या भागाची खडानखडा माहिती आहे. गावातले काही लोक त्यांना मदत करायचे पण ते जेवण आणि अत्यावश्यक गोष्टी कशा काय गुप्तपणे आमच्यापर्यंत पोहोचवायचे हे मला कधीच कळलं नाही.

...शेवटी जाओनीची सुटका होते. तिचे ते सहा दिवस विलक्षण अस्वस्थ, भयग्रस्त तसेच काही प्रमाणात गमतीशीर आणि भरपूर काही शिकवणारे असतात. जाओनी म्हणते, मी तिथे असताना मला फक्त जिवंत राहायचे होते. केवळ जिवंत!

प्रणव सखदेव

sakhadeopranav@gmail.com


❒

# Press

## Gayatri's Maths Mantra

Gayatri Lodha

She is only thirteen years old, but if one were to meet Gayatri Lodha, an eighth standard student of Pune's well-known St Anne's Primary School, he would be astounded at the numerical ability she possesses.




This mathematics genius has not only solved complex math problems, but also published her own book titled ***Gayatri's Maths Mantra,*** under **Mehta Publications, Pune** at such a tender age. Give her that amazed 'that's-so-unbelievable' sort of a look and all you'll get is an innocent smile in return. "If you just play with numbers, you'll realise there is so much more that you can do with them. I just love solving sums, especially the difficult ones," she says, with a gleam of excitement in her eyes.

**(Mid-Day - August 16,2012.)**




Sheila McLeod Arnopoulos is the author of a novel and two other non-fiction books. She has won the *Governor General's Literary Award,* and has earned several journalism prizes for exposes about marginalized women and minorities. A former journalism professor, she spent a total of twenty-one months in India meeting grassroots women using micro credit to launch businesses and achieve social change.

While an investigative journalist at *The Montreal Star* she worked underground in several Montreal sweatshops and wrote about exploitation of immigrant women.

She has also reported from France, Greece, India, Switzerland and China. For many years she was also a professor of journalism in *Montreal.* Now she is focusing upon issues in connection with expansion of the social economy, whether in developing countries such as India or at home in Canada University and lives with her husband and two children.

# Book review




## Saris on Scooter

- Sheila McLeod Arnopoulos

When Muhammad Yunus, an economist and founder of Grameen Bank and a Nobel Prize winner developed the concept of microfinance it gave an impetus to the business aspirations of rural Indian women. Conventionally, poor entrepreneurs were turned away when they approached financial institutions for loans. But microfinance which gives micro loans to small businesses kicked off a revolution especially in rural India. Self-sufficiency suddenly became an achievable and realistic notion. Working silently and diligently rural Indian women made a definite power shift in the economic power centres within the Indian family structure which is traditionally male dominated. And this did not fail to attract the world's attention.

This is the backdrop of Canadian journalist Sheila McLeod Arnopoulos' book Saris on Scooter. Arnopoulos travelled rural as well as urban India

between 2001 and 2008 to investigate the transformative capacity of microfinance in combating abject poverty. On one level the book chronicles the conditions of poor rural women who are using microfinance to help their families. But on another, Arnopoulos gets involved up close with the subjects, often sharing their personal experiences, making her book *'Saris on Scooter'* much more than a success story of microfinance. She comments on the total Indian experience. Eating Hyderabadi Biryani, offering cakes and pastries to poor children begging on the streets, visiting cyber cafes to get online, IT industry in Hyderabad juxtaposed with poverty on the streets, her holding a workshop for rural women turned journalists and trying to communicate with them when she did not know the language, is all written with a stylish hand giving the reader an experience of multi-hued, multi-faceted rural and urban India.

Some unfortunate experiences like the Ahmedabad riots and her commentary on the political situation in Ahmedabad does read one sided. But the gory reality is there for the world to read and for us to be ashamed of.

Especially riveting is her experience with Bija, the seedkeeper, when she attended a course on organic farming at the Navdanya farm in Dehradun. Her subtle commentary on her rich urban host in Delhi is deliciously sarcastic.


The book becomes a travelogue at certain places as Arnopoulos describes her journeys to get to her destinations all over India in rickety rickshaws, crowded trains and unwieldy transportations.

Also, for a topic which can get tedious and boring, Arnopoulos has pulled off a tremendous feat with her lively descriptions of rural Indian women, post-office dramas where a simple task of sending off a package turns into a daunting effort, trying to catch the correct train on a crowded railway station with misleading instructions and her honest commentary on the great Indian urban-rural divide. It also gets the reader acquainted with organisations like SEWA who are helping rural women to keep poverty at bay with skills like embroidery.

*Saris on Scooter* is a tribute to the indefatigable spirit of rural and urban poor women who have learnt not to give up as long as microfinance is there to help them and Arnopoulos chronicles the trials and experiments of these women with sensitivity, honesty and an eye to detail.

A book worth reading and worth collecting indeed.

**- YASMIN DANDEKAR**




## Master Your Mind

– Dr. Neel Burton

Category - Mental Health Guide
Type - Paperback
Pages - 228
Price - Rs. 200.00


## Praise

This book is just what people need.
– Marjorie Wallace, Chief Executive, *SANE*


Simple, straightforward, and highly effective ... I often recommend it.
– Dr Chris Chopdar, *University of Oxford & Oxfordshire and Buckinghamshire Mental Healthcare Trust.*

*'Master your Mind'* is full of the sort of frank, objective medical advice that you always hope for when visiting a doctor about a mental health difficulty. What makes it an unique and important book is the way in which that advice is presented ... This is a self-help guide without fuss or over-analysis - and in a world where most self-help books are far too flowery and vague, 'Master your Mind' is a breath of fresh air.
– Laurie Penny, *One in Four Magazine*, April 2010


## New Books





Gayatri's Maths Mantra




Novgorod Diary





Paper Cranes




Saris on Scooters

**नवे कोरे**




# अंतरीचा दिवा

**वि. स. खांडेकर**

**संपादक**
**डॉ. सुनीलकुमार लवटे**

५५०रु. - सभासदांना सवलतीत

वि. स. खांडेकर आणि त्यांच्या साहित्याबद्दल मराठीत खूप लिहिलं गेलं आहे.

मात्र, त्यांच्या चित्रपटसृष्टीतील कामगिरीचा इतिहास झाकोळलेलाच राहिला.

याचं प्रमुख कारण होतं,


त्यांच्या पटकथांची अनुपलब्धता.

आता प्रथमच त्यांच्या पटकथांचा संग्रह 'अंतरीचा दिवा' मराठी वाचकांच्या हाती येत आहे. मराठी चित्रपटसृष्टीची मरगळ दूर होत असताना प्रज्वलित होणारा हा साहित्यिक नंदादीप पुन्हा एकदा ध्येयधुंद चित्रपटांची सांजवात पेटवत मराठी चित्रपटसृष्टीचा कायाकल्प घडवून आणील!

वि. स. खांडेकरांना मराठीचे मॅक्झिम गॉर्की, प्रेमचंद, शरच्चंद्र का म्हटलं जातं, हे समजून घ्यायचं तर हा 'अंतरीचा दिवा' आपल्या हृदयी मंद तेवत ठेवायलाच हवा.




# इस्लामनिष्ठ व्यक्तीची संघर्षमय जीवनकहाणी




९/११ अर्थात ११ सप्टेंबर ह्या दिवशी दहशतवाद्यांनी अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या उत्तुंग इमारतींवर विमानं धडकावली. या हल्ल्यात  लोक मरण पावले. प्रस्तुत पुस्तकाच्या संदर्भात ही तारीख महत्त्वाची आहे. ह्या हल्ल्यानंतर अमेरिकेने अफगाणिस्तानवर बॉम्ब वर्षाव केला. संशयितांची धरपकड केली. त्यांना अफगाणिस्तान , ग्वांटानामो व इतर ठिकाणी कैदेत ठेवले. त्यापैकी ग्वांटानामो ही जागा तिथल्या क्रूर छळामुळे खूपच कुप्रसिद्ध झाली.

मोआइझम बेग हे ग्वांटानामोत ठेवलेल्या अशा संशयितांपैकी एक. तीन वर्षांनंतर त्यांची कोणताही आरोप न ठेवता सुटका करण्यात आली. आपल्या ह्या अनुभवाची जीवनप्रवासाची कहाणी त्यांनी 'एनिमी कॉम्बॅटंट' ह्या पुस्तकात सांगितली आहे (सहलेखिका व्हिक्टोरिया ब्रिटन).

या पुस्तकाचा योगिनी वेंगुर्लेकर यांनी केलेला मराठी अनुवाद नुकताच मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे 'शत्रूशी दोन हात' या नावाने प्रकाशित झाला आहे.

मोआइझम बेग यांचे आई-वडील मूळचे भारतातील. फाळणीनंतर ते पाकिस्तानात गेले. मोआइझम यांचे वडील नंतर ब्रिटनचे नागरिक झाले. मोआइझम यांचा जन्म ब्रिटनमध्ये झाला, ते तिथेच वाढले. पुस्तकाची सुरुवात मोआइझम यांना पकडण्यात आले ह्या घटनेपासून होते. ते कुटुंबासह पाकिस्तानात राहत असताना डिसेंबर च्या मध्यरात्री त्यांना पकडण्यात आलं. पकडणारे पाकिस्तानचे सरकारी अधिकारी होते, तसेच अमेरिकेचे अधिकारीही हजर होते.

ह्या सुरुवातीनंतर मोआइझम यांनी आपली जडणघडण, जगभरातील मुसलमानांच्या प्रश्नांशी ते कसे एकरूप झालेले होत, इस्लामवर हल्ला होत आहे ही भावना त्यांच्या मनात कशी प्रबळ झाली होती मग ह्या कॉजसाठी त्यांनी काय सक्रिय मदत केली हे सविस्तर सांगितलं आहे. पकडल्यावर आधी अफगाणिस्तानातील कंदाहार-बाग्राममध्ये ठेवल्यानंतर त्यांना ग्वांटानामोत हलवण्यात आले. तीन वर्षे अमेरिकेच्या कैदेत असलेल्या व्यक्तीने लिहिलेले हे आत्मकथन असल्याने आपल्याला खूप माहिती मिळते. इस्लामवर कट्टर निष्ठा असलेली व्यक्ती कसा विचार करते, जगभर संघटन कसे असते यावर प्रकाश पडतो. मोआइझम यांनी ते ग्वांटानामोत असता कबुलीजबाब लिहून दिला. त्यात इतर काही गोष्टींबरोबरच' आपण अल कायदाचे आघाडीचे योद्धे होतो, त्यांनी काश्मीरमध्ये तिथल्या लोकांचा जो आझाद काश्मीरसाठी लढा सुरू होता, त्याकरता पैसे पाठवले व त्या पैशाचा उपयोग ९/११ च्या हल्ल्यासाठी झाला' या गोष्टीही मान्य केल्या. मात्र नंतर जीवाच्या धाकाने हे मान्य केले असे त्यांनी दिलं आहे.

अशी पुस्तकं आपण वाचतो त्या मागे आपला काही उद्देश असतो. सत्य काय आहे ते जाणून घेणं , जगाला कलाटणी देणाऱ्या घटनेच्या मागे काय कार्यकारणभाव आहे त्याचं आकलन करून घेणं.

सत्याचं आकलन व्हावं यासाठी आवश्यक असते पुस्तकातली प्रत्येक गोष्ट आहे तशी गृहीत न धरता विचार करत वाचत जाणे, निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न करणे. मोआइझम बेग वा अमेरिका यापैकी कोणाबद्दलही पूर्वग्रह ठेवायचा नाही अशी पाटी कोरी ठेवून आपण पुस्तक वाचायला सुरवात करतो. तथापि ग्वांटानामो हे नावच इतके बदनाम आहे की तिथल्या छळाच्या कथा ऐकायला मिळतील ही अपेक्षा जरूर असते. त्याबाबत प्रथम सांगायचं तर मोआइझम यांना तिथे धातूच्या कोठडीत एकांतवासात ठेवलं. बाहेर नेताना साखळदंडाने जखडून ठेवलं जायचं हे खरं , पण खूप शारीरिक मारहाण, लैंगिक अत्याचार झाले नाहीत. बेग यांनी स्वत:च त्याचे कारण दिले आहे, कदाचित कबुलीजबाबावर सही केल्यावर अमेरिकन लोकांची वागणूक खूप मवाळ झाली, जणू मित्र असल्यासारखे गोडीने वागायला लागले.

पहाऱ्यावरचे सैनिक त्यांच्याबरोबर विरंगुळ्याच्या गप्पा मारत. मनःस्थिती बिघडल्यावर दोनदा तर बेग यांनी पहारेकऱ्यांना शिव्या दिल्या, तेव्हाही पहारेकऱ्यांनी हात उगारला नाही. ते ब्रिटनचे नागरिक असल्यानेही बहुधा थर्ड डिग्रीचा प्रयोग त्यांच्यावर केला नसावा असे अनुमान काढता येईल.

पुस्तकात मोआइझम बेग यांच्या जडणघडणीचा भाग आहे. ते पंधरा वर्षांचे असताना ब्रिटनमध्ये वंशभेद वाढीला लागला. गोरे तरुण आशियायी तरुणांना मारहाण करत. 'पाकी गो बॅक' अशा घोषणा देत. त्याविरुद्ध आशियायी तरुणांनी लिंक्स नावाची संघटना बांधली. जशास तसं उत्तर देणं , गोऱ्या तरूणांना मार देणं सुरू केलं. मोआइझम बेग या संघटनेचे सक्रिय सभासद होते. इराकमध्ये मुसलमानांची जी हालत केली जात होता, त्यामुळे ते मुसलमानांच्या प्रश्नाशी एकरूप झाले. अमेरिकेने इराणचे तीनशे नागरिक मारले. मुस्लीमबहुल आखातात जागोजाग युद्ध सुरू होते. मुस्लिमांना जीव गमवावा लागत होता. जगभरातील अनेक देशात , केवळ मुस्लीम असल्याने लोकांना जीव गमवावा लागत आहे, असं बेग यांना वाटत होतं व त्याकरिता त्यांनी अफगाण, अल्जेरिया, सोमालिया, इस्रायल अशी अनेक देशांची यादी दिली आहे, त्यात भारताचंही नाव आहे. इस्लामसाठी काही करायचं ही भावना त्यांच्या मनात प्रबळ झाली ती साली त्यांनी अफगाणिस्तानातील प्रशिक्षणकेंद्रांना भेट दिल्यावर. या केंद्रात मुस्लीम तरुणांना शस्त्रं चालवण्याचं व लढाईचं प्रशिक्षण दिलं जात असे. बोस्नियातही मुस्लिमांचा संघर्ष सुरू होता. अडीच वर्षांच्या काळात त्यांनी सात-आठ वेळा बोस्नियाला भेट दिली. ब्रिटनमध्ये त्यांनी इस्लामिक पुस्तकांचं दुकान चालवलं. सर्वात महत्त्वाचं म्हणजे जून मध्ये त्यांनी कुटुंबासह इंग्लंड सोडलं आणि ते अफगाणिस्तानात राहायला गेले. ९/११ नंतर अमेरिकेने अफगाणवर बॉम्ब हल्ले सुरू केल्यामुळे त्यांना अफगाणिस्तान सोडावं लागलं व ते मुष्किलीने डिसेंबर मध्ये पाकिस्तानात पोचले आणि तिथेच त्यांना अटक झाली.

यावरून काय दिसतं? ९/११च्या केवळ तीन महिने आधी ते अफगाणिस्तानात सहकुटुंब गेले. मुस्लीम संस्कृतीत मुलांना वाढवायचं होतं, मुस्लीम आहे म्हणून भेद केला जाणार नाही अशा ठिकाणी त्यांना राहायचं होतं, तसंच अफगाणिस्तानात मदतकार्य, सेवा करायची होती... असा त्यांनी बचाव केला आहे. त्याआधीही बोस्निया आणि इतर संघर्षग्रस्त भागात त्यांचं जाणं-येणं होतं. जगभर त्यांचं जाळं होतं. ब्रिटनमधील पोलिसांना बेग यांच्याबद्दल आधीपासूनच संशय होता. त्यांच्या घरावर , दुकानावर छापे पडलेले होते. म्हणजेच अमेरिकेने अगदीच ज्याच्यावर संशयही घेतला जाऊ शकत नाही, अशा माणसाला पकडलं असं म्हणता येणार नाही. त्यांच्याकडे तसं सबळ कारण होतं. मात्र पुढे ते आरोप सिद्ध करू शकले नाहीत आणि सुटका झाली.

९/११चा हल्ला किंवा ब्रिटनमध्ये भुयारी रेल्वेत झालेले बॉम्बस्फोट, यामागे काही कारस्थान असल्याच्या (उदा. अमेरिकेने ९/११चा हल्ला स्वत:च घडवला) कल्पना ऐकायला मिळतात. याबाबत एक फार महत्वाची बाब बेग यांनी स्पष्ट केली आहे. ते म्हणतात, 'अशा गप्पा खऱ्या असत्या तर बरं झालं असतं. पण वस्तुस्थिती तशी नाही. असे दहशतवादी हल्ले करून मुस्लिमांची परिस्थिती सुधारणार नाही, त्यांना जास्त त्रासाला तोंड द्यावं लागेल.' तरुणपणी इंग्लडच्या सैन्यात भरती व्हावं असा त्यांनी विचार केला होता, पण त्यावेळेस आखातातील पहिल्या युद्धाला सुरुवात झाली होती. इंग्लड त्या देशाविरुद्ध लढत होते. मुस्लीम राष्ट्राशी युद्ध करण्याची गोष्टच मी सहन करू शकलो नाही, असे बेग यांनी लिहिलं आहे. त्यांची मानसिकता काय होती ते यामुळे कळते. आझाद काश्मीरमधील प्रशिक्षण केंद्रं पाकिस्तान सरकारच्या कृपेने चालत असा उल्लेखही आहे.

पुस्तकाचा अनुवाद योगिनी वेंगुर्लेकर यांनी उत्तम केलेला आहे. क्वचित काही ठिकाणी वाक्यरचना आणखी थोडी सोपी होऊ शकली असती. बेग यांनी अमेरिकेवर विडंबन काव्य लिहिले, त्याचा हिसका व उपरोध पोचवण्यासाठी गावरान भाषा वापरण्याची कल्पकता योगिनी वेंगुर्लेकर यांनी दाखवली आहे.

**उदय कुलकर्णी**

(महाराष्ट्र टाइम्स ५ ऑगस्ट २०१२)

❒


**प्रिय वाचकमित्रहो........**

आपल्या सोयीसाठी

**'मेहता पब्लिशिंग हाऊस'**चे ग्रंथदालन


आठवड्याचे सातही दिवस

नियमित सुरू राहील.

वेळ -सोम. ते शनि. ९.३० ते ६.३०

रविवारी सकाळी १० ते ४

**सभासदांनी पुस्तकखरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे.**



# ओळख लेखकांची

# शंकर पाटील

शंकर पाटलांची कथा ही मराठी कथेचे एक लेणे आहे. त्यांचं लेखन विलक्षण पारदर्शी! त्यांच्या कथेचा बाज केवळ रंजनार्थ नाही. त्यामागे सामाजिक जाणीव आहे. या कथानिर्मितीमागे प्रचंड घडामोड आहे, गुंतागुंत आहे. त्यांची कथा चिंतनाच्या डोहातूनच जन्मते. कथेद्वारे परंपरेपेक्षा परिवर्तन आणि ग्रामीण प्रश्न त्यांनी वाचकांसमोर ठेवले आहेत. खेड्यातली माणसं, त्यांच्यातीलपरस्पर संबंध आणि खेड्याचं मन हे त्यांच्या कथांचे विषय. त्यांचे लेखन हे त्यांच्या जगण्यातून उमलले आहे. ग्रामीण जीवन, ग्रामीण मन, ग्रामीण भाषा यांचा विचार करताना 'सारंच बदललं आहे' ही जाणीव त्यांना तीव्रतेने होते.

कधी ते जुन्या नव्यातील पडलेलं अंतर समजून घेतील तर कधी अवतीभवतीच्या माणसांशी गप्पा गोष्टी करण्यात रंगतील. आपलं गाव म्हणजे गोष्टींचा वाहता झरा. अशा वेगळ्याच गावाची पाटीलकी लाभलेला हा माणूस

'चार पाऊले उमटवू आपुली<br>
ठेवू खुणेचा मार्ग बरा'

असं म्हणत पाय नेतील तिकडे वाचकांना पथदर्शन करीत नेतो.

# शंकर पाटील यांची साहित्यसंपदा

| पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|
| वावरी शेंग | ८० |
| इल्लम | ९० |
| जुगलबंदी | १०० |
| ताजमहालमध्ये सरपंच | १०० |
| बंधारा | १०० |
| आभाळ | १०० |
| घालमेल | १०० |
| पाऊलवाटा | १०० |
| खुशखरेदी | १०० |
| धिंड | ११० |
| भेटीगाठी | ११० |

| पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|
| वळीव | १२० |
| फक्कड गोष्टी | १२० |
| श्रीगणेशा | १२० |
| पाटलांची चंची | १३० |
| गारवेल | १३० |
| खुळ्याची चावडी | १४० |
| टारफुला | २५० |
| लवंगी मिरची कोल्हापूरची | ६० |
| कथा अकलेच्या कांद्याची | ७० |
| शापित वास्तू | २८० |







# शंकर पाटील यांच्या
# ‘धिंड’ पुस्तकातील एक कथा

भर तिन्हीसांजेची वेळ होती. चावडीतही दिवाबत्ती दिसत होती. गाव कामगार पाटील तक्क्याला टेकून बसले होते. शेजारी तलाठीही होते. सनदीही सारे बसून होते.

आणि एकाएकी भातमाऱ्याचा शिरपा धापा टाकीत चावडीत आला आणि श्वास गिळत गडबडीनं म्हणाला, ‘‘पाटील, खोत गावलाय!’’

‘‘खोत गावलाय म्हणजे?’’

‘‘व्हय्, दारू पिऊन हाल्ट झालाय्!’’

‘‘कोण, राऊ?’’

‘‘व्हय्, राऊ खोत.’’

‘‘कुठं गावलाय्?’’

‘‘गावतोय् कुठं? घरातच बायकोसंगं धुमडी घालाय् लागलाय्. हाल्ट झालाय् बघा!’’

धापा टाकत शिरपा उभा राहिला आणि चावडी सारी खडबडून जागी झाली. बसलेले सनदी चटाटा उठून उभे राहिले. दप्तर उघडून बसलेले तलाठीही मान वर करून बघू लागले. मागं रेलून बसलेले पाटीलही आपलं बूड हलवत पुढं झुकले, एक नवा हुरूप आल्यागत झाला. पाटलांना हसू फुटलं. ह-ह-ह- करीत ते सनद्यांना म्हणाले-

‘‘अरं बघा बघा! त्याला घेऊन या जावा!’’

एक तिथे चार सनदी उठले आणि हातात काठ्या घेऊन बाहेर पडले. धूम पळत सुटले. पुन्हा एकदा बूड हलवून पाटील हसले आणि तराळाकडे बघून म्हणाले, ‘‘धोंडिबा!’’

‘‘जीऽ’’असं म्हणून धोंडिबा उभा राहिला आणि पाटील हसून म्हणाले-

‘‘बघत काय ऱ्हायलाईस? खोताचा राऊ दारू पिऊन हाल्ट झालाय्. अगुदर दौंडी द्यायला भाईर पड. पाक सारं गाव गोळा व्हायला पाहिजे. सूट!’’

तराळानं उभ्या उभ्या एकवार पटका बांधला आणि हातात घुंगराची काठी घेऊन तो म्हणाला,

‘‘काय सादवू?’’

‘‘सादीव की-’’

‘‘काय?’’

''म्हणावं, राऊ खोताची गाडवावरनं धिंड काढायची हाय. लगोलग सगळे लोक चावडीवर या, असं म्हण. दुसरं काय?''

घुंगराची काठी वाजवत तराळ बाहेर पडला आणि पहिली दवंडी चावडीसमोरच्या पटांगणातनंच त्यानं दिली. आपल्या पल्लेदार, खणखणीत आवाजात तो म्हणाला,

''ऐका हो ऐका!- राऊ खोत दारू प्यालाय. त्याची आता गाडवावरनं धिंड काढायची हाय. असंल तसं सगळ्यांनी लगोलग चावडीवर गोळा व्हावं हो ऽऽऽ''

कोपऱ्याकोपऱ्यावर उभा राहून तराळ साऱ्या गावातनं, गल्लीबोळातनं सादवत सुटला. दवंडी फिरू लागली आणि गाव सारं खडबडून जागं झालं.

कोण नुकते रानातनं आले होते, कोण येत होते, कोण धारा काढीत होते, कोण भाकरीची वाट बघत बसले होते. अशात ही दवंडी ऐकायला आली आणि कुणाला काही सुचेनासं झालं. भाकरी खायची विसरली. धारा पिळायच्या राहिल्या. जो तो चावडीकडं पळत सुटला! दाण दाण दाण माणसं पळत येऊ लागली. पोरांची झुंबड उडाली. हां हां म्हणता चावडीपुढं लोकांची जत्रा भरली. गाव सारं गोळा झालं. तोंडाला पाणी सुटलेले लोक मजा बघायला जिभल्या चाटीत उभे राहिले.

पंधरा ऑगस्टच्या मुहूर्तावर सगळ्या गावानं मिळून ठराव पास केला होता– कोण दारू पिईल त्याची गाढवावरनं धिंड काढायची, असं सर्वानुमते ठरलं होतं. आणि तेव्हापासून लोक ह्याची वाट बघत होते. कोण सापडतोय ह्या पाळतीवरच राहिले होते. एकमेकांवर पाळत ठेवून लोक असे वाट बघत होते. आणि अवघ्या चार दिवसांनीच हा प्रकार घडून आला होता. पंधरा ऑगस्टला ठराव पास केला होता आणि वीस ऑगस्टला आज राऊ खोत तावडीत सापडला होता! चांगला गावला होता! ज्याला त्याला सुरसुरी आली होती. दम निघत नव्हता. हां हां म्हणता लोकांनी जुन्या खेटरांची एक माळ तयार केली. हार झकास झाला होता. ज्यानं त्यानं आपला एकेक जोड त्यात ओवलाच होता! शिवाय एक नेटकं गाढव आणून तयार ठेवलं होतं. एकाला चार मोफत बत्त्या आल्या होत्या. अशी सगळी तयारी पूर्ण झाली होती आणि गाव सारं खोताचीच वाट बघत चावडीवर खोळंबलं होतं. सरपंच रामभाऊ विभुतेही चावडीत येऊन बसले होते. तवनाप, मगदुम, धनपाल, शेटे, आबालाल मुजावर आणि गणू तेली ही पंचमंडळी हजर होती. सारा लवाजमा गोळा झाला होता. पण राऊ खोताचाच अजून पत्ता नव्हता.

एवढ्यात गोमगाला ऐकायला आला! बसलेली माणसं उठून उभी राहिली. उभी राहिलेली माणसं माना वळवून बघू लागली. पोरं पळून खेळू लागली आणि माणसांचा एक लोंढा जवळ आला. चौघा-पांचजणांनी खोताला धरलं होतं आणि पाचपंचवीस माणसं मागं लागली होती. अशा लव्याजम्यासह खोत चावडीवर आला आणि टाळ्यांचा गजर झाला! कुणाचं बोलणं कुणाला ऐकू येईना झालं. तोंडात बोटं घालून पोरं शिट्ट्या मारू लागली. आरडाओरड होऊन सारं गाव दणाणून गेलं. मधेच गाढव उधळलं आणि ढुंगण उडवून लाथा झाडत साऱ्या पटांगणात आडवंतिडवं

पळत सुटलं.

अखेर गोंधळ थांबला. दंगा कमी झाला आणि चावडीत मिटिंग सुरू झाली. पटांगणातले लोकही कान देऊन ऐकत राहिले. खोताचा कज्जा चावडीत उभा राहिला.

सरपंच रामभाऊ विभुत्यांनी मोठ्यानं विचारलं, ''काय खोत, दारू प्यालास का न्हाई? तुला गुन्हा कबूल हाय का न्हाई?''

तांबारलेल्या डोळ्यांचा खोत नागाच्या फडीगत झुलल्यागत करून म्हणाला,

''म्या दारूला शिवलो न्हाई. शप्पत सांगतो, मी घेतल्याली न्हाई. उगा इनाकारणी माझ्यावर अदावत घेऊ नका.''

राऊ खोतानं साफ झिडकारलं तशी ती सारी चावडी खालवर झाली. लोक खदाखदा हसू लागले आणि राऊ खोतच म्हणाला-

''हसून दावू नका. खरं सांगतो. मी घेतल्याली न्हाई.''

रामभाऊ हसून म्हणाले,

''गड्या, तुझं डोळं सांगत्यात की रं!''

''अण्णा, डोळं काय सांगत्यात? गपा, उगच गप्प् बसा.''

''उतरस्तवर गप् बसावं म्हणतोस व्हय राऊ?''

''अहो, काय चढलीया काय मला?''

''अजून चढली न्हाई म्हणतोस?''

हात हलवून राऊ म्हणाला, ''अहो, त्याचं नावसुदिक घेऊ नगा. शिवल्याला न्हाई मी त्याला!''

एक सनदी पुढं झाला आणि मोठ्यानं म्हणाला,

''शिवल्यालं न्हाई, तर मग दडून का बसला होतास?''

''शेबास! मी काय दडून बसलो होतो काय?''

''दडला नव्हतास तर मग माळ्यावर काय करत होतास?''

''माळ्यावर काय करतोय! गडद झोपलो होतो.''

दुसरा एकजण हसून म्हणाला,

''खाली जागा नव्हती बाबा?''

''ते तुम्हाला काय करायचं? आम्ही खाली झोपू न्हाईतर वर झोपू!''

राऊ तसं आडवं बोलला आणि सबंध चावडी पोट धरून हसू लागली. आणि अशातच गणू तेल्यानं विचारलं,

''व्हय राऊ, तिनीसांजचंच कसा गडद झोपला होता गा!''

''झोपायला काय बंदी हाय काय कुणाची?''

''बरं ते जाऊ द्या.'' असं म्हणून एकानं पुढं होऊन विचारलं,

''तू जर दारू घेतली न्हवतीस, तर मग घरात बायकूसंग वाद का घालत होतास?''

एक हात वर करून राऊ म्हणाला,

''अहो, मला सांगा, मग कुणासंगं वाद घालायचा?- तुमच्याबरोबर?''

''ते न्हवं राऊ,'' असं म्हणून दुसरा एकजण म्हणाला, ''वाद घाल गा, पर इतकी धुमडी का घालत हुतास म्हंतो?''

''अहो, इतकी घालायची न्हाई तर किती घालायची ह्ये सांगा, असं म्हंतो की मीबी!''

''असं म्हणणाऱ्याला काय?''

लगेच राऊही म्हणाला,

''मग असं बोलणाऱ्याला काय?''

''हंऽऽ''

''हूंऽऽ?''

''मग दारूला शिवला नाहीस म्हण.''

''म्हण आणि काय? न्हाईच की!''

''पर्श न्हाई?''

''न्हाई न्हाई न्हाई म्हंतो तर!''

''मग एवढी कशानं चढलीया?''

गरगर डोळे फिरवीत राऊ बघत राहिला आणि एकजण बोलला,

''का त्याच्यासंगं असा वडा कुटता?''

''तर काय करावं बाबा? त्याला कबूल न्हाई की!''

''काय कबूल न्हाई? वास घ्या की त्याच्या तोंडाचा!''

पाण्यात हात मारल्यागत करून राऊ म्हणाला,

''कोण जवळ येऊ नका! ही काय रीत झाली?''

''तुझ्या तोंडाला तोंड लावायचं काय कारन गा?''

''तर मग कसा बोलतोय ह्यो बघा की!''

''काय बघायचं आणि? लांबनं वास येतोय की!''

''वास येतोय?'' असं विचारून राऊ म्हणाला, ''वास याचाच की! त्यो तुमच्या नाकात बसलायगा!''

''नाकात बसलाय?''

''व्हय! जिवाला इचारून बघा की आपल्या!''

सबंध चावडीत वास दरवळत होता आणि राऊ कबूल करायला तयार नव्हता.

तसे पाटील म्हणाले,

''काय लागलाय त्याच्या नादाला? सबंध चावडी घनाय लागलीया- भपकारा याय् लागलाय. ते काय आता सुद्दीत हाय म्हणून त्याला विचारता व्हय?''

कज्जा थांबला आणि लोक राऊला प्रश्न न विचारता पाटलांच्याकडे बघत राहिले. पाटील म्हणाले, ''ते सुद्दीत न्हाई, सरळ बोलंना. . .''

''सरकार, आता काय वाकडं बोललो?''

''तू गप!'' असं त्याला दरडावून पाटलांनी विचारलं, ''कुठं हाय गाडाव?''

एकाला दहाजण म्हणाले,

''ह्ये काय, भाईर हुबाच हाय की.''

दुसरा एकजण बोलला,

''गाडाव हाय. हार तयार केलाय. गुलाल आणलाय. सगळं तयार हाय बगा. हुकमाची वाट बगाय लागलोय.''

मध्ये तोंड घालून राऊ म्हणाला,

''साक्षी न्हाई, पुरावा न्हाई आणि गाडवावर बशीवता व्हय? मग अन्याव झाला म्हणायचा ह्यो!''

हाताचा पंजा दाखवून पाटील बोलले,

''धूप दरवळल्यागत तोंडाचा भपकारा या लागलाय आणि साक्षीपुरावा न्हाई व्हय? खुळ्या, तू बोलतोस ह्यो पुरावा आणि ऐकणारं साक्षीच हैत की सगळं त्याला!''

सरपंच रामभाऊही म्हणाले,

''आता इनाकारणी येळ मोडायला नको. उपाशी पोटानं लोक येऊन ताटकळत बसल्यात. उचला आणि ठेवा गाडवावर ह्याला!''

पाटलांनीही हात करून संमती दिली आणि साऱ्या चावडीत झुंबड उडाली!

''श्रीगुरुदेव दत्तऽऽ'' म्हणून गुळाची काईल उचलावी तसं चौघा-पाचजणांनी मिळून राऊला उचलून अंतराळी धरला आणि तंगड्या झाडीत राऊ ओरडला,

''आगा, हिसकाहिसकी करू नका. हात मोडंल, पाय मोडंल. . . अगा अगा अगा, थांबा! मी माज्या मनानं बसतो गा गा ग्गा ग्गा ग्गाऽ ऽ''

तोवर त्याला नेऊन लोकांनी गाढवावर ठेवलासुद्धा! सरळ बसवायचं ते उलटा बसवला. तोंड मागं आणि पाठ पुढं! भली लांबलचक खेटरांची माळ एक गळ्यात अडकवली आणि बचकभर गुलाल अंगावर उधळला. तोंड चांगलं माकडागत लाल दिसू लागलं, आणि पाटील म्हणाले, ''हं, चला आता!''

पाटलांनी 'चला' असा इशारा दिला आणि एकजण ओरडला, ''राऊ खोताच्या नावानंऽच्यांग भलंऽ''

''च्यांग भलं'' झालं आणि लेजीम-हलगी सुरू झाली. हा खेळगड्यांचा ताफा गाढवापुढं नाचू लागला. बघ्या लोकांनी भोवतीभर गर्दी केली. रंग भरला आणि थांबत थांबत मुंगीच्या गतीनं धिंड पुढं सरकू लागली. अंगात एक लय भरली आणि पावलं तालावर पडू लागली.

ही वरात चावडीपुढनं पेठेत आली. पेठ सारी बेहोष होऊन नाचू लागली. गुलालाच्या फकी फेकल्या जाऊ लागल्या. सारी मिरवणूक लालभडक होऊन गेली. बेजान रंग भरला आणि गाढवावर बसलेला राऊ खोतही चेकाळून गेला. लेजीम वाजत होती, हलगी बोलत होती, आणि खुद्द राऊच तोंडात बोट घालून शिट्ट्या मारू

लागला! हलगी बंद पडली तर तो तोंडानं बोल काढू लागला-''डांग टिक टाक टिक डांग टिक टाक. . .''

हे बोल ऐकून लोक नाचू लागले. उड्या मारमारून त्याला बघू लागले. गुलाल उधळत माणसं दंगा करू लागली. आणि कुणीतरी एकाने शक्कल काढली. ''थांबा थांबा!'' असं लोकांना आवरून एकजण म्हणाला, ''अगा, भर पेठेत मिरवणूक आलीया, ह्येला हळद-कुंकू लावून पंचारतीनं वव्वाळा तरी!''

''ओवाळा'' म्हणायचा अवकाश! हां हां म्हणता पंचारती हातात घेऊन पाच सुवासिनी गोळा झाल्या; त्यांनी गाढवाच्या पायांवर घागरीनं पाणी ओतलं आणि हळद-कुंकू लावून पंचारतीनं त्याला ओवाळलं. फिदीफिदी हसत बायका निघून गेल्या आणि राऊचा आपल्या तोंडावरचा ताबा सुटला. तो कुणीकडच्या काहीच बोलू लागला आणि गावही सारं बेहोष होऊन गेलं! 'च्यांग भला'चा गजर होऊ लागला. लेजीम खळाळू लागली. हलगी बोलू लागली.

पेठेतच रात्रीचे बारा वाजले. लोकांचीही नशा जरा उतरली. कशाबशा आणखी एकदोन गल्ल्या फिरून झाल्या आणि रामभाऊ विभुते म्हणाले, ''बास झालं आता. म्हारुतीच्या देवळाजवळ जाऊन विसर्जन करू या.''

राऊ खोतानं एवढं ऐकलं आणि 'न्हाई न्हाई' म्हणून हात हलवीत तो म्हणाला,

''रामभाऊ अण्णा, रंगाचा बेरंग करू नका. आता कुठं जराऽ रंग भराय लागलाय.''

''म्हंजे अजून फिरायचं म्हणतोस काय?''

''तर काय मग? आत्ता कुठं फकस्त दोन गल्ल्या झाल्या! पाक सारं गाव हिंडाय पायजे. हिरमोड करू नगा. चल अगुदर कोळ्याच्या गल्लीला.''

''अरं बाबा, आम्ही अजून भाकरीतुकडा खाल्ला न्हाई.''

''मग आम्हाला उपकार सांगता काय? ते काय भागायचं न्हाई बघा.''

''म्हंजे सोकावलास म्हण की तू?''

राऊ म्हणाला, ''आता एकदा गाडवावर बसलोय न्हवं? मग आदीमदी उतरायची आता बात न्हाई बघा. पुरी कड गाठली पायजे!''

असं म्हणून त्यानं मान मागं वळवली आणि टाळी वाजवून तो स्वतःच ओरडला,

''अरं ए हलगीऽ, एऽ लेजीम, हां ऽ! का थांबला रं? वाजवा. . . डांग टिक टाक टिक डांग टिक टाक. . .''

लेजीम सुरू झाली, हलगीही वाजू लागली.

एक जोरकस शिटी मारून राऊ म्हणाला,

''अगा जोरात! जोरात! हंबाऽ! डांग टिक टाक टिक डांग टिक टाक. . .''

लोकांनाही पुन्हा चेव आला. धिंड साऱ्या गल्लीबोळातनं शिरू लागली. पाक सारं गाव पालथं घालून झालं आणि रामभाऊंनी पुढं होऊन राऊला विचारलं, ''आता

तर झालं बाबा तुझ्या मनासारखं!''

"अजून कुटं झालंय?''

"आणि काय ऱ्हायलं रं बाबा? एक गल्लीसुदिक सोडली न्हाई. हिशेब चुकता झाला की.''

"कसा चुकता हुतोय?''

"तर आणि काय ऱ्हायलं रं?''

"अजून लई ऱ्हायलंय!''

"ते कसं?''

राऊ सांगू लागला, "अजून म्हारुडा ऱ्हायलाय. मांगुडा ऱ्हायलाय. ती बाजू सगळी अजून तशीच ऱ्हायलीया की.''

"ऱ्हाऊ द्या आता बाबा, दोन वाजून गेलं. उतर आता खाली.''

राऊ हात हलवून म्हणाला,

"ते काय भागायचं न्हाई. सबंध गाव म्हंजे सबंध गाव पालथा घालाय पायजे. अर्धी धिंड काढता काय माझी?'' असं म्हणून त्यानं एक उदाहरण सांगितलं,

"आर्धी दाढी झाल्यावर उठता ईल का न्हाव्याफुडनं?''

समजावणीच्या सुरात रामभाऊ म्हणाले,

"बाबा राऊ, आता लोक दमून गेल्यात. तुला लई हौसच असली तर उद्या आणि फिरू म्हणं.''

डोळे झाकून राऊ म्हणाला,

"उद्याचं काय सांगू नगा. उद्याचं उद्या, परवाचं परवा, तेरवाचं तेरवा! त्येचा आन आजचा काय संबंध न्हाई.''

काही केल्या राऊ ऐकायला तयार होईना. लोक तरी पार भेंडाळून गेले होते. केव्हा भुईला पाठ लावून पडीन असं त्यांना झालं होतं आणि राऊ चेकाळला होता. एक शिटी मारून तो म्हणाला, " हां, थांबू नका! चला चला! अरं एऽवाजाप! अगा कुठं गेली लेजीम? हलगी झोपली काय खालवर घालून?''

आळसलेली लेजीम पुन्हा सुरू झाली. हलगीही वाजू लागली आणि गावकरी महारवाड्याकडे निघाले. मधेच राऊ ओरडला,

"ते कोणकोण मागं फिरलं बघा, त्यो घोळका चालला बघा. बोलवा त्यास्नी. लग्नाला येऊन तांदूळ न टाकताच मागं फिरलं काय ते?''

राऊ कुणाला जाऊ देईना झाला. सरळ नावं घेऊन तोंडानं शिवी देऊ लागला. साऱ्या लोकांना बजावून म्हणाला, "आता जो मधनं जाईल त्याच्या आईभणींचा ह्या गाडवावरनं उद्धार करीन! त्यांच्या सात पिढ्या भाईर काढीन! तोंडाला ईल त्या शिव्या दीन.''

ही धमकी ऐकून लोक गार झाले. मुकाट्यानं मागनं चालू लागले. . .

अखेर चांदणी उगवायला धिंड संपवून लोक घरोघर पांगले.

. . . रात्रीच्या ह्या जागरणानं आणि दमणुकीनं लोक घरोघर झोपले होते. कामधंदा सोडून घरांत निवांत घोरत पडले होते.

डुलका लागल्यागत चावडीही गपगार होती. सातआठ सनदी ओळीनं झोपले होते. एकदोघेजण डारडूर घोरत होते. नाही म्हणायला एक तराळ तेवढा तोंडाला चिलीम लावून आगटीजवळ बसून होता. त्याच्याही डोळ्यांत पेंग मावत नव्हता. अशा तिसऱ्या प्रहरीचा राऊ खोत लगालगा चावडीवर आला. गडद झोपलेल्या सनद्यांकडे बघून तो तराळाला म्हणाला,

''काय गा, काय गोळी लागली काय ह्या साऱ्यांस्नी?''

''व्हय बाबा, तुझी राच्ची धिंड!''

''अगुदर उठीव त्यास्नी.''

''का गा?''

''उठीव उठीव!''

''अरं पर. . .''

''अरं न्हाई आणि पर न्हाई!'' असं म्हणून राऊ पुढं म्हणाला, ''वा वा! गडद झोपल्यात व्हय? अर ए, उठा उठा! ए कुंभकर्ण्यांनो!. . .''

त्याच्या हळीनं एकदोन सनदी जागे झाले. कपाळाला आठ्या घालून डोळे उघडीत एकानं विचारलं,

''का रं बाबा, आणि का आलाईस उठवायला!''

''अरं उठा अगुदर!''

''का रं?''

''पाटील कुठ हैत? सरपंच कुठं हैत? पंच कुठं हैत? मंडळी कुठं हैत?- बोला!''

''अरं!''


''आरं काय? सारा लवाजमा गोळा करा.''

''कशाला?''

''वळकंना? काय तुम्हीबी घेतलीया आज? आटपा आटपा! अगुदर सारं गाव गोळा करा. जा बाबा तराळ, दौंडी द्याला भाईर पड. हंऽ, येळ घालवू नगा. वाजापाची जोडणी करा.'' असं म्हणून अंगाला झोके देत तो तोंडानं बोल काढीत राहिला,

''डांग टिक् टाक् टिक् डांग टिक् टाक. . .''

❒




तपशीलासाठी पहा - साहित्यसूची सप्टेंबर २०१२

राजमयूर प्रकाशन
७६/५९८ महर्षिनगर
पुणे ४११ ०३७.
०२०-२४२६९६६७
९३७०१४२८४१

पृष्ठे ६००(१/८डेमी)
पुठ्ठा/रॅपर बाइंडिंग
मूल्य रु. ६००/-
सवलतीत रु. ५००/-
सर्वत्र उपलब्ध

# बालनगरी

## भारतीय साबरी विद्येच्या पार्श्वभूमीवरील
## अफलातून फँटसी

## किन्नर

(मागील अंकावरून)

बेढब, कुरूप, ओंगळ, एका डोळ्यावर रत्नमण्यांचे चाप ओढलेले, जाड ओठांचे होते यक्ष. त्यांचा राजा जंभाला याचा डावा डोळा फुटका असल्यामुळे त्याच्या सन्मानार्थ त्यांच्यात ती रीत पाळत. तर बाई आहे की बुवा आहे याचा अंदाजच करता येऊ नये असे होते ते किन्नर. ते उभयलिंगी असतात.

ओमच्या डोळ्यातले कुतूहल दिसले की सरलकाका माहिती पुरवी.

सुंदर अंगापिंडाचे, फुलांच्या माळा वस्त्रासारखे घालणारे विद्याधर होते. त्यांच्या दुकानांपाशी, पडावावर सरलकाका त्यातल्या त्यात मोकळेपणाने बोले. त्या सर्वांशी बोलताना तो वेगळी भाषा वापरे. पैशाची भाषा म्हणून त्याने तिचे नाव सांगितले.

खरेदीदारांमध्ये विदेशी लोक बरेच होते. ते कोणत्या भाषेत व्यवहार करत होते असा ओमला प्रश्न पडला. काळे आफ्रिकेतले लोक होते. पिवळे चिनी, जपानी होते. लाल अमेरिकेतले होते. अमुदि वर्गांत जिथे तिथे दुनियाभर फिरून ओमची समज वाढली होती.

विद्याधरांची अत्तरांनी घमघमणारी आणि सनई, बासरीच्या मंजुळ स्वरांनी निनादणारी दुकाने म्हणजे पडाव त्यांनी मागे टाकले. यक्षांच्या पडावावर बासऱ्यां ऐवजी वेगळीच शिंगापासून बनवलेली वाद्ये होती. विद्याधरांच्या दुकानांची रंगसंगती पांढरी चंदेरी होती. तर यक्षांकडे

हिरव्या व निळ्या रंगाचा वापर जास्त होता.

यक्षांच्या दुकानात बहुतेक सारे वनस्पतीजन्य प्रकार होते. उलट विद्याधरांकडे चांदीसोन्याची पत्र्यावर रंगवलेली रत्नयंत्रे, रत्नखचित वस्तू, स्फटिक यांचे भांडार होते.

यक्षांचे छोटे छोटे पडाव ओलांडून ते एका भल्या मोठ्या पडावावर आले. ओमला तिथले वातावरण थेट मासळीबाजारासारखे वाटले.

कोळणींसारख्या गलेलठ्ठ यक्षिणी तिथे उकिडव्या बसून होत्या. प्रत्येकीच्या पुढ्यात एक एक तरंगता गालिचा होता. त्यावर वेगवेगळ्या वस्तूंचे वाटे मांडलेले होते. जास्त करून यक्षिणींचे वरचे अंग उघडे होते. कमरेला त्या कोळणींसारखी काष्टी नेसलेल्या. पुरातन संग्रहालयातल्या किंवा लेण्यांमधल्या मूर्तींत दाखवतात तसे त्यांचे रंगरूप होते. त्यावर त्यांनी भल्या मोठ्या रंगीबेरंगी मण्यांच्या माळा सोडलेल्या, केसांच्या तऱ्हेतऱ्हेच्या रचना होत्या. काहीकाहींनी तर ते एखादे घरटे असावे तसे रंगीबेरंगी जिवंत पक्षी ठेवलेले होते. शिंगांच्या वाद्यसंगीतात ते पक्षी अधूनमधून आपल्या सुमधुर आवाज देत होते.

सरलकाका रांगेत बसलेल्या यक्षिणींच्या मालाकडे बारकाईने नजर टाकत होता. तो एका काळ्या कुळकुळीत तुळतुळीत यक्षिणीसमोर थांबला. तसे तिच्या डोक्यावरल्या केसांच्या घरट्यातील सात चिमुकल्या निळ्या पक्ष्यांनी 'अथस्वागतम'ची धून त्यांना गाऊन ऐकवली. तिच्यासमोर वेगवेगळ्या आकारातले कमंडलू विकायला ठेवलेले.

'ओम, आधी आपण एक गोरखचिंचोका घेऊया. म्हणजे मग आपली बाकी सगळी खरेदी त्याच्यात भरता येईल.'

गोरखचिंचोका म्हणजे त्याला काही कळले नाही. सरलकाकाने एक दोन कमंडलू उचलून ते टिचक्या मारून वाजवून पाहिले. तशी ती यक्षीण त्याला काहीतरी म्हणाली. तिची पैशाच्ची भाषा त्याला कळली नाही, तरी तिच्या एकंदर आविर्भावावरून ती सरलकाकाला आपला सगळा माल चांगलाच आहे, हे बजावित होती हे ओमला कळले. मग तिने आपणच एक-दोन गडद रंगाचे कमंडलू टिचक्या मारून सरलकाकाच्या हातात दिले. ते हातातल्या हातात तोलून ओमच्या हातात देत विचारले, कोणता बरा वाटतो तुला?

ओमला काय कळत होते? डोंबल.

डाव्या हातातला जास्त जड वाटत होता. तसे सरलकाकाला सांगितल्यावर त्याने तो घेऊन परत ठेवला. आपण काढून दिलेला कमंडलू घेतला गेला, हे बघितल्यावर यक्षीण ओमकडे बघून प्रसन्न मुद्रेने हसली. तसे सरलकाकाने सांगितलेली सूचना आठवून ओम तिची नजर चुकवून खाली पाहू लागला. त्यावर तिने खदाखदा हास्य केले. तिच्या डोक्यावरच्या पक्ष्यांनी ओमच्या भोवती एक घिरटी घातली.

मोहरा देताना सरलकाकाने बरीच घासाघीस केली. हे मोहरांचे व्यवहार तरी, त्याला चांगले जमत होते, हे ओमचे नशीब.

तो हातातला कमंडलू म्हणजे फळ वाटत होते. एखाद्या आख्ख्या एखाद्या फळाच्या सालीतून कोरून काढल्यासारखे. ते गोरखचिंचेचे फळ होते. सरलकाकाने पुढे गेल्यावर खुलासा केला. गोरखनाथांनी त्या झाडाखाली बसून तप केले आणि त्याच्या फळांचा कमंडलू म्हणून वापर प्रथम सुरू केला.

दुसऱ्या रांगेत गेल्यावर ते एका सावळ्या तरुण यक्षिणीपाशी थांबले. तिच्या पुढ्यात भूर्जपत्रे, तालपत्रे आणि तशाच पानांचे वाटे लावलेले होते. जवळ ठेवलेल्या सोन्याच्या घंगाळातून ती सारखी सारखी त्यावर कसलेसे सुवासिक पाणी मारीत होती. ती सारी पाने नुकतीच झाडांपासून सोडवली असावीत इतकी ताजी होती. तिच्यापाशी गर्दी होती. त्यामुळे ती कोणालाच भाव कमी करीत नव्हती. तिच्या तोंडी न चा पाढा चालू होता. त्यावरून ओमने अंदाज बांधला. सरलकाकाने तिला तीन मोहोरा दिल्या. प्रत्येकीचे एकेक वाटे घालायला सांगितले असावे. पंचवीस भूर्जपत्रे, जवळजवळ शंभरेक तालपत्रे आणि एकच मोजके सालपत्र तिने आपलाच एक केस तोडून त्याने गुंडाळी बांधून दिले. तिचा जटाभार डोक्यावरचा भलामोठा आंबाडा धरून खाली आजूबाजूला जमिनीपर्यंत विखुरला होता. ती पानांची गुंडाळी सरलकाकाने सरळ ओमच्या हातातल्या कमंडलूत ढकलली. लांबच्या लांब पाहता, पाहता कमंडलूत गायब झाली.

जादूचा कमंडलू की जादूची पाने? सरलकाकाने उत्तर दिले

जादूचा कमंडलू.

तिथून पुढे ते लाकडाचे वेगवेगळे दंडुके मांडले होते, त्या बयेकडे गेले. बयेने अगदी खोच्चून बरे स्मित केले. तिच्या केसात तिने करवंदीची सुंदर लाल गुलाबी फळे पानाडहाळ्यांसह खोचलेली. तिचे डोके शोभिवंत कुंडी सारखे वाटत होते. त्यातले एक फळ तिने वेचले आणि तोंडात टाकले. तोंड आंबट करत ते रिचवले. दुस-या एका फांदीचे पान तोडून तोंडात घातले. डोळे मिचकावत मिटक्या मारल्या. त्याच फांदीची दोन पाने तोडून तिने मग त्यांच्यापुढे केली. सरलकाकाने त्यातले एक घेतले, ओमला एक घ्यायला सांगितले. ती त्याच्या ओळखीतली असावी. सहज शिळोप्याच्या गप्पा माराव्यात, तशी ती दोघे बोलत होती. मध्येच तिने मंजुघोषाचा उल्लेख केला. वरचेवर तिच्या बोलण्यात राजकुमार, राजकुमाराचा उल्लेख चालू होता. आणि मान वेळावून वेळावून सरलकाकाच्या मागे कुठे राजकुमार दिसतो का शोधत होती. राजकुमार बरोबर नाही याची सरलला कशीबशी तिची खात्री पटवता आली. तेव्हा कुठे जावून तिने ओमकडे नीट लक्ष दिले. त्याला निरखून पाहू लागली. ओम लाजला. तिने आपला हात पुढे सरकवून त्याच्या डोक्यावर ठेवला आणि त्याला दिला जाणारा नेहमीचा आशीर्वाद दिला. आयुष्यमान भव. तिचा स्पर्श सुशीतल होता.

मी तिच्याकडे बघू? ओमने सरलकाकाला विचारले.

तिच्याबाबत नियम पाळायची गरज नाही. ती आपलीच आहे. जंभालिका तिचे नाव. सरलकाकाने परवानगी दिली.

आता पहिल्यांदाच ओमने कोणा दुकान थाटलेल्याशी आमनेसामने नजर दिली. जंभालिकाचे डोळे जांभळे होते. तिने करवंदाऐवजी जांभळे डोक्यात माळली असती, तर ते जास्त शोभले असते. ती ओमच्या डोळ्यात पाहता पाहता खुदकन हसली. आपल्या डोक्याभोवती तिने कथ्थक नर्तकीप्रमाणे नजर नाचविली. त्या अनुषंगाने ओम पाहतो तो काय? आता तिथे करवंदे नाही, तर जांभळाचे घोस आणि डहाळ्या लागलेल्या. बापरे! ती मन वाचू शकते? ते कळल्यागत तिने

मान डोलावली. ओमला काढून एक घोस दिला.

डोळ्याला डोळे लावून आम्ही सारेच वाचू शकतो. म्हणून डोळ्याला डोळा लावायचा नाही. तिने शुद्ध मराठीत उत्तर दिले. मग ओमला देण्यासाठी चांगल्याश्या योगदंडाची शोधाशोध तिने सुरू केली. एक काळपट तपकिरी दंड तिने त्याच्या हातात दिला. ओमने नीट निरखायला जवळ धरला. ओमकडून तो सरलकाकाने घेतला.

पुत्रंजीव? हा नाही चालणार. तो अभिजीतक आहे. म्हणत सरलकाकाने तिच्याकडे परत दिला.

ईप्पोप्पो! वैश्रवण. जंभालिकाने डोळे विस्फारत ओमला हात जोडून नमस्कार केला. ओम फार ओशाळला. जमीन दुभंगून आत घेईल तर बरे असे त्याला झाले. त्याने सरलकाकाच्या मागे लपायचा प्रयत्न केला.

तर मग मी त्याला उत्तमातला उत्तम एक देते. तिने तिच्या ओच्यात हात घातला आणि त्यातून एक फिकट पिवळसर रंगाचा दंड काढून त्याला दिला. ओम मुला, हा घे तुला. पारिभद्राचा दंड.

ओमने तो तिच्या हातून घेतला. आता त्याच्या नाकाशी क्षणभर पारिजातकाचा मंद दरवळ आला.

(क्रमशः)

समीर बागायतकर, वेंगुर्ला
+९१-७७९८६७१४८०
इ-मेल : ssbagayatkar@yahoo.co.in

# ओळखा पाहू



## ८० वर्षे नुकतीच पूर्ण करणारे साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष

विजेत्यास २००रु. किंमतीचे पुस्तक भेट
म्हणून पाठवण्यात येईल

आपली उत्तरे दिनांक १५ऑक्टोबर २०१२ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत.
बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल.
निकाल ऑक्टोबर २०१२ च्या अंकात जाहीर होईल.

## 'जुलै' अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

पाकिस्तानचे नुकतेच निधन पावलेले गझल सम्राट
**मेहंदी हसन**

स्पर्धेचे विजेते - **श्रीराम कुलकर्णी - सोलापूर**

सवीता जोशी, राजेंद्र आवटे, सदाशिव कालेलकर - नागपूर
मंगेश कानडे, नेहा सातभाई - सातारा प्रज्ञा कोल्हटकर, निशांत
सुभेदार - रत्नागिरी, संगिता काळे - नाशिक, सुशांत पाटील,
वैशाली निमकर - औरंगाबाद, शशिकला पांडे,
गिरीजा कंठे - अमरावती, शंकर रासने - मुंबई,

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**
**मेहता पब्लिशिंग हाऊस,** मेहता मराठी ग्रंथजगत विभाग, १९४१ सदाशिव पेठ,
माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, पुणे टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३०.


# पुरस्कार




**फिफ्टी इयर्स ऑफ सायलेन्स**
लेखक - जॅन रफ्-ओ हर्न
अनुवाद - नीला चांदोरकर

दुसऱ्या जागतिक महायुद्धादरम्यान सैनिकांकडून अनेक वेळा बलात्कार झालेल्या स्त्रीची आठवणगाथा.

नीला चांदोरकर यांनी अनुवादित केलेल्या व मेहता पब्लिशिंग हाऊस ने प्रकाशित केलेल्या " **फिफ्टी इयर्स ऑफ सायलेन्स** " या पुस्तकाला महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे यांचे **उत्कृष्ट ग्रंथाचे प्रथम पारितोषिक- २०१२** जाहीर झाले आहे.







मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित " **अ-मृत पंथाचा यात्री** " या पुस्तकाला **उत्कृष्ट पुस्तक प्रकाशनाचे प्रथम पारितोषिक** आणि " **ग्रंथसूचि-जून २०१२** " ला **उत्कृष्ट ग्रंथसूचीचे प्रथम पारितोषिक** द फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स, दिल्ली या संस्थेतर्फे जाहीर झाले आहे.

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PNCW / M-184 / 2012 - 2014 / Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date - 11 September 2012

## मेहता मराठी ग्रंथजगतत्या दिवाळी अंकात वाचा,
## विशेषत्वाने प्रभावीत करणाऱ्या पुस्तकाबद्दल किंवा लेखकाबद्दल !

**लिहीत आहेत अनंत मनोहर, स्वाती चांदोरकर, प्रा.डॉ. संतोष मुळगांवकर, निरंजन घाटे, सुरेश नाईक, डॉ. वसंत जोशी, अंजनी नरवणे, श्याम भुर्के, मधुवंती सप्रे, रेश्मा कुलकर्णी, मार्या राहतोर आणि अनेक दिग्गज लेखक.**



BOOK POST
Printed Matter

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.